
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९५ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आपण किती काम करीत आहोत, यापेक्षा आपण जनतेचा सहभाग किती मिळवू शकलो हे अधिक महत्त्वाचे आहे. समाज निर्मितीच्या कामात 'जनप्रेरणा आणि जनसहयोग' अत्यंत आवश्यक असतो. आपल्या कुशल विचार आणि कृतीतून आपण जर हे करू शकू, तर आजची स्थिती बदलायला वेळ लागणार नाही.

- **लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## विनम्र अभिवादन



भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचा आज जन्मदिन

# महापालिकेसाठी उद्धव-राज एकत्र

## ● मनसे-उबाठा युतीची घोषणा ● जागा जाहीर करणे टाळले

मनपा निवडणूक रणधुमाळी

◆ **मुंबई, २४ डिसेंबर**

मुंबई महानगरपालिकेच्या १५ जानेवारीला होणाऱ्या निवडणुकांसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यातील युतीची बुधवारी अधिकृत घोषणा झाली. तब्बल २० वर्षांनंतर, परस्पर विरोधात असलेले चुलत भाऊ उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे राजकीयदृष्ट्या एकत्र आले. मात्र, मुंबईत दोन्ही पक्ष किती जागांवर लढणार आहेत याची घोषणा करण्यात आलेली नाही.



मुंबईतील एका हॉटेलमध्ये बुधवारी संयुक्त पत्रकार परिषद घेत मुंबईसह अन्य मनपा निवडणुकांसाठी युती केल्याची घोषणा उद्धव आणि राज ठाकरे यांनी केली

मनसे-उबाठा युतीची घोषणा वरळीतील एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली. यावेळी मुंबईचा महापौर मराठी माणूसच असेल आणि तो आमच्या युतीचाच असेल, असे राज ठाकरे म्हणाले. एका मुलाखतीत मी म्हटले होते की, आमच्यासाठी महाराष्ट्र सर्व मतभेदांपेक्षा मोठा आहे. तेच आमच्यातील ऐक्याचे कारण ठरले, असेही राज ठाकरेंनी स्पष्ट केले.

**अन्य ठिकाणीही लवकरच युती : उद्धव ठाकरे**

आम्ही एकत्र आलो आहोत आणि एकत्रच राहणार आहोत. भाजपामध्ये जे काही सुरू आहे ते पाहून ज्यांना सहन होत नाही, तेही उबाठा, □मनसे युतीसोबत येऊ शकतातण असे आवाहन करत, नाशिक महानगरपालिकेसाठी दोन्ही पक्षांमध्ये जागावाटप निश्चित झाले असून, इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही युतीबाबत चर्चा सुरू असून, लवकरच त्याचीही घोषणा केली जाईल, असे यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले.

### ४३ जागांवर एकमत नाही

मुंबई मनपा क्षेत्रातील जवळपास ४३ मराठीबहुल जागांवर दोन्ही ठाकरेंचे एकमत झाले नसल्याचे बोलले जाते. यामुळे युतीची घोषणा करतेवेळी जागा वाटपावर कोणतेही भाष्य केले गेले नाही. या जागा मनसेला सोडण्यास उद्धव ठाकरेंकडून वेळकाढूपणा होत असल्याचे सूत्रांकडून समजते. मागील मनपा निवडणुकीत या जागांवर अन्य पक्षांचे उमेदवार निवडून आले होते. त्यावेळी मनसे आणि उबाठा एकमेकांविरोधात लढल्याने यापैकी बहुतांश जागा भाजपाने जिंकल्या होत्या. ■

**मराठी माणसाची परीक्षा**

१९६० मध्ये मुंबई आणि महाराष्ट्राच्या एकतेसाठी संपूर्ण ठाकरे कुटुंब आणि मराठी माणसाने लढा दिला होता. याची आठवण उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना करून देत, तेव्हा जशी मराठी माणसाची परीक्षा होती, तशीच ही निवडणूकही आहे, असे ते म्हणाले. 'चुकलात तर संपलात' आणि 'फुटलात तर संपलात' हे लक्षात ठेवण्याचे आवाहन मराठी माणसांना करतो, असेही ते म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

### राजकीय स्वार्थासाठी झालेली युती; फडणवीसांचा ठाकरे बंधूंना टोला



आपले अस्तित्व टिकवण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले असून, हा त्यांचा राजकीय स्वार्थ असल्याचा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लगावला. यामुळे फारसा परिणाम होणार नसल्याचेही ते म्हणाले. दोन बंधू एकत्र आले याचा मला आनंदच आहे, पण त्यामुळे राजकीयदृष्ट्या फार काही घडेल असे मानणे म्हणजे बाळबोधपणाच म्हणावा लागेल. प्रत्येक पक्षाला निवडणुकीतील आपले अस्तित्व टिकवण्याकरिता जे करावे लागते, त्या दृष्टीने दोन पक्षांनी अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली ही युती आहे. यामुळे फार काही परिणाम होईल असे मला वाटत नाही, असे ते म्हणाले. ■

### अंडी खाऊन झाली, आता कोंबडी कापायला आलेत : एकनाथ शिंदे



लोकशाहीमध्ये युती आणि आघाड्या होत असतात. काही युत्या राज्याच्या आणि जनतेच्या भल्यासाठी होत असतात. जशी आमची महायुती महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी गेले साडेतीन वर्षे काम करत आहे. महाराष्ट्राला विकासाकडे नेण्यासाठी आणि लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी काम करत आहे. परंतु आता झालेल्या युत्या सत्तेसाठी, खुर्चीसाठी आणि आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी होत आहे. काही लोक मुंबईकडे सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून पाहत आहेत. आधी अंडी खात होते, आता कोंबडी खाण्यासाठी आले आहेत, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका केली. ■

# मतदारांसोबत हवी ग्रह-ताऱ्यांचीही साथ!

## ज्योतिषतज्ज्ञांचे उंबरठे झिजवताहेत उमेदवार

◆ **मुंबई, २४ डिसेंबर**

सध्या राज्यात महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची लगबग सुरू आहे. त्यातही अपक्षांसह अगदी उमेदवारी मिळालेले सर्वजण आपल्या विजयासाठी कोणतीही कसूर राहू नये, यासाठी प्रयत्नरत आहेत. मग मतदारांना रिझवण्यासोबतच हे उमेदवार ग्रह-ताऱ्यांचीही साथ मिळावी म्हणून ज्योतिषतज्ज्ञांचा सल्ला घेत आहेत.



अर्ज भरण्याची वेळ शुभ आहे किंवा नाही याकडे प्रत्येक जण काटेकोरपणे लक्ष देत आहे. त्यासाठीचे मुहूर्तच काढले जात असून घरातून निघताना डावे पाऊल पुढे की उजवे, उमेदवारी अर्ज भरताना कोणता मुहूर्त साधायचा, अर्ज भरताना पेन कोणत्या रंगाचा हवा, कपडे कोणत्या रंगाचे परिधान करावयाचे, कोणकोणत्या देवतेची पूजा करून निघायचे यासारख्या अनेकविध प्रश्नांनी सध्या इच्छुकांना संभ्रमात टाकलेले आहे. त्यासाठीच आपला रोजचा दिवस सुरू करताना कौटुंबिक ज्योतिषाचा सल्ला घेतला जात आहे.

काही जण तर अर्ज भरण्याआधी उपवास करावा का? यावरही चर्चा करताना दिसत आहेत. त्यामुळेच अनेक इच्छुकांचा दिवस सध्या मोबाईलवरील कॅलेंडर नव्हे, तर ज्योतिषाच्या पंचांगावरून सुरू होत आहे. 'आज अर्ज भरायचा की उद्या?', 'राहू काळात सही चालेल का?' यासारख्या प्रश्नांनी होरातज्ज्ञही हैराण झाले असून दामदुप्पट दरात राशीनुसार वेळा आणि दिवस काढून दिला जात आहे.

सध्या तरी इच्छुकांच्या मते, योग, ग्रह आणि मुहूर्त जुळला तरच विजय निश्चित, असा समज दृढ होत चालला आहे. त्यामुळे निवडणूक लढत मतदारांपेक्षा आधी ग्रह-ताऱ्यांमध्येच रंगत असल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसत आहे. ◀(वृत्तसंस्था)


### काळ-वेळ पाहूनच अर्ज करणार सादर

साधारणत: कोणत्याही कामासाठी उद्योग, लाभ आणि अमृत हे योग शुभ तर चंचल, काल आणि रोग हे योग अशुभ मानले जातात. अशुभ काळ टाळून आपले काम केले जाते. काही जण तर अशुभ काळामध्ये प्रवास करणेदेखील योग्य समजत नाही, त्यामुळे शुभ काळाची वाट पाहिली जाते. सध्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी वेळ आणि काळ निवडताना होरातज्ज्ञाचा आधार घेतला जात आहे. ■

## महत्त्वाचे

### बाजारात अस्थिरतेमुळे मंदी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात बुधवारी कमालीची अस्थिरता दिसून आली. सुरुवातीच्या सत्रात तेजीचे संकेत देणारा बाजार दुपारनंतर वरच्या स्तरावरून घसरला आणि लाल निशाणात बंद झाला. निर्देशांक दिवसभरातील उच्चांकी पातळीवरून सुमारे ३०० अंकांनी कोसळला तर निफ्टी २६,१५० च्या खाली आला. परदेशी गुंतवणूकदारांकडून सातत्याने सुरू असलेली विक्री आणि अमेरिकेतील व्हिसा नियमांतील बदलांमुळे आयटी क्षेत्रावर आलेला दबाव, ही बाजार घसरण्यामागील मुख्य कारणे ठरली. सत्राअखेरीस निर्देशांक ११६ अंकांनी तर निफ्टी ३७ अंकांनी खाली आला. औषध आणि तेल क्षेत्रातील नफावसुली ही देखील बाजाराच्या घसरणीला कारणीभूत ठरली. ■



# आरोग्य सेविका होणार नियमित

## — मंत्रिमंडळाचा निर्णय —

**मुंबई, २४ डिसेंबर**

राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार देण्यास बुधवारी मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयानुसार जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य सेवक (महिला) यांची पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित संचालक, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत शासकीय परिचर्या महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांमधून दोन वर्षाच्या कालावधीसाठी भरण्यात येत असत. हा कालावधी संपल्यानंतर या उमेदवारांना कार्यमुक्त केले जात असे. त्यानंतर संबंधित जिल्ह्यातील रुग्णसेवेची निकड व जिल्ह्यातील रिक्तपदांची स्थिती लक्षात घेता त्यांना ११ महिन्यांची अस्थायी नियुक्ती देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना होते. विभागीय आयुक्तांचा हा अधिकार २०१८ मध्ये रद्द करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार आता राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात १५ एप्रिल २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या व सध्या कार्यरत अशा २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आला आहे. कर्मयोगी २.0 आणि सरपंच संवाद कार्यक्रम राबविणार ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर विकासाभिमुख कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यात जिल्हा कर्मयोगी कार्यक्रम २.0 व राज्यातील सरपंचांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे दोन्ही कार्यक्रम मित्रा संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येतील. जिल्हा कर्मयोगी २.0 कार्यक्रम गाव, तालुका व जिल्हा अशा स्तरांवर राबविण्यात येईल. यात सेवा देणाऱ्या थेट संबंधित अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक प्रशासनातील शेवटच्या टप्प्यातील अधिकारी, कर्मचारी यांचे कौशल्य वाढविण्यात येणार आहे.

### एलआयसी गृहकर्जाच्या व्याजदरात कपात

**नवी दिल्ली :** एलआयसी हाऊसिंग फायनान्सने आपल्या गृहकर्जाच्या व्याजदरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीने नवीन गृहकर्जासाठी सुरुवातीचा व्याजदर कमी करून ७.१५ टक्के केला आहे. ■

# दोन नव्या विमान कंपन्यांना मान्यता

### इंडिगोच्या वर्चस्वाला धक्का

◆ **नवी दिल्ली, २४ डिसेंबर**

लवकरच भारतात नवीन दोन एअरलाईन्स सुरू होणार आहेत. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडून दोन नवीन एअरलाईन्सना आवश्यक परवानग्या देण्यात आल्याची माहिती माहिती नागरी उड्डयन मंत्री राम मोहन नायडू यांनी दिली. 'अल हिंद एअर' आणि 'फ्लाय एक्सप्रेस' अशी या दोन कंपन्यांची नावे आहेत.

देशातील सर्वात मोठी एअरलाईन असलेल्या इंडिगोच्या प्रणालीत अलिकडे बिघाड झाला होता. यामुळे संपूर्ण देशाची विमानसेवा विस्कळीत झाली. हजारो प्रवाशांना तासन्तास विमानतळांवर थांबावे लागले, अनेक जण आपल्या गंतव्यस्थानी पोहोचू शकले नाहीत. या घटनेमुळे भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते, हे स्पष्ट झाले. ◀(वृत्तसंस्था)

# इस्रोचा बाहुबली लाँच!



### ब्लूबर्ड ब्लॉक-३ एलव्हीएम ३ रॉकेटवरून प्रक्षेपित

### जगातील सर्वांत वजनदार उपग्रह

◆ **श्रीहरीकोटा, २४ डिसेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) बुधवारी सकाळी आंध्रप्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून ३-६ रॉकेट वापरून अमेरिकन उपग्रह ब्लूबर्ड ब्लॉक-२ चे प्रक्षेपण केले. ब्लूबर्डचे वजन ६,१०० किलोग्रॅम आहे. भारताने प्रक्षेपित केलेला आतापर्यंतचा सर्वात वजनदार उपग्रह बनला आहे.

ज्या ३ रॉकेटवर ते प्रक्षेपित केले गेले त्याचे वजन ६४० टन आहे, ज्यामुळे ते भारतातील सर्वात वजनदार प्रक्षेपण वाहन बनले आहे. त्याची अफाट शक्ती, क्षमता आणि कामगिरीसाठी ते 'बाहुबली रॉकेट' म्हणून ओळखले जाते. ब्लूबर्ड ब्लॉक-२ हा पुढील पिढीचा संप्रेषण उपग्रह आहे जो ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी थेट सामान्य स्मार्टफोनवर आणण्यासाठी डिझाइन केलेला आहे. तो पृथ्वीवरील कुठूनही ४ आणि ५ व्हॉइस कॉल, व्हिडिओ कॉल, मेसेजिंग, स्ट्रीमिंग आणि डेटा सेवा सक्षम करेल.

प्रक्षेपणापूर्वी, इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी २२ डिसेंबर रोजी तिरुमला येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात पूजा केली. एलव्हीएम ३ रॉकेटद्वारे लो अर्थ ऑर्बिट (एलईओ) मध्ये पाठवला जाणारा हा आतापर्यंतचा सर्वात जड पेलोड असेल. यापूर्वी, सर्वात जड पेलोड ४,४०० किलोग्रामचा होता, जो नोव्हेंबर २०२४ मध्ये प्रक्षेपित करण्यात आला होता. ◀(वृत्तसंस्था)

### वैशिष्ट्ये



**वजन :** अंदाजे ६१०० ते ६५०० किलोग्रॅम

**आकार :** यात २२३ चौरस मीटर (अंदाजे २,४०० चौरस फूट) फेज्ड ॲरे अँटेना आहे, यामुळे तो पृथ्वीच्या खालच्या कक्षेत तैनात होणारा सर्वात मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह

**क्षमता :** हे ४ आणि ५ नेटवर्कला समर्थन देते आणि अंतराळातून थेट मानक स्मार्टफोनवर हाय-स्पीड ब्रॉडबँड प्रदान करेल.

**वेग :** प्रति कव्हरेज सेल १२०एमबीपीएसपर्यंतचा पीक डेटा स्पीड, व्हॉइस कॉल, व्हिडीओ कॉल, मजकूर, स्ट्रीमिंग आणि डेटा सेवांना समर्थन देतो.

**उद्देश :** हा उपग्रह एएसटी स्पेस मोबाईलच्या जागतिक नक्षत्राचा भाग आहे, जो जगभरात २४ तास कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. यामुळे दुर्गम भाग, महासागर आणि पर्वतांपर्यंत मोबाईल नेटवर्कचा विस्तार होईल. ■

# सोलापूरच्या प्रज्वल जोशीचा दिल्लीत डंका; केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते झाला सन्मान

**नवी दिल्ली, दि.२४ डिसेंबर**

सोलापूरचा सुपुत्र प्रज्वल जोशी याने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याबद्दल त्याचा २४ डिसेंबर रोजी नवी दिल्लीच्या 'भारत मंडपम' येथे झालेल्या 'राष्ट्रीय ग्राहक दिना'च्या विशेष कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय राज्यमंत्री बी. एल. वर्मा यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.




खरगपूर (प.बंगाल) येथील आयआयटीत नुकत्याच झालेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत मुंबईच्या व्हीजेटीआयच्या टीमचे नेतृत्व प्रज्वलने केले होते. त्यांच्या टीमने कांद्याच्या साठवणूकीबाबतचा प्रकल्प सादर केला होता. त्यास प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्याबद्दल केंद्रीय ग्राहक मंत्रालयाने हा सत्कार केला. यावेळी व्यासपीठावर ग्राहक विभागाच्या सचिव निधी खरे, संयुक्त सचिव अविनाश जोशी, अनुपम मिश्रा, भारत मानक ब्युरोचे प्रमोदकुमार तिवारी, उपसचिव प्रमोदकुमार साहु यांची उपस्थिती होती. प्रज्वल जोशी सोबत टीममधील सहकारी मंजुषा गोरे हिचाही सन्मान करण्यात आला. प्रज्वलच्या टीमने केलेल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाला परीक्षकांनी सर्वोत्तम ठरवले. डिजिटल इंडिया आणि तांत्रिक प्रगतीच्या युगात सोलापूरच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश कौतुकास्पद मानले जात आहे.

# 'एमपीएससी'कडून उत्तरपत्रिकेत मोठे बदल; आता चारऐवजी पाच पर्याय

**पुणे, २४ डिसेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या विविध वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांच्या उत्तरपत्रिकेत व्यापक बदल करण्यात आले आहेत. यासंदर्भातील अधिकृत प्रसिद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले असून हे नवीन बदल १ मार्च २०२६ नंतर होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी लागू होणार आहेत.



आयोगाने प्रसिद्धीपत्रक नमूद केले आहे की, मूळ उत्तरपत्रिका दोन भागांत विभागली जाईल. ती भाग-१ आणि भाग-२ अशी असेल. भाग-१ : हा भाग केवळ उमेदवारांना प्रश्नांची उत्तरे नोंदविण्यासाठी असेल. तर भाग-२ यामध्ये उमेदवाराचे नाव, बैठक क्रमांक, विषय संकेतांक, प्रश्नपत्रिका क्रमांक आणि स्वाक्षरी यांसारखा वैयक्तिक तपशील असेल. परीक्षा संपल्यानंतर समवेक्षक उत्तरपत्रिकेतील भाग-१ आणि भाग-२ वेगळे करतील. यामुळे उत्तरपत्रिकेच्या मूल्यमापन प्रक्रियेत अधिक गोपनीयता राखली जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिली आहे. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आता उत्तरपत्रिकेवर चार ऐवजी पाच पर्याय असतील. उमेदवाराला एखाद्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे नसेल, तर त्याला पाचवा पर्याय निवडणे अनिवार्य आहे. प्रत्येक प्रश्नासाठी पाचपैकी एक तरी वर्तुळ छायांकित करणे आवश्यक आहे. उमेदवाराने पाच पैकी एकही वर्तुळ रंगवले नाही, तर त्या प्रश्नासाठी २५ टक्के (१/४) गुण वजा केले जातील. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आता उत्तरपत्रिकेवर चार ऐवजी पाच पर्याय असतील.

## तातडीने पाहिजेत

सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) **बातमीदार** ४ पदे
२) **क्राईम रिपोर्टर** १ पद

दैनिकातील कामाचा किमान एक वर्ष अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क : ९८८११९१४४३**

**पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### सोशल उर्दू प्रशालेत अल्पसंख्याक हक्क दिन साजरा

**सोलापूर, दि.२४ डिसेंबर-**

एस.एस.ए. उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात कुराण पठणाने करण्यात आली. कार्यक्रमात सहशिक्षक इरफान बानकरी यांनी अल्पसंख्यांक समुदायाच्या हक्कांबाबत माहिती देत संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकारांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक रिजवान शेख यांनी भूषविले. उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षक रसूल चौधरी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे, सहशिक्षक अझहर चितापुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षक इरफान बानकरी यांनी केले. राहिल मुल्ला यांनी आभार मानले.



### शेळगाव आर येथील जि.प. शाळेत जागतिक मृदा दिन साजरा

**वैराग, दि. २४ डिसेंबर-**


येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेळगाव आर. येथे 'जागतिक मृदा दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना जमिनीचे आरोग्य आणि मातीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे औचित्य साधून पंचायत समिती बार्शी, मिशन महाग्रामचे तालुका समन्वयक रवी पवार आणि कृषी सहाय्यक सूर्यकांत नुरुंदे यांनी विद्यार्थ्यांना मातीविषयक समग्र माहिती दिली. मातीचा पोत कसा ओळखावा, पिकांसाठी सुपीक जमिनीचे महत्त्व आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मातीचे संवर्धन का गरजेचे आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. याप्रसंगी मुख्याध्यापिका शैलजा उकिरडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमास शाळेतील उपशिक्षक रंगनाथ काकडे, युवराज यादव, दत्तात्रय सावंत, तसेच उपशिक्षिका स्वाती चव्हाण, वैशाली नावगुडे, पल्लवी भालशंकर आणि सुषमा मिटकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी माती वाचवण्याची शपथ घेतली.



### वाळूज येथे बालआनंद बाजार; गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वाळूज, दि २४ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत व्यवहारज्ञान वृध्दिंगत व्हावे म्हणून जि. प. प्राथमिक शाळा वाळूज येथे शनिवार,दि २० रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत बालआनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या बाजाराचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाबासाहेब मोटे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. या बाजारामध्ये ३० स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद लुटला. समोसे, वडापाव, भजीपाव, भेळ यासह बिस्कीटे, चॉकलेट, वांगी, टॉमेटो, भोपळा, मिरच्या, भेंडी, भाज्या, मेथी, कोथिंबीर, कांदे, बटाटे, टोमॅटो आदी स्टॉल लावण्यात आले होते. व्यवहारातील नफा-तोटा, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी याचे प्रत्यक्ष ज्ञान विद्यार्थ्याला मिळावे व भावी आयुष्यातील विद्यार्थ्यांची व्यावसायिक जडणघडण सदर उपक्रमाच्या माध्यमातून व्हावी यासाठी या बाजाराचे आयोजन केल्याचे मुख्याध्यापक संजयकुमार आतकरे यांनी सांगितले. याप्रसंगी पांडुरंग घाडगे, आण्णासाहेब कादे, उत्कर्ष मोटे, कुमार कादे, राहुल मोटे, दशरथ कादे, ब्रम्हदेव कादे, लहू साठे, सुशांत घाडगे, कविता घळके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक संजयकुमार आतकरे, सहशिक्षक महेश बामणे, चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत यशस्वी आयोजन केले.





### सांगोल्यातील तीन कवयत्रींना साहित्य संमेलनाचे निमंत्रण

**सांगोला, दि. २४ डिसेंबर -**

सांगोला शहरातील सुवर्णा तेली, हर्षदा गुळिमरे आणि मनीषा ठोंबरे या तीन कवयत्रींना सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात काव्यवाचन व सादरीकरणासाठी निमंत्रण मिळाले आहे. या संमेलनात दि. १ जानेवारी रोजी सुवर्णा तेली, दि.२ जानेवारी रोजी हर्षदा गुळिमरे तर दि.४ जानेवारी रोजी मनीषा ठोंबरे काव्यसादरीकरण करणार आहेत. मनीषा ठोंबरे यांचे काव्यपूर्ती आणि भावगंध हे दोन काव्यसंग्रह यापूर्वीच प्रकाशित झाले असून हर्षदा गुळिमरे आणि सुवर्णा तेली यांचे काव्यसंग्रह सध्या प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; सवा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

## २५ ताब्यात, ५ पळून गेले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

गुन्हे शाखेच्या वतीने सोलापूर शहरात जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये जुगार खेळणाऱ्या २५ जणांना शहर गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. गर्दीचा फायदा घेवून शेडच्या मागील दरवाजातून ५जण पळून गेले. या छापा कारवाईमध्ये जुगार खेळताना तेथे मिळून आलेली रोख रक्कम तसेच पत्याचा कॅट, डीव्हीआर, इंन्वरटर व लोखंडी कपाट असा २ लाख ३१ हजार ४०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

महापालिका निवडूका अनुषंगाने सोलापूर शहरामध्ये चालणाऱ्या अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आदेश दिले. त्यानुसार दि.२३ डिसेंबर रोजी अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांना सातरस्ता येथील इंडीया टि हाऊसच्या बोळात रौफ भंडाले नावाचा इसम जुगाराचा अड्डा चालवत असलेबाबत माहीती प्राप्त झाली. सदर प्राप्त माहीतीच्या अनुषंगाने अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांनी सपोनि निलेश पाटील-सोनवणे, सपोनि विजय पाटील व त्यांचे तपास पथकास यांना सातरस्ता येथील इंडीया टि हाऊसच्या बोळात चालु असलेल्या जुगार अड्यावर छापा टाकुन कायदेशीर कारवाई करणेबाबतचे आदेश दिले होते. या आदेशाप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश पाटील-सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने सातरस्ता येथील इंडीया टि हाऊसच्या पाठीमागे पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्यावर छापा टाकला असता त्या ठिकाणी एकुण ३० इसम पत्त्याच्या डावावर जुगार खेळत असताना आढळून आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश पाटील-सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने जुगार खेळणाऱ्या एकुण २५ इसमांना ताब्यात घेतले. या प्रकरणी सदर बझार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासा दरम्यान हा जुगार अड्डा हा रौफ भंडाले व रियाज हुंडेकरी हे चालवत असल्याचे निष्पन्न झाले असून त्या दृष्टीने पुढील कायदेशीर कारवाई चालू केली आहे.

ही कामगिरी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. अश्वीनी पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.), राजन माने, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश पाटील-सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पाटील, राहुल तोगे, विद्यासागर मोहिते, जावीद जमादार, विजयकुमार वाळके, आबाजी सावळे, पोशि/१५२० गणेश शिंदे, धिरज सातपुते, विठ्ठल यलमार यांनी केली.

**जुगार खेळताना पकडलेले व पळून गेलेले**

**पकडलेले :** जावेद बैतुल शेख, राजू आनंद जाधव, आशपाक कादर शेख, जयराज शाहुल सांगे, विनायक विठ्ठल गायकवाड, प्रताप शंकर गायकवाड, कल्याणी शामराव आडकी, मनिष रामू जाधव, शंकरगौडा शिवणगौडा पाटील, विक्रम मदन गायकवाड, जाकीर महमद हनीफ शेख, यलप्पा यमनप्पा जाधव, सिद्राम अशोक कोनीन, चाँद सैफन नदाफ, जगन अमृत पात्रे, अब्दुल मजस्दि गफुर पठाण, जिलानी हाजी मंलग विजापूरे, जगदीश नागप्पा भुताळे, इरफान सैफन मलगान, गोरख पुंडलिक घुले, कपिल मारूती कांबळे, विजय ऊर्फ गुडू चंद्रकांत जाधव, बिलाल जाकीर शेख, शफिक बाबासाब शेख, लक्ष्मण चंद्राम आसादे.

**पळूण गेलेले:** दिपक लक्ष्मण जाधव, विकास विद्याधर गायकवाड, इसाक मक्तुम अत्तार, वसीम महिबुब पठाण, युन्नुस महिबुब शेख.

# बार्शीत दारुच्या नशेत विद्यार्थ्यावर चाकू हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ डिसेंबर-**

बार्शी शहरातील मलिक चौक परिसरात दारुच्या नशेत दोन तरुणांनी एका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून, सध्या त्याच्यावर सुविधा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, समीर सरदार पठाण (वय २०, रा. मलिक चौक, बार्शी) हा बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये बी. कॉम द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. दि. २१ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास तो मलिक चौक परिसरात एकटाच उभा असताना बारंगुळे प्लॉट येथील कबीर मोमीन व मुजम्मील काझी हे दोघे दुचाकीवरुन तेथे आले. दोघेही दारुच्या नशेत होते. त्यांनी विनाकारण शिवीगाळ सुरु करत पॅन्टच्या खिशातून लहान चाकू काढून कबीर मोमीन याने समीर पठाण यांच्या उजव्या गालावर, नाकावर, डोळ्याजवळ तसेच कपाळाच्या डाव्या बाजूला चाकूने वार करुन गंभीर जखमी केले. तर

मुजम्मील काझी याने पाठीवर डाव्या खांद्याजवळ चाकूने वार करत चाकू उलटा धरुन मुठीने पाठीत मारहाण केली. झटापटीदरम्यान समीरच्या डाव्या हाताच्या मनगटालाही चाकू लागून जखम झाली.

पीडित तरुण जोरात ओरडत असताना परिसरातील मित्र मोहसिन शेख, सादिक शेख व रियाज मोमीन हे घटनास्थळी धावून आले व मध्यस्थी करुन भांडण थांबवले. त्यानंतर आरोपी दोघेही दुचाकीवरुन घटनास्थळावरुन पसार झाले. या हल्ल्यात समीर पठाण यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाची सोन्याची चैन गहाळ झाल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर जखमी समीर पठाण यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी कबीर मोमीन व मुजम्मील काझी (रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी) यांच्याविरुद्ध चाकू हल्ला, मारहाण, शिवीगाळ व धमकी या संदर्भात गुन्हा दाखल झाला आहे.

### कर्मवीर विद्यालय चारे येथे होणार 'भारत स्काऊट गाईड'चा जिल्हा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा भारत स्काऊट गाईड व कब बुलबुल यांचा जिल्हा मेळावा दि. २६ ते २९ डिसेंबर या कालावधीमध्ये कर्मवीर नगरी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर विद्यालय चारे या ठिकाणी संपन्न होणार आहे. जिल्हाभरातून पंधराशे विद्यार्थी या मेळाव्या मध्ये सहभागी होणार आहेत.

या मेळाव्यामध्ये स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी ॲडवेंचर गेम, फनी गेम, शोभायात्रा, बिनमांड्याचा स्वयंपाक, संचलन, बँड पथक, शेकोटी अशा विविध कार्यक्रमांची तब्बल ३ दिवस रेलचेल असणार आहे.

याप्रसंगी विविध शासकीय अधिकारी, शैक्षणिक अधिकारी मेळाव्यामध्ये उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याची पूर्वतयारी झाली असून, या पूर्वतयारीसाठी प्राचार्य हनुमंत चव्हाण, शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, जिल्हा स्काऊट गाईड समन्वयक श्रीधर मोरे, श्रीमती अनुसया शिरसाठ, स्काऊट गाईड लीडर ट्रेनर यादव, पठाण, पुजारी, उपळकर व संस्थेतील सर्व कर्मचारी अविरतपणे मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## ज्ञान, कला, क्रीडा गुणांनी युक्त पिढीच राष्ट्राचे नाव उज्वल करेल

### वेळापुरातील स्नेहसंमेलनात प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांचे प्रतिपादन




**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २४ डिसेंबर-**

ज्ञान कला आणि क्रीडा गुणांनी संपन्न असणारी पिढी राष्ट्राचे नाव उज्वल करते, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले.

ते वेळापूर (ता. माळशिरस) येथील इंग्लिश स्कूल जुनिअर कॉलेज वेळापूर प्रशालेत आयोजित केलेल्या दोन दिवसीय स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य यशवंत पाटणे, डॉ. मीना कदम, संस्था सचिवा डॉ. प्रियदर्शनी कदम महाडिक, माजी जि.प. सदस्य सतीशराव माने देशमुख, माजी जि.प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, वेळापूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, काकासाहेब जाधव, प्रतापराव पाटील, प्राचार्य आर.बी. पवार, मिलिंद सरतापे, गोपाळ क्षिरसागर, सरपंच जिजा गवळी, अमोल मंडलिक, दिलीप जगदाळे, पठाण शिवशरण, बी.एस.सावळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मीना कदम या होत्या. प्रारंभी कदम गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रस्ताविक डी. पी. पालवे यांनी केले तर अहवाल वाचन प्राचार्य आर.बी. पवार यांनी केले. तसेच राष्ट्रीय खेळाडू, राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले व सुयश मिळवलेले विद्यार्थी रामजी कश्यप, गणेश बोरकर, सुहान आतार, प्राजक्ता बनसोडे, श्रीधर भोसले, शंभुराजे चंदनशिव, अरमान शेख, सिद्धार्थ माने-देशमुख, अश्विनी मांडवी, राजवीर साठे व आर्मीत निवड झालेले अनिल शेंडगे या सर्वांचा सन्मान करण्यात आला. दहावी आणि बारावी परीक्षेमध्ये यश मिळवलेले विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन विद्या रामगुडे, रूपाली बाबर व सतीश कदम यांनी केले तर आभार पठाण शिवशरण यांनी मानले.



### बार्शी बाजार समितीच्या उपसभापतीपदी निवड झाल्याबद्दल बाबा गायकवाड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २४ डिसेंबर-**

बार्शी तालुक्याचे नेते व माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी बाबा गायकवाड यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे.

या निवडीचे औचित्य साधून शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या निवडीमुळे शेळगाव (आर) परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. पुण्यतिथी आणि सत्कार सोहळ्याचा दुग्धशर्करा योग संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. नानासाहेब गायकवाड यांच्या ३४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मणरा गायकवाड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नामवंत व्याख्याते प्रा. वसंत हंकारे उपस्थित होते. विद्यार्थी व पालकांसाठी व्याख्यान कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. वसंत हंकारे यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. यावेळी संचालक लक्ष्मणराव गायकवाड, भारत देशमुख, बळीराम बादगुडे, वासुदेव गायकवाड, सचिन बादगुडे, बजरंग गायकवाड, मुख्याध्यापक सुनील गोरे, धनाजी शिंदे, बाळासाहेब साळुंके, तिटके उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रणजित गायकवाड यांनी केले. प्रविण गाढवे यांनी आभार मानले.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारिणीची उद्या मोहोळ येथे बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची शुक्रवारी (दि.२६) सकाळी दहा वाजता मोहोळ येथील सावली निवासस्थानी बैठक आयोजित केली असल्याचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी सांगितले.

बैठकीमध्ये आगामी निवडणुकांसाठी पक्षाची रणनीती, संघटनात्मक मजबुती, बूथ पातळीवरील तयारी, तसेच कार्यकर्त्यांची जबाबदारी व इच्छुक उमेदवार यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. याच बैठकीदरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारीसाठी मागणी अर्ज उपलब्ध केले जाणार आहेत. जिल्हा परिषद पुरुष उमेदवारासाठी दोन हजार रुपये,महिला व राखीव उमेदवारांना एक हजार रुपये तसेच पंचायत समिती इच्छुक उमेदवारासाठी एक हजार रुपये व महिला व राखीव जागेसाठी ५०० असे अर्जाचे शुल्क असेल. त्यामुळे निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे. बैठकीस सोलापूर जिल्ह्याचे जेष्ठ नेते बळीराम काका साठे,माजी आमदार संजय मामा शिंदे,प्रदेश प्रतिनिधी कल्याणराव काळे, कौशिक गायकवाड, लतिफ तांबोळी, बाळासाहेब बंडगर, रामेश्वर मासाळ यांची उपस्थित राहणार आहे.

**बैठकीसाठी तालुका निहाय वेळापत्रक**

माढा : सकाळी १० वाजता, दक्षिण सोलापूर १०.३० वा., उत्तर सोलापूर : ११ वाजता, पंढरपूर : सकाळी ११.३०, करमाळा : दुपारी १२, अक्कलकोट : १२.३०, मंगळवेढा : दुपारी १.०० वाजता बार्शी : १.३०, सांगोला : दु.२.००, मोहोळ : २.३०, माळिशरस : ३. या प्रमाणे सर्व तालुक्यातील पदाधिकारी यांच्या बैठका पार पडतील.सदर बैठकीसाठी सर्व तालुका कार्यकारीणी,जिल्हा कार्यकारिणी,प्रदेश पदाधिकारी,सर्व फ्रंटल व सेलच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे जिल्हाध्यक्ष पाटील यांनी सांगितले आहे.

## विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षकांचे व माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे

### प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा; 'स्वेरी' मध्ये माजी विद्यार्थी मेळावा व पदवीप्रदान सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ डिसेंबर-**

'महाविद्यालयाची प्रगती ही सर्वस्वी विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर अवलंबून आहे आणि विद्यार्थी प्रगत झाला तर शिक्षकांची खरी प्रगती होत असते. यासाठी शिक्षकांनी देखील प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे प्र.कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

येथील स्वेरीजब कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'ऋणानुबंध २०२५' हा माजी विद्यार्थी मेळावा व २०२५ च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'पदवीप्रदान सोहळा' हे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात प्र. कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सुरवातीला प्रा. अविनाश मोटे यांनी 'माजी विद्यार्थी असोसिएशनचा लेखा-जोखा मांडला. माजी विद्यार्थी मेळाव्याला २००३ च्या बॅचचे माजी विद्यार्थी विजयकुमार भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. स्वेरीच्या २००३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थिनी व 'एमफासेस' या कंपनीच्या मृणाल पाटील ह्या देखील उपस्थित होत्या. पदवी घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव राहावी यासाठी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. शपथ पत्राचे वाचन प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. 'ऋणानुबंध २०२५' या माजी विद्यार्थी मेळाव्याला



देशभरात विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या स्वेरीच्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी प्रमुख पाहुणे विजयकुमार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी यशस्वी स्वेरीचे माजी विद्यार्थी तथा यशस्वी उद्योजक असलेले सुभाष काकडे यांनी देखील मार्गदर्शन केले. यावेळी ॲल्युमिनी असोसिएशनच्या वतीने महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. पदवीप्रदान समारंभ प्रसंगी इमारतीच्या प्रवेशद्वारापासून ते मुख्य रंगमंचापर्यंत परीक्षा विभागाचे स्वेरीचे नियंत्रक डॉ. एस. ए. लेंडवे यांच्या नेतृत्वाखाली ज्ञानदंडाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ॲल्युमिनी असोसिएशनचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, एचसीएल कंपनीचे डॉ. योगीराज दामा, संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मनियार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरीचे परीक्षा नियंत्रक डॉ. सतीश लेंडवे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके यांनी आभार मानले.

# बांगलादेशात हिंदूंवर २,५०० हल्ले

## ईश्वरनिंदेच्या आरोपाखाली हत्या

◆ **नवी दिल्ली, २४ डिसेंबर**

ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर हिंदू अल्पसंख्याकांवर हल्ले वाढले आहेत. बांगलादेश हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन युनिटी कौन्सिल (बीएचबीसीयूसी) आणि इतर अहवालांनुसार, ऑगस्ट २०२४ ते जून २०२५ पर्यंत, मंदिरांची तोडफोड, घरे जाळणे आणि खून यासह हिंदूंवर २,४४२ हून अधिक हल्ले झाले. यापैकी अनेक हत्या राजकीय सूड किंवा कथित ईशनिंदेमुळे झाल्या. काही अहवालांमध्ये या हत्या धार्मिक द्वेषाशी जोडल्या गेल्या आहेत, तर काहींनी राजकीय हेतूंचा उल्लेख केला आहे.

१८ डिसेंबर रोजी, ढाकाजवळील भालुका येथे दीपू चंद्रा या हिंदू तरुणाची मारहाण करून हत्या करण्यात आली. हल्लेखोरांनी त्याच्यावर ईशनिंदेचा आरोप केला. दीपू एका कापड कारखान्यात काम करत होता. असा दावा करण्यात आला होता की दीपूने फेसबुकवर धार्मिक भावना दुखावणाऱ्या टिप्पण्या पोस्ट केल्या होत्या, परंतु तपासात अशा टिप्पण्यांचे कोणतेही पुरावे आढळले नाहीत. ही हत्या एका कारखान्यातील कामावरून झालेल्या वादातून झाली.

हिंदूंच्या हत्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत आणि डिसेंबरमध्येच अत्याचार शिगेला पोहोचले. रंगपूरमध्ये, ईशनिंदेच्या आरोपाखाली दुकानदार उत्तम कुमार बर्मन यांची मारहाण करून हत्या करण्यात आली. बारा जणांना अटक करण्यात आली. नरसिंगडीमध्ये, ज्वेलर्स प्रांतोष कर्माकर यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. फरीदपूरमध्ये, मासे व्यापारी उत्पल सरकार यांची हत्या करण्यात आली. रंगपूरमध्ये, स्वातंत्र्यसैनिक जोडपे योगेश चंद्र रॉय आणि सुवर्णा रॉय यांना क्रूरपणे मारहाण करण्यात आली आणि त्यांच्या डोक्याला दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. शिवाय, ऑगस्ट २०२४ मध्ये, शाळेतील शिक्षिका मृणाल कांती चक्रवर्ती यांची बागेरहाट येथील तिच्या घरी हल्ला केल्यानंतर हत्या करण्यात आली. (वृत्तसंस्था)

### ऑगस्टमध्ये पाच जणांची हत्या

**ऑगस्ट २०२४ च्या सुरुवातीच्या हिंसाचारात किमान पाच हिंदूंची हत्या करण्यात आली होती, परंतु बहुतेकांची नावे जाहीर करण्यात आली नव्हती. बीएचबीसीयूसीने सप्टेंबर २०२४ मध्ये नऊ हिंदू पुरुषांच्या हत्येचा संबंध धार्मिक द्वेषाशी जोडला होता, तर काही तपासात राजकीय हेतूंचा उल्लेख होता. हसीनाच्या जाण्यापासून एकूण २३ ते २७ हिंदू हत्या झाल्याची नोंद झाली आहे.**

# सोलापुरात महाविकास आघाडीचे ठरले; मात्र काही जागांवर घोडे अडले...



## युतीमुळे मनसेला शिवसेनेच्या कोट्यातून मिळणार जागा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ डिसेंबर-**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक बुधवारी दुपारी साडेबारा त्यानंतर संध्याकाळी आठ वाजता दोन बैठकी संपन्न झाल्या. या दोन्ही बैठकीत एकत्रित महाविकास आघाडी करूनच महापालिका निवडणूक लढवण्याचा चंग बांधण्यात आला.

परंतु काही मोजक्या जागांवर आघाडीचे घोडे अडले. तर दुसरीकडे शिवसेना आणि मनसे युती झाल्याने शिवसेनेच्या कोट्यातून मनसेला जागा देण्याचे शिक्कामोर्तब या बैठकीत झाले. दरम्यान, शिवसेना उद्धवसेना आणि मनसे यांची युती मुंबईत झाल्यानंतर दुपारी एक वाजता सोलापूर शहरात शिवसेना आणि मनसेच्या वतीने जल्लोष करण्यात आला. त्यानंतर बैठकीमध्ये शिवसेनेच्या कोट्यातूनच मनसेला जागा देण्याचे ठरवण्यात आले आहे. त्यानुसार मनसेला दोन जागा देण्यासंबंधी ग्रीन सिग्नल मिळाला असल्याचे सांगण्यात आले. मात्र, आघाडीच्या चार ते पाच जागांवर सर्व पक्षांचे एकमत झाले नाही. तर अशातच काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे अचानक मुंबईला रवाना झाल्याने बैठक आहे त्या ठिकाणीच थांबवण्यात आली. शिवसेनेचे पुरुषोत्तम बरडे आणि गणेश वानकर हे देखील या बैठकीस उपस्थित नसल्याने या बैठकीत आघाडीचा शेवटचा तोडगा निघाला नाही. सर्व पक्ष नेत्यांच्या उपस्थितीत पुन्हा एकदा बैठक घेऊन अंतिम यादी जाहीर करण्यात येईल, असेही आघाडीच्या समन्वय समितीच्या वतीने सांगण्यात आले.

### आघाडीचा इलेक्टिव्ह फॉर्म्युला कायम

महाविकास आघाडीमध्ये इलेक्टिव्ह फॉर्म्युला कायम राहणार आहे. ज्या प्रभागात ज्या पक्षाच्या नगरसेवकांचे प्राबल्य आहे. त्याठिकाणी त्या पक्षाला जागा सोडण्यात येणार आहे. महाविकास आघाडीतील जवळपास ९५ टक्के जागा फायनल झाल्या आहेत. ५ टक्क्यातील जागांवर सहमती झाली नाही. अशामध्ये काही नेते बैठकीला गैरजर होते. तर काही नेते मुंबईला रवाना झाले. त्यामुळे यावर अंतिम निर्णय येत्या दोन दिवसात घेण्यात येणार आहे.

**- महेश गादेकर, शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार**

### शिवसेनेच्या कोट्यातून मनसेला जागा देण्याचे ठरले

शिवसेना आणि मनसे यांची युती झाली आहे. राज्यस्तरावर ही युती झाली असून संपूर्ण महापालिकेत ते लागू होणार आहे. त्यामुळे शिवसेनेच्या कोट्यातून मनसेला जागा देण्याचे बैठकीत ठरवण्यात आले आहे. काही जागांवर आघाडीचे एकमत झालेले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा आघाडीतील सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

**- अजय दासरी, शहर प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना**

### अंतिम यादी लवकर जाहीर करू

महाविकास आघाडीची दुपारी बैठक संपन्न झाली. त्यामध्ये जवळपास सर्व जागांबाबत सहमती दर्शवण्यात आली आहे. काही मोजक्या जागा आहेत. त्या ठिकाणी एक मत झालेले नाही. त्यावर लवकरच बैठक घेऊन निर्णय घेऊ. त्यानंतर अंतिम यादी जाहीर करू.

**- चेतन नरोटे, शहराध्यक्ष काँग्रेस**

# विमान अपघातात लिबियाच्या लष्करप्रमुखासह आठ ठार



◆ **अंकारा, २४ डिसेंबर**

लिबियाचे लष्करप्रमुख जनरल मोहम्मद अल-हद्दाद यांच्यासह आठ लष्करी अधिकाऱ्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. तुर्कीचा दौरा आटोपून फाल्कन-५० विमानाने मायदेशी परत येते असताना अंकाराजवळील हायमाना परिसरात विमान कोसळले. यात विमानातील सर्वच जणांचा मृत्यू झाले.

गृहमंत्री अली येरलिकाया यांनी सांगितले की, लिबियाचे लष्करी शिष्टमंडळ संरक्षण बैठकीत भाग घेण्यासाठी तुर्कीला आले होते. या शिष्टमंडळात लष्करप्रमुख हद्दाद यांचा समावेश होता. मंगळवारी रात्री फाल्कन-५० विमानाने लष्करप्रमुखांसह सात सदस्यीय शिष्टमंडळ मायदेशी परत जात असताना अंकाराजवळील हायमाना परिसरात विमान कोसळले. बुधवारी शोधमोहिम राबवली असता, सुरक्षा दलाला विमानाचा ढिगारा आढळून आला. या अपघातात शिष्टमंडळातील सात आणि एका वैमानिकांसह सर्वांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. विमानाने उड्डाण केल्यानंतर ३० मिनिटांनी तांत्रिक बिघाड झाला होता, ज्यामुळे हा अपघात घडला. लिबियाचे पंतप्रधान अब्दुल-हामिद दबैबा यांनी निवेदन जारी करून जनरल अल-हद्दाद आणि इतर अधिकाऱ्यांच्या मृत्यूची पुष्टी केली आणि याला देशासाठी मोठे नुकसान म्हटले. विमानाने हायमाना परिसराजवळ आपत्कालीन लँडिंगचा संकेत पाठवला होता, परंतु त्यानंतर कोणताही संपर्क होऊ शकला नाही. या घटनेनंतर अंकारा विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आणि अनेक विमानांना दुसऱ्या विमानतळावर वळवण्यात आले. तुर्कीच्या न्याय मंत्रालयाने या घटनेच्या चौकशीसाठी चार अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. (वृत्तसंस्था)

# रशियाच्या हल्ल्याने युक्रेनमध्ये विध्वंस

## ६५० ड्रोन, ३६ क्षेपणास्त्रांचा १३ प्रदेशांत मारा, १६ नागरिकांचा मृत्यू

◆ **कीव्ह, २४ डिसेंबर**

युक्रेनच्या १३ प्रदेशांना लक्ष्य करीत रशियाच्या वायुदलाने मंगळवारी रात्री ६५० ड्रोन आणि ३६ क्षेपणास्त्रांनी मारा केला. यात १६ नागरिकांचा मृत्यू, तर ३२ जण जखमी झाले. या हल्ल्यात युक्रेनमधील पायाभूत सुविधा आणि ऊर्जा प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले आहे.

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, नुकत्याच झालेल्या बॉम्बस्फोटातून रशियाचे राष्ट्रध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा युक्रेनवर हल्ला सुरू ठेवण्याचा हेतू स्पष्टपणे दिसून येतो. पुतिन अमेरिकेच्या नेतृत्वाखालील शांतता प्रयत्नांना गांभीर्याने सहकार्य करत नसल्याने रशियाविरोधात एकत्र येण्याची वेळ आली आहे. मंगळवारी रात्री रशियाने निवासी भाग आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात १६ निष्पाप नागरिकांना प्राणास मुकावे लागले, तर ३२ जण जखमी आहे. अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या असून, ढिगाऱ्यात अडलेल्या नागरिकांचा बचावपथकाकडून शोध सुरू आहे. दुसरीकडे युक्रेनियन लष्कराने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, रशियाने काही तासातच ६५० हून अधिक ड्रोन आणि ३६ क्षेपणास्त्रांचा वापर करून युक्रेनवर मोठा हल्ला केला. १३ युक्रेनियन भागात झालेल्या या हल्ल्यात तीन मुलांसह १६ नागरिकांचा मृत्यू झाला. निवासी इमारती, वीज प्रकल्प, रेल्वे स्थानके, रेल्वे रुळांचे मोठे नुकसान झाले आहे. हल्ल्यामुळे विविध भागातील वीजपुरवठा खंडित झाला आहे. (वृत्तसंस्था)



### नाताळात रक्तपात घडविण्याचा डाव

झेलेन्स्की म्हणाले, नाताळच्या काही तासापूर्वी झालेला हल्ला रक्तपात घडविण्यासाठी करण्यात आला. युद्धबंदीच्या वाटाघाटीला यामुळे अडथळा येऊ शकतो. अमेरिकेने सादर केलेला रशिया-युक्रेन शांतता कराराच्या प्रारंभिक मसुद्यावर आम्ही सहमत आहे, मात्र रशियाच्या हल्ल्याने करार अडचणीत येऊ शकतो. वाटाघाटी सुरू असताना युक्रेनवरील हल्ले युद्धाला चिथावणी देणारे आहे. पुतिन यांना युद्ध संपविण्याची इच्छा असल्यास त्यांना रक्तपात थांबवावा लागेल.

### युक्रेनला मदतीची आवश्यकता

झेलेन्स्की यांनी सांगितले की युक्रेनला दररोज आंतरराष्ट्रीय मदतीची आवश्यकता आहे. यामध्ये हवाई संरक्षण क्षेपणास्त्रे, शस्त्रास्त्र निर्मितीसाठी निधी यांचा समावेश आहे. युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी माझी चर्चा झाली, त्यांनी २०२६-२७ साठी ९० अब्ज युरो आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे.

### रशियावर दबाव वाढवावा

जर रशियाने शांतता प्रयत्न सोडून दिले तर त्याच्यावर आणखी दबाव आणणे आवश्यक असेल. जगाकडे रशियावर प्रभावीपणे दबाव आणण्यासाठी सर्व मार्ग उपलब्ध आहेत. अमेरिकेच्या शांतता कराराला आमचे समर्थन असून युक्रेनचा पूर्ण पाठिंबा आहे. तथापि, जर रशियाने युद्ध संपवण्याबाबत गांभीर्य दाखवले नाही तर शांतता अशक्य असल्याचे झेलेन्सकी म्हणाले.

# देशातील हिंदू-मुस्लिम समस्येला काँग्रेस जबाबदार

## सेक्युलॅरिझमचा चुकीचा अर्थ लावला

◆ **नवी दिल्ली, २४ डिसेंबर**

देशात आजही हिंदू-मुस्लिम संबंधित ज्या समस्या दिसतात, त्यांची कारणे काँग्रेसची धर्मनिरपेक्षतेची विचारसरणी आणि व्होट बँकेचे राजकारण आहे. काँग्रेसने सेक्युलरिझमचा चुकीचा अर्थ लावला, अशी स्पष्टोक्ती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली.



ते राजधानी दिल्लीत राजस्थान विधानसभेचे अध्यक्ष प्रा. वासुदेव देवनानी यांच्या 'सनातन संस्कृतीची अटल दृष्टी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. यावेळी उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन देखील उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री म्हणाले, सेक्युलरिझम म्हणजे धर्मनिरपेक्षता किंवा एखाद्या विशिष्ट वर्गाचे लांगूलचालन करणे नव्हे. याचा खरा अर्थ सर्व धर्म समभाव असा होतो, म्हणजेच सर्व धर्मांना समान आदर देणे, सर्वांना न्याय देणे आणि सर्वांशी समानतेने वागणे.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयींच्या विधानाचा पुनरुच्चार करत ते म्हणाले की, भारत आधीही सेक्युलर होता, आजही आहे आणि नेहमीच राहील. हे भाजपा-राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे नाही, तर भारतीय, हिंदू आणि सनातन संस्कृतीमुळे आहे, जी जगाचे कल्याण शिकवते. भारतीय संस्कृती सहिष्णू, करुणामय आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारी आहे आणि इतिहासात कोणत्याही हिंदू राजाने धार्मिक स्थळे नष्ट केल्याचे उदाहरण मिळत नाही. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### अक्षय खन्नाने 'दृश्यम ३' सोडल्याची चर्चा

**मुंबई** : सध्या 'धुरंधर'मुळे प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या अक्षय खन्नाची यापुढील भूमिका कोणती राहील, याविषयी प्रेक्षक उत्सुक असतानाच त्याने 'दृश्यम ३' सोडल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. अक्षय या चित्रपटात दिसणार याचा प्रेक्षकांना अपार आनंद झाला होता. मात्र, मिळालेल्या माहितीनुसार, त्याने मानधनात मोठी वाढ केली आहे. शिवाय त्याने 'दृश्यम ३'मधील त्याचा लूक बदलण्याचीही मागणी केली. यामुळे निर्माते आणि अक्षय यांच्यात वादाची ठिणगी पडली. अर्थात, अजूनही निर्माते किंवा अक्षय कोणीही हा चित्रपट त्याने सोडल्याचे अधिकृतरित्या जाहीर केलेले नाही. मात्र, 'दृश्यम ३' मधून अक्षय खन्नाचे बाहेर पडणे निर्मात्यांनाच जड जाईल, असे अनेकांचे मत आहे. निदान त्याची आताची लोकप्रियता पाहता त्याला घालवण्याचा धोका निर्माते पत्करणार नाहीत, अशी शक्यता आहे.



### ओटीटीवरही 'धुरंधर'ची कमाल

**मुंबई** : 'धुरंधर'ने चित्रपटगृहामध्ये कमाईचा अखंड प्रवाह सुरू ठेवला असतानाच ओटीटीवरही विक्रमी कमाईचे द्वार खुले केले आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रसिद्ध ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सने या चित्रपटाचे प्रसारणाचे हक्क विकत घेण्यासाठी विक्रमी बोली लावली आहे. नेटफ्लिक्सने 'धुरंधर'चे डिजिटल अधिकार तब्बल २८५ कोटी रुपयांना खरेदी केले आहेत. एखाद्या भारतीय चित्रपटासाठी हा आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या व्यवहारांपैकी एक मानला जात आहे. बॉक्स ऑफिसवर ६०० कोटींच्या घरात पोहोचल्यानंतर या ओटीटी करारामुळे चित्रपटाच्या कमाईत मोठी भर पडली आहे.




### अल्लू अर्जुनला मिळाला हजार कोटींचा चित्रपट



**मुंबई** : 'पुष्पा' चित्रपटामुळे प्रसिद्धीच्या लाटेवर स्वार असणारा दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुन याला एक हजार कोटींचे बजेट असणारा चित्रपट मिळाला आहे. हा पौराणिक चित्रपट राहणार असून याचे दिग्दर्शन त्रिविक्रम श्रीनिवास करतील. या दोघांचा सोबत हा चौथा चित्रपट असेल. दोघांची जोडी आतापर्यंत यशस्वी राहिली आहे. त्यामुळे हे दोघे पुन्हा एकत्र येणार म्हटल्यावर दाक्षिणात्य सिनेसृष्टीत खळबळ माजली आहे.



मुंबईत मंगळवारी रात्री संगीतकार राजेश रोशन यांचे पुत्र इशान याचा विवाह समारंभ पार पडला. या विवाहाला अभिनेता हृतिक रोशन दोन्ही पुत्र रिदान आणि रेहानसह उपस्थित होता

# प्रशासकीय क्षेत्रात देशातील पहिली क्यूआर कोड फीडबॅक प्रणाली सुरू

### हैदराबादमधील अनोखा प्रयोग

◆ **हैदराबाद, २४ डिसेंबर**

सार्वजनिक सेवा वितरण आणि जलद प्रतिसाद सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, हैदराबाद जिल्हा कलेक्टर हरि चंदना आयएएस यांनी हैदराबाद कलेक्टरेटमध्ये क्यूआर कोड आधारित जन फीडबॅक प्रणालीचा शुभारंभ केला आहे. हा उपक्रम देशातील आपल्या प्रकारातील पहिला असून, नागरिकांना मिळालेल्या सेवांबाबत आपला अनुभव थेट व सोप्या पद्धतीने शेअर करण्यासाठी प्रभावी माध्यम प्रदान करतो.

नवीन सुरू करण्यात आलेली ही प्रणाली नागरिक आणि सेवा पुरवठादार यांच्यातील संवाद अधिक सुलभ व परिणामकारक बनवण्यासाठी रचण्यात आली आहे. क्यूआर कोड स्कॅन करून भेट देणारे नागरिक त्वरित आपला फीडबॅक नोंदवू शकतात, ज्यामुळे अधिकाऱ्यांना सेवांच्या गुणवत्तेबाबत आणि कार्यक्षमतेबाबत रिअल-टाइम माहिती मिळते. ही व्यवस्था फीडबॅक संकलनातील पारंपरिक अडचणी जसे की विलंब, अकार्यक्षमता आणि पारदर्शकतेचा अभावदूर करण्यास मदत करणार आहे. या प्रणालीची एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे फीडबॅक देण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि सर्वांसाठी सुलभ आहे. आता नागरिकांना औपचारिक प्रक्रियेची वाट पाहण्याची किंवा गुंतागुंतीचे फॉर्म भरण्याची गरज नाही. क्यूआर कोडच्या माध्यमातून ते आपली तक्रार, सूचना किंवा प्रशंसा त्वरित नोंदवू शकतात. ही प्रणाली स्मार्टफोनशी सुसंगत आहे. (वृत्तसंस्था)

# मनुष्यापेक्षा जास्त पाणी पितो आहे 'एआय'!

◆ **नवी दिल्ली, २४ डिसेंबर**

'एआय' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता दिवसेंदिवस प्रगत होते आहे. मनुष्य छोट्या छोट्या गोष्टींसाठी एआयचा वापर करतो आहे. मोबाईलवर बोटे फिरवून प्रश्न टाइप केला जातो आणि काही सेकंदातच उत्तर मिळते. आज एआय आपल्या आयुष्याचा एक भाग झाला आहे. मात्र ही एआय प्रणाली कशी काम करते याचा आपण विचारही करत नाही.

आपण ज्या एआयला स्मार्ट, वेगवान आणि भविष्यवादी मानतो ते पृथ्वीवरील पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे. हा वापर आता धोक्याची घंटा ठरू लागला आहे. पाण्याचा वापर कमी कसा करायचा आणि कोणते पर्याय अस्तित्वात आहेत याबद्दल चर्चा सुरू झाल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींचा वार्षिक पाण्याचा वापर हा एका वर्षात जगभरात वापरल्या जाणाऱ्या बाटलीबंद पाण्यापेक्षा जास्त असू शकतो, असे अलिकडच्या संशोधनातून असे दिसून आले आहे. हा आकडा विचित्र वाटत असला तरी, तंत्रज्ञान उद्योगात हळूहळू वास्तव स्पष्ट होते आहे.

**वापरतोय् अब्जावधी लिटर पाणी**

एआय ही काही अचानक घडणारी गोष्ट नाही. यामागे प्रचंड मोठे डेटा सेंटर्स आहेत. येथे हजारो सर्व्हर रात्रंदिवस चालतात. जेव्हा हे सर्व्हर कार्यरत असतात तेव्हा ते गरम होतात. ही उष्णता नियंत्रित करण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो. हे पाणी एआयसाठी खरे इंधन आहे, ही वस्तुस्थिती सामान्य वापरकर्त्याला कधीच सांगितली जात नाही. २०२५ पर्यंत, एआय-सक्षम प्रणाली दरवर्षी ३०० ते ७०० अब्ज लिटर पाणी वापरू शकतात. तुलनेने, ही रक्कम जगभरात विकल्या जाणाऱ्या बाटलीबंद पाण्याच्या एकूण प्रमाणापेक्षा जास्त आहे. याचा अर्थ असा की एआय मशीन्स लोक प्रत्यक्षात वापरतात त्यापेक्षा जास्त पाणी शांतपणे वापरत आहेत, असे संशोधनातून दिसून आले आहे. (वृत्तसंस्था)




### पाण्यासोबतच वापरली जातेय् वीज

**हा मुद्दा केवळ पाण्याचा नाही. या डेटा सेंटर्सना चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागते आणि वीज म्हणजे जास्त कार्बन उत्सर्जन होय. एआयचा कार्बन फूटप्रिंट अखेरीस अनेक मोठ्या शहरांच्या वार्षिक प्रदूषणाइतका असण्याचा अंदाज आहे. तथापि, आतापर्यंत यावर उघडपणे चर्चा झालेली नाही कारण बहुतेक मोठ्या टेक कंपन्या त्यांच्या डेटा सेंटरचा प्रत्यक्ष पाणी आणि वीज वापर सार्वजनिकपणे उघड करत नाहीत.**

## भटके श्वान चावल्यामुळे सहा वर्षीय मुलीचा मृत्यू

◆ **ठाणे, २४ डिसेंबर**

ठाणे येथील सहा वर्षांच्या मुलीचा भटक्या श्वानाने चावल्यानंतर महिनाभराने मृत्यू झाला, अशी माहिती पालिका अधिकाऱ्याने बुधवारी दिली.

तिला अँटी-रेबीज इंजेक्शनसह वेळेवर उपचार मिळाले होते व तिची प्रकृती अचानक बिघडण्यापूर्वी तिने आपला वाढदिवसदेखील साजरा केला, असे तिच्या कुटुंबीयांनी सांगितले. १७ नोव्हेंबर रोजी निशा शिंदे दिवा परिसरात तिच्या घराबाहेर खेळत असताना, एका भटक्या श्वानाने तिच्या खांद्यावर व गालावर चावा घेतला, असे त्यांनी सांगितले. मुलीला सुरुवातीला स्थानिक डॉक्टरांकडे नेण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# एकेक 'क्रिष्णा'ही शोधून काढले पाहिजेत...

चंद्रपूर जिल्ह्यातील मथूर गावचा तरुण शेतकरी रोशन कुळेच्या किडनी विक्रीचे प्रकरण महाराष्ट्राला हादरा देणारे होते. त्यामुळे या तपासानेही वेग घेतला आणि या आंतरराष्ट्रीय जाळ्याचा पर्दाफाश होण्याच्या दिशेने पोलिसांनी महत्त्वाचा खुलासा केला. या प्रकरणाचा मुख्य आरोपी रामकृष्ण मल्लेश्याम सुंचू यास सोलापूरहून अटक करण्यात आली. त्याने कुळे यांच्यासह सोळा जणांच्या किडनी कंबोडियात विकल्याची माहिती पुढे आली. आरोपी अभियंता असला तरी त्याने या मानवी तस्करीच्या रॅकेटमध्ये स्वतःचे 'डॉ. क्रिष्णा' असे नामाभिधान केले होते. कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार युवक आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा लोकांना तो हेरायचा आणि त्यांना किडनी विकण्याच्या मार्गावर घेऊन जायचा. रोशन कुळे हा त्यातीलच एक बळी. अशा १६ जणांना 'डॉ. क्रिष्णा'ने किडनी विक्रीसाठी बाध्य केल्याचे आता समोर आले आहे. प्रत्येक किडनीमागे त्याला १ लाख रुपये दलाली मिळायची. विशेष म्हणजे, रामकृष्ण सुंचू यानेही यापूर्वी आपली किडनी अशीच विकली होती! व्यवसायात अपयश आल्याने २०१५ मध्ये तो स्वतः समाज माध्यमावरील 'किडनी डोनर'च्या माध्यमातून तस्करांच्या संपर्कात आला. पुढे याच रॅकेटमध्ये तो दलाल म्हणून सामील झाला. उच्च शिक्षण असल्याने आणि इंग्रजीवर त्याचे प्रभुत्व असल्याने त्याला ते सहज जमले. पुढे 'डॉ. क्रिष्णा' नावाने तो या अवैध व्यवसायाचा एक भाग झाला. २०१८ ते २०२५ पर्यंत तो पाच वेळा कंबोडियात जाऊन आला आहे. त्याच्यासोबत चंदीगड आणि पश्चिम बंगालचे दोन अन्य सहकारीही असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. कंबोडियातील नॉम पेन्ह येथील प्रेआ केट मेअलिया या रुग्णालयात या रॅकेटच्या माध्यमातून रोशन आणि अन्य सोळा जणांची किडनी काढून विकली गेली. या रुग्णालयाचा पूर्वेतिहास काही चांगला नाही. किडनी तस्करीची अनेक प्रकरणे तेथे उघडकीस आली आहेत. २०१४ मध्ये अशाच एका कांडात या रुग्णालयाचे संचालक, उपसंचालक आणि कंबोडियन डॉक्टरांना प्रशिक्षण देणाऱ्या चिनी प्राध्यापकाला अटक झाली होती. याचाच अर्थ असा की, किडनी विक्रीचे हे जाळे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक आणि सक्रिय आहे. मानवी अवयवांचा बाजार मांडणाऱ्या अशा कुठल्याही प्रयत्नांना आता ठेचूनच काढले पाहिजे आणि त्या दिशेने विशेष पोलिस पथकाचा तपास वेगाने मार्गस्थ होत आहे यासाठी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

सावकारी पाश तोडण्यासाठी रोशन कुळे या शेतकऱ्याने स्वतःच्या शरीराचा तुकडा विकण्याचा घेतलेला आत्मघातकी निर्णय खरे तर आपल्या समाजव्यवस्थेचे फार मोठे अपयश मानले पाहिजे. पण त्याहूनही भयंकर आहे ती 'डॉ. क्रिष्णा' नावाच्या संधिसाधूंनी चालवलेली आंतरराष्ट्रीय टोळी, जी माणसाच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांच्या अवयवांचा अक्षरशः बाजार मांडते. ही केवळ शेतकऱ्याची, गरिबांची फसवणूक नव्हे, तर अवघ्या मानवतेविरुद्ध पुकारलेला जिहाद आहे. भारतात यापूर्वीही अशा टोळ्यांनी उच्छाद मांडला होता. २००८ मधील गुडगावचे अमित कुमार रॅकेट असो, की २०२० मधील कानपूरचे अवयव तस्करीचे प्रकरण असो, की मग अलिकडच्या काळातील नेपाळ-भारत सीमा भागातील जाळे असो, या सर्वांचे काम करण्याची पद्धत सारखीच आहे. शिवाय या साऱ्या प्रकरणांत एक समान धागा असाही आहे आणि तो म्हणजे, सारेच पीडित कायम गरीब, कर्जबाजारी आणि उपेक्षित वर्गातील आहेत. आताही 'डॉ. क्रिष्णा'ने रोशनसारखे सावकारी कर्जात पिचलेले, कर्जबाजारी सावज निवडले. समाज माध्यमांत 'किडनी हवी आहे' किंवा 'गरजूंनी संपर्क साधावा' असे निरोप प्रसारित करून अडचणीत सापडलेले लोक शोधले जातात. जेव्हा एखादा गरजू, गरीब 'व्हॉट्स ॲप'वर 'किडनी सेल' शोधतो, तेव्हा हे जाळे सक्रिय होते. पुढे मानवी लचके तोडण्यासाठीची सारी प्रक्रिया अगदी सोपी होत जाते. काम झाले की तुटपुंजे पैसे हाती ठेवून पीडितांना परत पाठवले जाते. रोशनला तर परतीचाही त्रास झाला होता. त्याला तेथे कामेही करावी लागली होती म्हणे! 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो'च्या आकडेवारीनुसार, मानवी तस्करीच्या घटनांमध्ये वाढ होत असली, तरी अवयव तस्करीचे गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण अत्यंत कमी होत चालले आहे. 'ग्लोबल फायनान्शिअल इंटिग्रिटी'च्या अहवालानुसार, जगभरातील अवयव तस्करीच्या व्यापारातून दरवर्षी अंदाजे ८४० दशलक्ष ते १.७ अब्ज इतकी मोठी उलाढाल होते. एकूण प्रत्यारोपणापैकी १० टक्के अवयव हे तस्करीतून आलेले असतात. भारतात दरवर्षी हजारो लोक किडनी निकामी झाल्यामुळे मृत्यूशी झुंज देतात. पण त्यांना कायदेशीर दाता मिळणे दुरापास्त होते. मागणी आणि पुरवठ्याचे गणित जुळत नाही. त्यातून मग हा काळाबाजार फोफावतो. प्रशासन आणि आरोग्य व्यवस्था जेव्हा असे दाते मिळवून देण्याची प्रक्रिया सोपी करण्यात अपयशी ठरते, तेव्हा 'डॉ. क्रिष्णा'सारख्या दलालांचे आणि कंबोडियातील नॉम पेन्हच्या प्रेआ केट मेअलिया अशा रुग्णालयांचे फावते.

भारतात अवयवांची खरेदी-विक्री हा अजामीनपात्र गुन्हा आहे. पण चंद्रपूरच्या प्रकरणात केवळ याच कायद्याचे उल्लंघन झाले नाही, तर भारतीय न्याय संहितेच्या कलम १४३ अंतर्गतही गंभीर गुन्हा घडला आहे. एखाद्या व्यक्तीची हतबलता ओळखून, त्याला फसवून परदेशात नेणे आणि तिथे त्याचे अवयव काढणे ही शुद्ध 'ह्युमन ट्रॅफिकिंग' आहे. अशा आरोपींना केवळ जन्मठेप नव्हे तर थेट मृत्युदंडाची शिक्षा व्हायला हवी. कंबोडिया, इजिप्त किंवा व्हिएतनामसारख्या देशांत जेथे कायदे थोडे शिथिल आहेत, तिथे रुग्णाला आणि दात्याला नेले जाते. हे देश एव्हाना 'ऑर्गन टुरिझम'चे केंद्र बनले आहेत. कंबोडियातील अशा रुग्णालयाचे जाळे भारतात कुठवर पसरले आहे, याचे धागेदोरे 'इंटरपोल'च्या मदतीने शोधण्याची गरज आहे. केवळ 'डॉ. क्रिष्णा'सारख्या दलालास पकडून हे रॅकेट थांबणार नाही, तर त्यामागचे मुख्य सूत्रधार जे 'व्हाईट कॉलर' गुन्हेगार आहेत, त्यांच्या मुसक्या आवळणे आवश्यक आहे. या साऱ्यावर सातत्याने सायबर पाळत ठेवण्याचीही गरज आहे. समाज माध्यमाच्या कंपन्यांनी 'किडनी विक्री'सारख्या 'पोस्ट'वर तत्काळ बंदी घातली पाहिजे. चंद्रपूरच्या किडनी विक्री प्रकरणाकडे आता केवळ एका गुन्ह्याचा तपास म्हणून न पाहता ती यंत्रणेच्या शुद्धीकरणाची संधी म्हणूनही बघितली पाहिजे. कुणीही कुणाच्या अवयवाचा बाजार मांडू नये यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी व्हायला हवी. मानवी शरीराचे भाग ही विकायची वस्तू नसून, ती निसर्गाची देणगी आहे. कंबोडियापर्यंत पसरलेले हे रॅकेट जर आजच नेस्तनाबूत झाले नाही, तर भविष्यात गरिबांचे शरीर हे श्रीमंतांच्या जगण्याचे केवळ 'स्पेयर पार्ट' बनून राहील. सरकारने या प्रकरणी विशेष तपास पथक नेमला आहेच, पण त्याची व्याप्ती आणखी वाढवली पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर या तस्करांना ठेचले पाहिजे, हीच पीडित रोशन आणि त्याच्यासारख्या हजारो तरुणांना न्याय देणारी कृती ठरेल.

सध्या पोलिसांचा तपास योग्य दिशेने जात असून, तो कौतुकास्पद असला तरी, तपासादरम्यान समोर आलेली १६ जणांनी किडनी विकल्याची संख्या ही केवळ हिमनगाचे टोक आहे. कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लक्ष्य करणे, त्यांना परदेशात नेऊन तिथे बऱ्याच वेळा बळजबरीने त्यांचे अवयव काढणे हे या टोळीचा अवैध व्यवसाय आहे. रोशनसारख्या अनेक तरुणांना फसवून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या अशा व्यवसायाचे जाळे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पसरले आहे, हे तपासातही अधोरेखित झाले आहे. त्यामुळे ते एकदाच मुळासकट उखडून फेकले पाहिजे. सोबतच सावकारी पाश आवळणे हीसुद्धा समाजाची गरज आहे. कारण जोपर्यंत शेतीतील तोटा आणि अवैध सावकारांची दहशत संपत नाही, तोपर्यंत रोशन कुळे यांच्यासारखे तरुण अशा रॅकेटचे बळी पडतच राहतील. जसे, एकेक 'रोशन' शोधून काढावे लागतील. तसेच आता एकेक 'डॉ. क्रिष्णा'ही शोधून काढले पाहिजे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# ...तर फसगत अटळ आहे

डिजिटल युगात आपले दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात मोबाईल, संगणक आणि इंटरनेटवर अवलंबून आहे. बँकिंग व्यवहारांपासून सोशल मीडियावरील संवादापर्यंत प्रत्येक कृती आता ऑनलाईन होते. अशा वातावरणात सायबर गुन्हेगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. हे गुन्हे माहिती चोरीपासून आर्थिक फसवणूक, सोशल मीडिया अकाऊंट हॅकिंग, बनावट ओळख वापरून त्रास देणे, मालवेअर हल्ले, फिशिंग अशा अनेक स्वरूपांमध्ये घडतात. तंत्रज्ञान वापरून सायबर गुन्हेगार आर्थिक गुन्हे आणि त्यासाठीचे नवनवीन मार्ग शोधत आहेत. इंटरनेट तंत्रज्ञानाला भौगोलिक सीमा नसल्यामुळे ते उघडकीस आणणे पोलिसांसाठी अवघड ठरते. त्यामुळेच सायबर गुन्हे टाळण्याचे प्रयत्न अधिक महत्त्वाचे ठरतात. तसे म्हटले तर, मोबाईल आणि इंटरनेट ही अत्यंत प्रभावी साधने आहेत. त्यांचे छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे उपयोग केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च तसेच वेळ वाचतो आणि वापरकर्त्याच्या ज्ञानातही भर पडते. या तंत्राचा वापर करून डिजिटल व्यवसाय करता येतो. पण त्यासाठी सायबर सुरक्षेचा कळीचा मुद्दा लक्षात घेणे जरुरीचे आहे. पूर्वी सुरक्षा केवळ भौतिक गोष्टींची गणली जायची. मात्र आता सायबर सुरक्षेबरोबरच सर्व संगणकीय भांडवलाची तसेच माहितीची सुरक्षादेखील अत्यावश्यक बाब झाली आहे. या चर्चेच्या पृष्ठभूमीवर सर्वप्रथम सायबर गुन्ह्यांची वैशिष्ट्ये समजून घेऊ या. जसे की, यात सहभागी असणारा गुन्हेगार कुठूनही कारवाई करू शकतो. पुरावे डिजिटल असल्याने लपवता येतात. अनेकदा पीडित व्यक्तीला गुन्हा घडल्याचे उशिरा कळते आणि मुख्य म्हणजे हे गुन्हेगार आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असतात. आपण पाहतो की, नववर्षाच्या काळात लोक मोठ्या प्रमाणात व्हॉट्स ॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर शुभेच्छा संदेश तसेच ग्रीटिंग कार्ड, व्हिडीओ, लिंक शेअर करतात. अशा भावनिक वातावरणाचा फायदा घेणे हे अनेक सायबर गुन्हेगारांचे प्रमुख धोरण असते. विशेषतः फिशिंग लिंक असणारे संदेश अत्यंत धोकादायक ठरतात. अशा संदेशांमध्ये लिंक असते. त्यावर क्लिक करणाऱ्याचा डेटा, ओटीपी (वनटाईम पासवर्ड), बँक तपशील आदी लगेचच चोरी होतो.

बनावट शुभेच्छा वेब पेज, ई-मेल किंवा व्हॉट्स ॲपवर एक अशी लिंक मिळते; त्यावर क्लिक करताच मोबाईलमध्ये मालवेअर इन्स्टॉल होते. सोशल मीडिया अकाऊंट हॅकिंग प्रकारात शुभेच्छा देण्याच्या नावाखाली काही ॲप डाऊनलोड करण्याची विनंती केली जाते. ते ॲप परवानगी मागून फोनमधील प्रणालीत प्रवेश मिळवतात. क्यूआर कोड स्कॅममध्ये क्यूआर



कोडद्वारे बँक खात्यातून पैसे वळते करून घेतले जातात. असे गुन्हेगार डिजिटल प्रतिष्ठा वाढविण्याचे नवे तंत्र शोधत म्हणतात की, 'हा मेसेज ५० लोकांना पाठवा, तुमचे भाग्य फुलेल' अशा चेनमधून तुमचा डेटा ट्रॅक होऊन पुढील फसवणुकीसाठी वापरला जातो. या आणि अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे परिणाम केवळ आर्थिक नसतात तर मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर तसेच अत्यंत गंभीर असू शकतात. जसे की, फिशिंग लिंक किंवा क्यूआर कोडवर क्लिक केल्यास खात्यातून पैसे त्वरित दुसऱ्या खात्यात वळते होतात. अनेकदा पीडिताला कळण्यापूर्वीच खाते रिकामे झालेले असते. फोनमधील फोटो, संपर्क क्रमांक, ई-मेल, डॉक्युमेंट्स यांची चोरी झाल्यानंतर हा डेटा ब्लॅकमेलिंग किंवा ओळख चोरीसाठी वापरतात. अकाऊंट हॅक झाल्यास गुन्हेगार त्यातून खोटे संदेश पाठवून फसवणूक करतात. त्यावरून अश्लील छायाचित्र, व्हिडीओ टाकले गेल्यास व्यक्तीची प्रतिमा खराब होते. फसवणूक झाल्यानंतर भीती, अपराधीपणा, मानसिक दबाव तसेच कुटुंबातील तणाव वाढतो. अशा घातपातामुळे संस्थात्मक सुरक्षा भंगाचा मोठा धोकाही लक्षात घ्यायला हवा. जसे की, एखाद्या कर्मचाऱ्याने अशा संदेशांवर क्लिक केल्यास ऑफिस नेटवर्कमध्ये मालवेअर प्रवेश करू शकतो. तसे झाल्यास कंपनीवर रॅन्समवेअरचा हल्ला होऊ शकतो.

दरवर्षी सायबर गुन्ह्यांची पद्धत बदलत असते. नवे वर्ष जवळ आल्यावर त्यांच्या तंत्रात काही नव्या गोष्टी दिसतात. उदाहरणार्थ, एआयच्या मदतीने अगदी नैसर्गिक दिसणारे शुभेच्छा संदेश, आवाज, व्हिडीओ तयार केले जातात आणि एखाद्याला ते खरे वाटतात. नववर्षाच्या शुभेच्छा म्हणून ओळखीच्या व्यक्तीचा आवाज किंवा चेहरा वापरून बनावट व्हिडीओ पाठविला जातो आणि दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. नंतर फसवणूक करणारे बॉट वापरून त्वरित उत्तर देतात आणि विश्वास निर्माण करून संवेदनशील माहिती मागतात. सोशल इंजिनीअरिंग तंत्र वापरून मानसशास्त्रीय पद्धतीने व्यक्तीला आकर्षित करण्याच्या उद्देशानेही भावनिक संदेश पाठविले जात आहेत. तेव्हा फसवणुकीपासून दूर राहण्यासाठी नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी काही सोप्या, पण अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची दखल घ्यावी.

कोणत्याही शुभेच्छा संदेशातील लिंकवर क्लिक करण्यापूर्वी तीन सेकंद थांबा आणि हा संदेश कोणाकडून आला आहे, हा प्रश्न स्वतःलाच विचारा. त्यामध्ये अपेक्षित नसणारी लिंक नसल्याची खात्री करा. संदेशातील भाषा किंवा ऑफर संशयास्पद दिसत असेल तर सावध व्हा. अनोळखी क्रमांक किंवा अचानक संपर्क साधणाऱ्या व्यक्तीकडून आलेल्या शुभेच्छा संदेशांवर विश्वास ठेऊ नका. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या बँक खात्याचा तपशील कधीही शेअर करू नका. कुठल्याही शुभेच्छा संदेशासाठी बँक तपशील विचारला तर ती १०० टक्के फसवणूकच असते. त्याचप्रमाणे क्यूआर कोड स्कॅन करतानाही कायम सावध राहा. फक्त विश्वसनीय स्रोतांमधील क्यूआर कोड स्कॅन करा. कधीही गिफ्ट किंवा लकी ड्रॉसाठी क्यूआर स्कॅन करू नका. मोबाईलमध्ये अँटीव्हायरस आणि सिक्युरिटी कायम अपडेट ठेवा. सिस्टिम अपडेट, अँटीव्हायरस तसेच सुरक्षित ब्राऊझर वापरा. नेहमी द्विस्तरीय प्रमाणीकरण वापरा. सोशल मीडिया, ई-मेल, बँकिंगमध्ये ही दक्षता पाळायलाच हवी. यात ओटीपीशिवाय लॉगिन होऊच नये, अशी व्यवस्था असते. खेरीज सार्वजनिक वायफाय वापरतानाही सतर्क राहावे. पब्लिक वायफायवर कधीही महत्त्वाची बँकिंग ॲक्टिव्हिटी करू नका. अगदी आदिमकाळापासून पाहिले तरी दिसते की, कोणताही समाज किंवा संस्कृती गुन्हेगारीपासून कधीच पूर्णतः मुक्त नव्हती आणि यापुढेही नसेल. त्यामुळे (कोणत्याही प्रकारच्या) गुन्ह्यांचे स्वरूप आणि मुळात ते का केले जातात, याचा विचार (प्रतिबंधक उपायांबरोबर) करावाच लागेल. कुठल्याही घटनेला दोन बाजू असतात. साधे सुरीचे उदाहरण घेतले तरी फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याला इजा करण्यासाठी वापर होऊ शकतो. संगणक, मोबाईल आणि इतर आधुनिक उपकरणांचेही तसेच आहे. जगणे, व्यवहार, उद्योग, व्यापार वेगवान आणि सुलभ करण्यासाठी हे तंत्रज्ञान विकसित तसेच लोकप्रिय झाले. पण यामुळे निर्माण होणारा ई-कचरा, सायबर गुन्हे, डिजिटल व्यसनाधीनता यासंबंधीच्या जाणिवा प्रगल्भ व्हायला हव्यात. तरच आपण त्याच्याशी संबंधित धोक्यांपासून दूर राहू शकू.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# कायदा हा अंतिम उपाय नव्हे

भौतिक प्रगतीची गती हे या शतकाचे वैशिष्ट्यच. या प्रगतीमुळे अनेक बाबी सोईच्या, सहज आणि सुखकर झाल्याचे दिसून येते. आता तर या बाबींची सर्वांनाच इतकी सवय झाली आहे की जणू या वस्तू जीवनावश्यकच आहेत. पण सहज, सोईच्या असलेल्या अनेक उपकरणांचे दुष्परिणाम आता दिसायला लागले आहेत. स्वाभाविकच या दुष्परिणामांना रोखावे कसे, असा प्रश्न देखील समाजहिताची चिंता करणाऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. मग याचे चिंतन करून समस्येवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. मोबाईल आणि त्याचा वापर ही एक अशीच समस्या आहे. त्यातही स्मार्ट फोन आल्यापासून वेगवेगळ्या ॲप्सच्या माध्यमातून समाज माध्यमावरील नव्या पिढीचा वावर चिंताजनक आहे. पण या पिढीचा जन्मच डिजिटल युगात झाला. त्यामुळे नकळत्या वयापासून मोबाईल, इंटरनेट वापराची सवय त्यांना लागली. आता ही सवयच समस्या म्हणून जगाला चिंतेत टाकणारी आहे आणि म्हणूनच ऑस्ट्रेलिया येथे १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमावर खाते उघडण्यास बंदी करण्यात आली. अशा प्रकारची बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश आहे. ऑस्ट्रेलियाने गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात 'ऑनलाईन सेफ्टी अमेंडमेंट बिल' पारित केले. तर १० डिसेंबरपासून या संदर्भातील कायदा लागू केला. आता ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमावर फेसबुक, इन्स्ट्राग्राम, स्नॅपचॅट, टिकटॉक, युट्युब, थ्रेड, रेडईट आणि कीक आदी ठिकाणी खाते उघडता येणार नाहीत. विशेष म्हणजे या कायद्याचे पालन न झाल्यास दोषी कंपनीला सुमारे ४०० कोटींचा दंड होऊ शकतो अशी तरतूद आहे. हा कायदा मुलांना ऑनलाईन हानिकारक कंटेंटपासून वाचविण्यासाठी उचललेले एक पाऊल असल्याचे ऑस्ट्रेलिया शासनाचे म्हणणे आहे.

सर्व दूर अल्पवयीन मुलांचा समाज माध्यमांवर वाढता वावर, समाज माध्यमांवर असलेला हानिकारक मजकूर आणि त्यामुळे नकळत्या वयातील मुलांमध्ये निर्माण होत असलेल्या समस्या यावर उपाययोजना म्हणून केलेला हा प्रयत्न निश्चितच चांगला म्हटला पाहिजे. पण केवळ बंदी घालून, कायदा करून या समस्येचे निराकरण होईल का याचा देखील विचार व्हावा. अल्पवयीन मुलांना समाज माध्यमांवर खाते उघडण्यास बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया जगातील पहिला देश ठरला असला तरी ही समस्या जगातील सर्वच देशांना भेडसावत आहे. भारतातही या समस्येचा परिणाम पाहावयास मिळतो. अनेकदा त्यावर विविधांगी चर्चा देखील होते. खरं म्हणजे आपल्या येथे लहान मुलांपासून काहीसा दूर असणारा मोबाईल कोविड काळात नाईलाज म्हणून का होईना पालकांना मुलांकडे सोपवावा लागला. त्या काळातील ती गरजच होती. पण आता तेव्हा हातात दिलेला मोबाईल सोडविताना पालकांची कसरत होत आहे. मोबाईलमध्ये दिसणारे समाज माध्यमांवरील कंटेंट ही पालकांसमोर सर्वांत मोठी समस्या आहे. वास्तविक आपल्या येथील व्यवस्थेत कुटुंब व्यवस्था हे आपले मोठे बलस्थान. कुटुंबातून मूल्य शिक्षणासह संस्काराची सहज रुजवण हे तर वैशिष्ट्यच. कुटुंबातील सहज सोप्या संवादातून अनेक अडचणींवर मात करण्याची आपली परंपरा आहे.

पण दुर्दैवाने कुटुंबातील संवाद बऱ्याच प्रमाणात हरवत असल्याचे वास्तव सर्वांनाच मान्य करावे लागेल. एकीकडे अल्पवयीन मुलांमधील मोबाईलचे व्यसन दूर व्हावे अशी अपेक्षा असताना दुसरीकडे त्याच मोबाईलमध्ये डोके खुपसून बसणारे पालक जर असतील तर अल्पवयीन असणाऱ्या मुलांची चूक म्हणावी का? या संदर्भात ऑस्ट्रेलियाने कायदा करून बंदी घातल्याच्या वृत्ताचे सर्वदूर कौतुक होत असले तरी अशा प्रकारची बंदी हा अंतिम उपाय नक्कीच नाही. ऑस्ट्रेलियात किंवा भारतातही असा कायदा केला तरी हे सरावलेले घटक चोरून ते पाहणारच नाही असे खात्रीने सांगता येत नाही. त्यासाठी कुटुंबा-कुटुंबात व्यापक संवाद, कुठल्या तरी चांगल्या निमित्ताने सर्वांनी एका ठिकाणी येऊन आनंद साजरा करणे, मुलांना पुस्तक वाचन, संतांचे चरित्र सांगणे आदी अनेक उपाय करावे लागतील अर्थातच काही दशकांपूर्वी सहज होणाऱ्या बाबींचे अनुकरण पुन्हा प्रयत्नपूर्वक करावे लागेल. तरच 'मोबाईल वेडा'च्या समस्येवर मात करता येईल.

९४२२८६२४८४


## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राहुल गांधींचे वादग्रस्त परदेश दौरे

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा प्रत्येक परदेश दौरा वादग्रस्त ठरत असतो. विशेष म्हणजे प्रत्येक परदेश दौरा वादग्रस्त ठरवण्यात अन्य कोणाचे नाही तर त्यांचेच योगदान असते. त्यानुसार त्यांचा यावेळचा जर्मनीचा दौराही असाच वादग्रस्त ठरला. यावेळी संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना राहुल गांधी जर्मनीच्या दौऱ्यावर गेले. खरं म्हणजे संसदेचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतरही ते जर्मनीच्या दौऱ्यावर गेले असते तर आकाश कोसळले नसते. संसदेचे अधिवेशन सुरू असताना विरोधी पक्षनेत्याने परदेश दौऱ्यावर जाऊ नये, असा काही नियम नाही, पण संकेत मात्र निश्चित आहे. संसद अधिवेशन काळातील राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्याचे समर्थन करताना काँग्रेस पक्षाने संसदेचे अधिवेशन सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या परदेश दौऱ्याचाच दाखला दिला. पण मोदी यांचा परदेश दौरा व्यापक देशहितासाठी असतो, तर राहुल गांधी यांचा परदेश दौरा देशाला अडचणीत आणण्यासाठी, देशाची बदनामी करण्यासाठी असतो, याचे काँग्रेस पक्षाला सोयीस्कर विस्मरण झाले.

बरं जर्मनीत जाऊन राहुल गांधी यांनी दिवे तरी काय लावले, तर आपल्याच देशावर टीका केली, देशाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. बर्लिन येथे हर्टी स्कूलमध्ये राजकारण एक ऐकण्याची कला, या विषयावर 'डर्टी' भाषण करताना राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा मांडला आणि हरयाणा, महाराष्ट्रातील निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप केला. भारतातील संवैधानिक संस्थांवरही त्यांनी नेहमीसारखे आरोप केले. असे आरोप राहुल गांधी यांनी आतापर्यंत किमान शंभरवेळा तरी केले असावे. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी संसदेत असे आरोप करायला हरकत नाही, तो त्यांचा अधिकार आहे. पण परदेशात जाऊन आपल्या देशावर आरोप करत राहुल गांधी यांनी एकप्रकारे संकेतभंग आणि औचित्यभंग केला आहे. देशात असताना शंभर आणि पाच असे वेगवेगळे असले तरी हरकत नसते, मात्र परदेशात गेल्यावर शंभर आणि पाच यांनी एकशेपाच मिळून वागायचे असते, किमान तसे दर्शवायचे तरी असते. पण राहुल गांधी यांना असे औचित्य आणि संकेतांचे भान कधी राहात नाही. विरोधी पक्षनेता म्हणून राहुल गांधी यांना मायदेशात पंतप्रधान तसेच सरकारवर टीका करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तो त्यांचा अधिकार कोणी नाकारत नाही. मात्र परदेशातच्या भूमीवरून देशाच्या पंतप्रधानांवर टीका करण्याचा तसेच देशाची बदनामी करण्याचा त्यांना कोणताच अधिकार नाही. मुळात मतचोरीबाबत राहुल गांधी यांनी जे आरोप केले, ते देशातील जनतेने पूर्णपणे



नाकारले आहे. त्यामुळे आपल्या जुन्या आरोपांची पुनरावृत्ती करण्याचे त्यांना कारण नाही. असे करत राहुल गांधी स्वतःची तसेच विरोधी पक्षनेतेपदाची विश्वसनीयता कमी करत आहे. मुळात आपण काय बोलतो, त्याचा परिणाम काय होतो, याचे भान त्यांना राहात नाही, असे म्हणावेसे वाटते. मागील वर्षी राहुल गांधी यांच्या अमेरिका दौऱ्यातही त्यांच्या विधानावरून वादळ उठले होते. भारतात अल्पसंख्यकांना असलेल्या धार्मिक अधिकारबाबत बोलताना राहुल गांधी यांनी चुकीचा संदर्भ दिला होता. शिखांना पगडी घालण्याची परवानगी आहे का, गुरुद्वारात कडा घालून जाण्याची परवानगी आहे का, हा वाद फक्त शिखांशी संबंधित नाही तर भारतातील सर्व अल्पसंख्यकांशी संबंधित आहे, असे तारे राहुल गांधी यांनी तोडले होते. एकप्रकारे राहुल गांधी यांनी भारतात अल्पसंख्यकांवर धार्मिक आधारावर अन्याय होत असल्याचा आरोप केला होता.

भारतात शीख नागरिकांना पगडी आणि कडा घालण्याची पूर्वापार परवानगी आहे, अगदी विमानप्रवासातही ते आपल्या जवळ कृपाण बाळगू शकतात. त्यामुळे भाजपानेच नाही तर शीख नागरिक तसेच त्यांच्या सर्व संघटनांनीही राहुल गांधी यांचे सर्व आरोप फेटाळून लावले होते. राहुल गांधी यांच्या या बिनडोक आरोपाचा फायदा घेत खलिस्तानवादी अतिरेकी गुरपतवंतसिंग पन्नू याने, म्हणूनच आमची खलिस्तानची मागणी न्याय्य असल्याचा दावा केला होता. अमेरिका दौऱ्यात राहुल गांधी यांनी भारतविरोधी भूमिकेसाठी ओळखले जाणारे खासदार इल्हान उमर यांची भेट घेतली होती. इल्हान उमर यांनी अमेरिकी काँग्रेसमध्ये भारतविरोधी प्रस्ताव मांडला होता, तसेच ३७० कलम रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाला विरोध केला होता. परदेशात जाऊन देशावर टीका करू नये, असा कायदा नसला तरी तो संकेत आहे.

असा प्रकार एखादवेळी झाला तर समजण्यासारखे आहे, पण राहुल गांधी वारंवार त्यांची पुनरावृत्ती करतात. असे करत ते काँग्रेस पक्षाचे नुकसान करतात. त्यांच्या देशविरोधी कृत्यांमुळे इंडिया आघाडीतील मित्रपक्षांच्या नेत्यांचीच नाही तर काँग्रेस पक्षातील नेत्यांचीही अडचण होत आहे. त्यामुळे त्यांच्या अशा बेजबाबदार विधानांपासून इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचे नेते आणि काँग्रेस पक्षातील नेतेही स्वतःला दूर ठेवत आहे. विरोधी पक्षनेता हे संवैधानिक पद आहे. त्यामुळे या पदावर विराजमान होणाऱ्या व्यक्तीकडून देशातील नागरिकांच्या खूप अपेक्षा असतात. पण त्या अपेक्षांची पूर्तता करण्यात राहुल गांधी कमी पडत आहे. मुळात विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी स्वीकारताना राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेत्याचे कर्तव्य, अधिकार आणि जबाबदारी यांचा अभ्यास करायला पाहिजे होता. यासोबत देशात आतापर्यंत कोण कोण विरोधी पक्षनेते झाले, त्यांची सभागृहातील तसेच सभागृहाबाहेरील वागणूक कशी होती, याचा अभ्यासही करायला पाहिजे होता. काँग्रेस सांसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी पुत्रप्रेमामुळे आंधळ्या झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना राहुल गांधी कधीच चुकत नाही, असे वाटणे स्वाभाविक आहे. पण काँग्रेस पक्षात राहुल गांधींपेक्षा अनुभवी, विद्वान असे अनेक नेते आहेत. त्यांनी राहुल गांधींना समजवून सांगण्याची गरज आहे. कोणताही लहान मुलगा बोलायला लागतो, तेव्हा तो तोतडा बोलत असतो, चालताना अडखळत असतो. सुरुवातीला याचे सर्वांना कौतुक वाटते. पण लहान मुलगा थोडा मोठा झाल्यावरही तोतडा बोलत असेल आणि अडखळत चालत असेल तर त्याला डॉक्टरकडे नेण्याची गरज असते. राहुल गांधी यांची स्थिती मोठा झाल्यावरही तोतडे बोलणाऱ्या लहान मुलासारखी झाली आहे. त्यामुळेच ते हास्यास्पद ठरत आहे. राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेते म्हणून जे आरोप करायचे ते त्यांनी देशात केले पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे जे आरोप करायचे ते पुराव्यानिशी केले पाहिजेत. उचलली जीभ लावली टाळूला अशा प्रकारचे आरोप करू नये. हरयाणा आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत मतचोरी झाली, काही गैरप्रकार झाले, असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी खुशाल न्यायालयात जावे, पण निराधार आणि खोडसाळ आरोप करत देशाची तसेच देशातील संवैधानिक संस्थाची बदनामी करू नये. जनतेच्या सहनशक्तीची आणि संयमाची परीक्षा पाहू नये, असे सांगावेसे वाटते.

९८८१७१७८१७

### नायलॉन मांजाची तस्करी आणि विक्री जोमात

डिसेंबरची बोचरी थंडी हळूहळू ओसरायला लागली की सर्वांना मकर संक्रांतीचे वेध लागतात. आधी स्त्रियांचा सण म्हणून ओळखला जाणारा हा सण हल्ली सर्वांसाठी पतंगाचा उत्सव म्हणून ठरलेला आहे. अगदी नोव्हेंबरपासून सुरू झालेली पतंगबाजी या काळात मोठ्या प्रमाणात वाढलेली असते. गुजरातसारख्या राज्यात तर विशेष करून पतंग फेस्टिव्हल आयोजित करून याचा आनंद लुटला जातो. आपल्याकडे मात्र या उत्सवाला गालबोट लागते की काय, अशी परिस्थिती गेल्या काही काळापासून निर्माण व्हायला लागली आहे. पूर्वी पतंगासाठी वापरण्यात येणारा मांजा हा साध्या सुताचा असायचा. त्याचाच मांजा घोटून पतंग उडवण्यासाठी किंवा शर्यतीसाठी वापरला जायचा. तसा मांजा वापरणे सोडून आता जिथे तिथे सर्रास प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरून पतंग उडवायला लागले आहेत. साधा मांजा पर्यावरणीय दृष्टीने घातक नव्हताच. कुठे झाडावर अडकला तरी सडून जायचा. कुणी पकडला तरी इजा होण्याचे प्रमाण अत्यल्प असायचे. मात्र, गेल्या काही काळापासून देशात नायलॉन मांजाचा अतिरेक वाढला तशा दुर्घटना होण्याचे प्रमाण सुद्धा वाढीस लागले आहे. अजून जानेवारी महिना यायचाच आहे. तरी रोज कुठे ना कुठे नायलॉन मांजा पकडल्याच्या बातम्या येताहेत. नायलॉन मांजाची तस्करी इतकी वाढली आहे की त्यामुळे यंत्रणा सुद्धा त्रस्त झाली आहे. याच मांजामुळे उद्या कुणाचा गळा कापला जाईल. कुणाचे बोट अन् कुणाचा हात कापला जाईल. याचं सोयरसुतक मात्र त्यांना नाही.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

## वाचक पत्रे

### युती मुंबई वाचविण्यासाठी की स्वअस्तित्वासाठी?

महानगर पालिकचे बिगुल वाजले. त्याआधी नगरपंचायत, नगरपरिषदांच्या निवडणुका आटोपल्या. भाजप व मित्र पक्षाला घवघवीत यश मिळालं. उबाठा जिथे होता तेथून त्याचा उबाठाच झाला. बोलण्यातला राज माणूस प्रत्यक्ष जमिनीवर मात्र शून्यच राहिला. अवघी लोकसभा, विधानसभा काँग्रेसचे तुणतुणे वाजवत उद्धव फिरले पण मुंबईत मात्र संगीत बिघडले. आता राज निवडावा की काँग्रेस निवडावा यात उद्धव यांनी राज यांना निवडले. आता शून्यातल्या या राजला दोन-चार आकड्यात तरी आणण्याची जबाबदारी या मोठ्या भावावर आली. वर बाळासाहेबांना आनंद झाला असेल पण इंडिया आघाडीत आपला बाळ गेला याचे दुःखही झाले असेल. मुंबई मराठी माणसाची म्हणता म्हणता परप्रांतीयांची झाली असे उबाठा म्हणत आहे. व्यवसाय करायला मराठी माणसाला शिकवले नाही न आपण. तिकडे मनसे यांनी मराठी बोलता येत नाही म्हणून मराठीच मुलाला लोकलमध्ये जबर मारले होते, त्याला आपला जीव गमवावा लागला. यांच्या या वागणुकीने देशभरात जे मराठी बांधव आहेत त्यांना असेच उत्तर मिळाले तर याला जबाबदार कोण राहील. मनसे नेते बोलून मोकळे होतात पण त्याचा परीणाम काय होणार याचा विचार करत नाही. तिकडे काकांसोबत गेल्याने, सोनिया मावशीकडे गेल्याने मुंबईकर मराठी थोडीच खुश आहेत. मूठभर फुगडी गँग दिसली की भरघोस पाठिंबा आहे असे या नेत्यांनी समजू नये. पत्रकार परिषद झाल्यावर तर कौटुंबिक फोटोसेशन झाले. पुन्हा तेच कुटुंब. नाही म्हणायला संजय राऊत होतेच बाजू सांभाळायला. पण या बुवांमुळे ज्या चुकीच्या गोष्टी घडून गेल्या त्याला मुंबईकर कसा माफ करेल? त्यामुळे कितीही युती होवो, ठाकरी भाषा बरगळवो पण उबाठा-मनसेला महानगर पालिका घेणे जमणार नाही असे दिसते. ही युती मुंबई वाचविण्यासाठी आहे की आपले संपलेले अस्तित्व वाचविण्यासाठी ही पण शंका येऊ शकते.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## आजचे संघगीत-८३

गुरुवार, २५ डिसेंबर २०२५

### जय जय भारत हाच असू दे मंत्र मुखी दिनरात

'जय जय भारत' हाच असू दे मंत्र मुखी दिनरात ॥धृ॥

प्रभात-काळी, रोज सकाळी
भारतभूची गा भूपाळी
भारतभूचे स्तोत्र घुमू दे रोज तुझ्या सदनात ॥१॥

हा रघुनंदन राम तुझा रे
हाच मुरारी श्याम तुझा रे
विटेवरचा हाच विठोबा, प्राण हाच हृदयात ॥२॥

इतिहासाचे कर पारायण
जाण तुझे तू ते रामायण
'कर्तव्याची जाणिव' गीता हीच असो स्मरणात ॥३॥

निजरक्ताचे लावुन कुंकुम
वाहुन चरणी देहाचे सुम
प्राणांचीही उजळ प्रसंगी आरतीस फुलवात ॥४॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मोहोळ तालुका विधिज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. अमोल देशपांडे यांची अविरोध निवड

**मोहोळ, दि.२४ डिसेंबर-**

मोहोळ तालुका विधिज्ञ मंडळाचे अध्यक्षपदी येथील ॲड. अमोल व्यंकटेश देशपांडे यांची अविरोध निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष ॲड.के.बी.चौधरी हे होते. इतर पदाधिकारी याप्रमाणे उपाध्यक्ष- ॲड.विनोद धावणे, सचिव- ॲड सुनील प्रक्षाळे खजिनदार-ॲड. मनोज भालेराव, ग्रंथपाल-ॲड प्रेमनाथ सोनवणे. यावेळी माजी अध्यक्ष एन. टी. गायकवाड, ॲड. के. एम. नाईक, ॲड. एस. के. देशपांडे, ॲड. प्रथमेश आदलिंगे,ॲड. श्रीरंग लाळे यांनी विचार मांडले. नूतन अध्यक्ष अमोल देशपांडे यांनी वकील संघाच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व कामकाज सर्व सहकार यांच्या साथीने करू असे सांगितले. तसेच मोहोळ तालुक्यासाठी वरिष्ठ स्तर न्यायालयाची निर्मिती, न्यायालयासाठी नवीन इमारत या साठी प्रयत्न करण्याची अपेक्षा या वेळी व्यक्त करण्यात आली.मंडळाची सदस्य संख्या १०५ आहे. येथे बिनविरोध निवडीची प्रथा आहे. अमोल देशपांडे हे गेली २० वर्षे वकील म्हणून कार्यरत आहेत. त्यांना ज्येष्ठ विधिज्ञ स्व. द. ना. कुलकर्णी, स्व. ॲड. पी.डी.कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.



### धान्य खरेदीसाठी शेतकरी नोंदणीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, दि.२४ डिसेंबर-**

खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व मका, ज्वारी, यांसह भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबत राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्यावतीने शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. राज्यातील अनेक शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तसेच अन्य कारणांमुळे वेळेत नोंदणी करता आली नव्हती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, आदिवासी विकास महामंडळ तसेच विविध जिल्हास्तरावरून नोंदणीस मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. मुदतवाढीच्या मागणीचा सकारात्मक विचार करत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी ही मुदतवाढ जाहीर केली आहे. शासनाच्या खरीप पणन हंगाम २०२४-२५ योजनेनुसार, धान व मका, ज्वारीसह भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणी पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांकडूनच शासनामार्फत आधारभूत किमतीने धान्याची खरेदी करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार, संबंधित यंत्रणांनी शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सोलापूर जिल्ह्यातील भरड धान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, अधिकाधिक शेतकऱ्यांना शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेता येणार आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह आपली ऑनलाइन नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

### पीक कर्ज मंजुरीबाबत शेतकऱ्यांसाठी अग्रणी बँकेकडून २ दिवसीय शिबीर

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

जनसमर्थ पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड पीक कर्ज मंजुरीबाबत शिबिर सुरू झाले आहे. हे शिबिर २५ डिसेंबरपर्यंत आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना पीक कर्ज तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार व PSB Alliance यांच्यासोबत त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या सहकार्याने agristack डेटा प्रणालीचे जनसमर्थ पोर्टलशी एकात्मिकीकरण केले असून पात्र शेतकऱ्यांना पारदर्शक, सुलभ व कागदपत्रविरहीत पध्दतीने पीक कर्ज मंजूर करता येणार आहे. या उपक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँका जनसमर्थ पोर्टलवर यशस्वीरित्या ऑनबोर्ड केल्या आहेत व पीक मंजुरीची प्रणाली कार्यान्वित केली आहे. लीड बँकेने जिल्ह्यामध्ये प्रायोगिक आधारावर जनसमर्थ पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड/ पीक कर्ज मंजुरी हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. पीक कर्ज मंजुरीचे कार्यक्रमाचे अग्रणी बँकेकडून दोन दिवस तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिरामध्ये तालुका मुख्यालयाच्या स्तरावर कार्यरत आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी उत्सर्पूतपणे सहभाग नोंदविण्यात येवून जिल्ह्यातील पीक कर्ज मंजुरीबाबत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची नोंदणी करणेकामी कामकाज करावे. तसेच त्यांचे आपले सरकार सरकार केंद्र अधिसूचित असणाऱ्या ठिकाणी उपस्थित होणाऱ्या शेतकऱ्यांचे नोंदणीकामी कामकाज करावे. ज्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांकडून अशा प्रकारची कार्यवाही न झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द आदेशाचे पालन न केलेबाबत दि.१९ जानेवारी २०१८ चे शासन निर्णयानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

### यशवंतराव होळकर राज्याभिषेक महोत्सव समितीच्या जिल्हा प्रतिनिधीपदी आनंद पाटील

**पिलीव दि. २४ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव (झिंजेवस्ती) येथील आनंद रामचंद्र पाटील यांची किल्ले वाफेगाव याठिकाणी होणारया महाराजा यशवंतराव होळकर ( प्रथम) राज्याभिषेक महोत्सव समितीमध्ये सोलापूर जिल्ह्या प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदरच्या नियुक्तीचे पत्र समिती प्रमुख श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी नुकतेच दिले आहे.

# अन् बारामतीची कन्या नगरसेवक झाली, आता उपनगराध्यक्षपद मिळणार का?

### जैन समाजाला मोठी संधी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२४ डिसेंबर-**

प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी 'बारामतीची कन्या' असा उल्लेख केला अन् वृशाली गांधी रातोरात प्रसिध्दीच्या झोतात आल्या. कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकीच्या प्रचार रणधुमाळीत अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणूकीत शांत, संयमी पण गनिमी काव्याने कसलाही राजकीय अनूभव नसलेल्या नवख्या वृशाली महेश गांधी यांनी पारंपारीक शिवसेसेनेचा अभेद्य बालेकील्ला म्हणून ओळखल्या जाणा-या प्रभाग आठ मधून निवडणूक जिंकत बालेकील्ला उध्वस्त केला.

शिवसेना जिल्हाध्यक्ष धनंजय डीकोळे यांच्यासाठी येथील निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात होती. कुर्डूवाडीच्या विकासासाठी निधी खेचून आणण्यासाठी याच बारामतीच्या कन्येला उपनगराध्यक्षपद मिळणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपनगराध्यक्षपद मिळाले तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून जैन समाजासाठी प्रथमच प्रतीनिधीत्व



असेल. कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उबाठा यांच्यातच खरी लढत पहायला मिळाली. प्रचारा दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रचार सभेसाठी येथे आले होते. त्यावेळी त्यांनी वृशाली गांधी यांचे तोंडभरून कौतुक करत या व्यासपीठावर आमच्या बारामतीच्या कन्या प्रभाग आठ मधून उभ्या आहेत. त्यांना विचारा बारामतीचा विकास कसा आहे. स्वच्छतेला महत्व आहे. त्याच पध्दतीने कुर्डूवाडीचा विकास करायचा असेल तर सर्व उमेदवारांना निवडून द्यावे लागेल असे आवाहन केले होते. २१ डीसेंबर रोजी नगरपालिकेचा निकाल लागला अन् राष्ट्रवादी काँग्रेसचे तेरा नगरसेवक निवडून आले. त्यामध्ये वृशाली गांधी या २५१ मतांनी निवडून आल्या. त्यानंतर सोशल मिडीयावर बारामतीची कन्या असा उल्लेख केलेले व्हीडीओ क्लिप्स व्हायरल झाले. कुर्डूवाडीच्या जनतेने स्वच्छ प्रतिमा असलेला,चारीत्र्यसंपन्न ,सामाजीक बांधिलकी जपणा-या ,उच्च शिक्षीत अशा महेश गांधी यांच्या पत्नीस निवडून देवून उपमुख्यमंत्र्यांच्या तसेच माजी आ.संजयमामा शिंदे यांच्या आवाहनाला प्रतीसाद दिला. शिंदे घराण्याचे अत्यंत विश्वासू व निकटवर्तीय असल्यामुळे महेश गांधी यांनी राजकारणातले बारकावे कसे असतात याचा मात्र दांडगा अभ्यास होता. शिंदे घराण्यावर मागील तीस वर्षापासुन असलेली निष्ठा कामी आली असून वृशाली गांधी या नगरसेवक झाल्या आहेत. आता त्यांच्यावर संजयमामा शिंदे यांच्या माध्यमातुन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून निधी मिळवून बारामतीसारखा विकास फक्त स्वतःच्या प्रभागाचा नव्हे तर संपुर्ण कुर्डूवाडी शहराचा विकास करण्याची जबाबदारी आहे. त्यांची उपनगराध्यक्ष म्हणून निवड होणार का याकडे सर्वाचे लक्ष लागले

# राष्ट्रवादीचे गटनेते किसन जाधव, नगरसेवक नागेश गायकवाड भाजपात?

### पक्ष प्रवेशाचा भाजपाचा झंझावात कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

गतवेळी महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची खिंड एकट्याने लढविणारे शिलेदार माजी गटनेता किसन जाधव आणि माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांनी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हात सोडून अखेर भाजपात प्रवेश केल्याचे वृत्त आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत जाधव, गायकवाड यांचा पक्षप्रवेश रात्री उशीरा शहरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये पार पडण्याचे नियोजन होते, दरम्यान प्रवेशापूर्वी बंद दारआड काही काळ चर्चा सुरु होती. चर्चेनंतर प्रवेश सोहळ्याचे नियोजन होते.





देश आणि राज्यातील सत्तेत सध्या एक नंबरचा पक्ष असलेल्या भाजपाकडे येणाऱ्यांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. पक्षांतर्गत नेत्यांचा विरोध झुगारून पालकमंत्र्यांकडून भाजपामध्ये जोमाने प्रवेश सुरु आहेत. नुकतेच काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांना भाजपात प्रवेश देण्यात आला. तर काहीच दिवसापूर्वी राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर प्रविण डोंगरे यांनी आणि काँग्रेसचे माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी कमळ हातात घेतले.

### कृषी प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर -**

कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, आत्मा सोलापूर आणि जिल्हा परिषद कृषी विभाग, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५५ वे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवार दि.२५ डिसेंबर रोजी दुपारी ४:०० वाजता सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनाचे खास आकर्षण हिंदकेसरी सोन्या बैल हा असणार आहे. तसेच प्रदूषणामध्ये डॉग आणि कॅट शो आकर्षणाचे केंद्रबिंदू असणार आहे. या भव्य दिव्य कृषी प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन कृषी प्रदर्शन समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कार्य**

भारताच्या डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागातील KWV-वाडी सेक्शनमध्ये कंत्राटी PQRS मशीनद्वारे CTR(P)/TSR(P)-47.0 किमी आणि TBR-64.8 किमी. कामाची अंदाजित किंमत: रु. 222306541.13/-, बयाणा रक्कम: रु. 1261500.00/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 (बारा) महिने, देखभाल कालावधी: शून्य, निविदा अर्जाची किंमत: शून्य, www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 09/01/2025 15:00 वाजता, www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 09/01/2025 15.30 नंतर, वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in. **टीप:** संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट : www.ireps.gov.in

**डीआरएम (डब्ल्यू), सोलापूर** 73

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. निविदा सूचना क्र.: 29-2025-SrDENS कामाचे नाव: फेब्रुवारी-2023 च्या RDSO/LKO च्या नवीनतम तपशीलानुसार, रॉयल्टी आणि शुल्कासह, 65 मिमी मशीनने बारीक केलेली दगडाची गिट्टी रेल्वेच्या जागेवर पुरवणे आणि साठवणे आणि DEN च्या निर्देशानुसार ऊगऊ डेपोमध्ये ती रेल्वे हॉपर/वॅगन इत्यादींमध्ये भरणे. (एकूण 50,000 घनमीटर) कामाची अंदाजित किंमत: रु. 5,27,29,500/- बयाणा रक्कम: रु. 4,13,700/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 18 महिने देखभाल कालावधी: लागू नाही निविदा सूचना क्र.: 31-2025-SrDENS कामाचे नाव: 11 पुलांची पुनर्बांधणी. (स्लॅब: 06, आरसीसी पाईप: 03, कमान पूल: 02) आणि मोहोळ-वाडी सेक्शनमधील 06 पुलांचे विस्तारीकरण (कमानी: 05, बॉक्स: 01). कामाची अंदाजित किंमत: रु. 8,41,79,258.56 बयाणा रक्कम: रु. 5,70,900/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 24 महिने निविदा सूचना क्र.: 32-2025-SrDENS कामाचे नाव: (अ) ADEN/KLBG उपविभागांतर्गत वाडी येथील कुन्नूर पंप हाऊसच्या ३०० मिमी व्यासाच्या 9000 मीटर लांबीच्या पाईपलाईनची बदली. ब) i) ADEN/KLBG उपविभागांतर्गत बाबलद पंप हाऊस ते KLBG फिल्टर प्लांटपर्यंतच्या 200 मिमी व्यासाच्या 4500 मीटर लांबीच्या पाईपलाईनची बदली. ii DEN/KLBG उपविभागांतर्गत शहाबाद पंप हाऊस ते शहाबाद फिल्टर प्लांटपर्यंतच्या 200 मिमी व्यासाच्या 3650 मीटर लांबीच्या पाईपलाईनची बदली. कामाची अंदाजित किंमत: रु. 7,03,14,264.82 अनामत रक्कम: रु. 5,01,600/- कामाचा पूर्णत्वाचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 24 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 12/01/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 12/01/2026 रोजी 15.30 वाजता. संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**डीआरएम (वर्क्स), सोलापूर** 74

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

### जाहीर नोटीस

खाली सही करणार श्री राहुल रमेश जोशी, ॲडव्होकेट रा. पंढरपूर यांचे पक्षकार विनोद विष्णुपंत महाडीक रा. पंढरपुर, यांचे तर्फे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि व ता. पंढरपूर पैकी मौजे पुळूज येथील शेती गट नं. ७३२ क्षेत्र हे २-०३ आर, आकार रु ३-४० पैसे आणि गट नं. ७३३ क्षेत्र हे २-९७ आर, आकार रु ४-९५ पैसे, वर नमुद शेत जमीनी या आमचे पक्षकार यांचे खरेदी मालकीच्या जमीनी आहेत. सदर जमीनीचे खरेदीखत पंढरपूर येथील दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविण्यात आलेले होते. सदर दस्ताचे अनुक्रमे दस्त क्रमांक ४५४९/१९९९ व ४५५०/१९९९ ने असे आहे. सदर दस्त हे गहाळ झालेले असून आमचे पक्षकार यांनी सदर दस्त गहाळ झालेबद्दल पंढरपूर तालुका पोलिस स्टेशन यांचेकडे गहाळ वस्तू रजि. नं. ०२८३/२०२५ प्रमाणे तक्रार नोंदविलेली आहे, आमचे पक्षकार हे सदर मिळकतीवर एच.डी.एफ.सी बैंक शाखा पंढरपूर जि. सोलापूर यांचेकडे गहाणखताद्वारे अथवा इतर पध्दतीने बोजा निर्माण करणार आहेत, तरी तमाम लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीबाबत कोणाची तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून वर नमुद पत्त्यावर अथवा वर नमुद बँकेशी १५ दिवसाचे आत संपर्क साधावा.

हि जाहीर नोटीस दिली दिनांक :- २३/१२/२०२

सही/-
**ॲड. रमेश जोशी**
**काळा मारुती मंदिराजवळ,**
**पंढरपूर-४१३३०४**
**मो.न. ९८९०८००९४३**

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः ०८/०१/२०२६
दि.कि.अ.नं. १२८/२०२५ नि.५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मे. आर.पी. बागडे सो कोर्ट)**

**१) भोजलिंग मलका उर्फ मल्लिकार्जुन शिंदे,**
**वय ५८ वर्षे, धंदा - शेती,**
**रा. कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**ह.मु. येरवळे जुने गावठाण, ता. कराड, जि. सातारा**
**२) अक्काताई पोपट चव्हाण,**
**वय ६० वर्षे, धंदा - घरकाम,**
**रा. कापील, ता. कराड, जि. सातारा** — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १, २ हे सख्खे भाऊ-बहिण असून अर्जदार यांचे वडिल मलका उर्फ मल्लिकार्जुन शामा शिंदे हे होते. ते दि. १४/०४/२००९ रोजी मौजे येरवले, ता. कराड, जि. सातारा येथे वृध्दापकाळाने मयत झालेले आहेत त्यांचे नावे अर्जात नमूद मिळकत असून ते मयत झालेने त्यांना वारस अर्जदार हेच असून मयतास अर्जदाराशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत, अर्जात नमूद मिळकतीस वारस हक्काने नोंद होणेकरीता अर्जदारानी विनंती केली असता संबंधीत अधिकाऱ्यांनी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारानी ते मयत मलका उर्फ मल्लिकार्जुन शामा शिंदे यांचे वारस असलेबाबत वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनासंबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारखेस या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः २५/१२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक**
कोर्टाचा शिक्का
सही/- **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

## lassifieds

**पाहिजेत**

**कौस्तुभ इंजिनिअरिंग येथे Office Clerk (MS-CIT, Tally) - फोन करून येणे. होटगी रोड चव्हाण मोटर्समागे. 7720087726**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः २८/०१/२०२६
दि.कि.अ.नं. १३०/२०२५ नि.-६

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**

**शेखर शामराव चव्हाण,**
वय ०८ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. तुळशी, ता. माढा, जि.सोलापूर
अज्ञान, अ.पा.क. वडिल
**श्री. शामराव बळी चव्हाण,**
वय ३५ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र सरकार** — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदाराचे नावावरील डि.सोलापूर, सब डि. माढा पैकी मौजे तुळशी येथील जमीन ग.नं. २५०/१ पैकी क्षेत्र ०.१३ आर + पो.ख. ०.०७ आर एकूण ०.७० आर आकार रु.०.०६ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - ग.नं. २५०/१ पैकी, दक्षिणेस - फॉरेस्ट, पश्चिमेस - ग.नं. २५८०/१ पैकी वाघमारे यांची जमीन, उत्तरेस - ग.नं. २५०/१ पैकी उर्वरित ०.२० आर जमीन अज्ञान अर्जदार यांची मालकीची ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत आहे. अज्ञान अर्जदार यांचा सांभाळ, शिक्षण, पालनपोषण सर्व काही अज्ञान अर्जदाराचे वडिल हेच पाहत आहेत. अर्जदाराचे वडिलाची तशी ७/१२ हक्कपत्रकी अ.पा.क. नोंदही आहे अज्ञान अर्जदाराचे पालन पोषण, संगोपन सर्व कांही त्याचे वडिल हेच अ.पा.क. याच पाहत आहे. सदर अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन तिचे अ.पा.क. वडिल यानी सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले असून तसा व्यवहार ठरवलेला असून योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने त्याचे अज्ञान पालनकर्ते वडिलाने या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख २८/०१/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः १६/१२/२०२५

कोर्टाचा शिक्का
सही/- **अधिक्षक** **अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी व आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील मुळ सिटी सर्व्हे नं. ३८९१/६ सद्य परिस्थितीत सि.स.नं. ३८१३/६/५ याचे एकूण क्षेत्र २६५३.५९ चौ.मी. या मिळकतीमधील दक्षिण-मध्य भागातील मिळकत घरजागा याचे एकूण क्षेत्र ७२.४९ चौ.मी. यामध्ये तळ मजल्यावर दोन दुकान, पहिल्या मजल्यावर ०२ बीएचके चे बांधकाम, दुसऱ्या मजल्यावर दोन रुम त्यावर पत्रे असलेले बाकी आर.सी.सी. बांधकाम, संडास, बाथरुम सहीत या मिळकतीमध्ये अस्तित्वात असलेले लाईट व नळ कनेक्शन सह, सर्व बांधकाम सहीत संपूर्ण मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह.

ब) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील मुळ सिटी सर्व्हे नं. ३८९१/६ सद्य परिस्थितीत सि.स.नं. ३८१३/६/५ यामधील वर कलम अ मधील मिळकतीचे पुर्वेकडील खुली जागा यांचे एकूण क्षेत्र ८.३६ चौ.मी. या दोन्ही मिळकती एकमेकांस लगत आहे म्हणून त्यांच्या एकत्रात चतुःसिमा :- पुर्वेस - सदर मिळकतीपैकी साळुंखे यांची जागा, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - सदर मिळकतीपैकी दिलीप नवले यांची जागा उत्तरेस - टेलीफोन एक्सचेंज यांची जागा..

सदर वर नमुद कलम अ मधील मिळकत ही सईदा हुमायुन व्होरा, मोहम्मदअली हुमायुन व्होरा, वजीरा हुमायुन व्होरा, जैनब अब्दुलकादिर दाहोदवाला, मुर्तजा हुमायुन व्होरा, सर्वजण रा. ३८१३/६/५, वेअरहाऊस रोड, बार्शी यांच्या मालकीची आणि कलम ब मधील नमूद केलेली मिळकत ही रुकसाना अब्बासअली रावत रा. सोलापूर यांचे मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यानुसार सिटी सर्व्हे उताऱ्यावर त्यांच्या नावाची मालकी, कब्जेवहिवाट सदरी नोंद असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीस आहे. वर नमूद मिळकती जागा मालकांनी आमचे अशिलांना विक्री करणेबाबत व्यवहार करून इसारापोटी रक्कमेचा स्विकार केलेला आहे. वर नमूद मालक यांनी सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलास दिलेला आहे.

याउपरही वरील मिळकतीशी इतर कोणाचा खरेदीखत, साठेखत, कर्ज, इसार, इसारपावती, गहाण, दान, लिज, बोजा, वारसाहक्क, भाडेकरू हक्क, इजमेंटरी राईट इत्यादी प्रकारचा व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आत त्यांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करुन द्यावी व पुराव्यासह लेखी हरकत दयावी. मुदतीत कोणाची तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असल्याचे प्रामाणिकपणे गृहीत धरुन तसेच कोणाचेही काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वरील मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील नंतर मागाहून कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २४/१२/२०२५.

सही/-
**ॲड. सरफराझ मुश्ताक मुजावर**
**बी.ए., एल.एल.बी.**
**ऑफीस - बनाळे बिल्डींग,**
**आशा टॉकीजजवळ, बार्शी, ता. बार्शी**
**मो.नं. ९८८१०८७८६७**
**खरेदीदार अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी. ता. बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने आमचे खालील सही करणारे पक्षकार कळवू इच्छितात की,

डि.सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी. शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील जुना ग.नं.१०९९ याचा नवीन ग.नं.११०५ पैकी प्लॉट नं.९ पैकी पुर्वबाजुचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ७६.०० चौ.मी. आहे तसेच खरेदीखताप्रमाणे क्षेत्रफळ ७५.६४ असून गुंठेवारी प्रमाणपत्रानुसार क्षेत्रफळ ७५.६३ चौ.मी आहे याचे यासी चतुःसिमा पुर्वेस सदर गट नं.११०५ पैकी इक्बाल काजी यांचे मालकीचा प्लॉट नं.१० चे क्षेत्र, दक्षिणेस-४.५७ मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं.९ पैकी रणपिसे यांचे मालकीचा प्लॉट व उत्तरेस गट नं.११०४ ची जमीन याचे पाणी व वागणुक दक्षिणबाजुचे रस्त्याने जाते व आहे.

सदर मिळकत श्री. वाहिद साहेबलाल दुकानदार, रा. बारंगुळे प्लॉट, अमन चौक, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल श्री. गणेश रामहारी चोरमुले, रा.कोरेगांव, ता. बार्शी यांचेबरोबर खरेदी देणेचा व्यवहार ठरवून इसारादाखल रक्कम स्विकारुन इसारपावती बाबतचे ठराव करारपत्र कायदेशीर स्टॅम्पवर लिहून नोटरी अधिकारी यांचेसमोर नोंदवून दिलेला आहे त्याप्रमाणे आमचे अशिल वागणुक करण्यास तयार असतानाही ते कराराप्रमाणे वागण्यास तयार नाही आणि आमचेअशिलाबरोबरचा करार डावलून अन्यत्राशी व्यवहार करण्याची भाषा करु लागलेला आहे त्याबाबत आमचे अशिलानी नोटीस दिलेली आहे

तरी या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, वर नमूद मिळकतीसंबंधाने श्री. वाहिद साहेबलाल दुकानदार, रा.बारंगुळे प्लॉट, अमन चौक, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचेशी कोणीही कसलाही गहाण, दान, विक्री हस्तांतर, खरेदी वा तत्सम स्वरुपाचा हस्तांतर अगर कर्जबोजाचा व्यवहार वा दस्त करु नये याउपर कोणी दस्त वा व्यवहार केलेस तो आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, संबंधीतावर आमचे पक्षकार जरुर ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये व आमचे अशिलाचे कायदेशीर हक्काची सर्वत्रास जाणीव करुन द्यावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.२०/१२/२०२५

सही/-
**ॲड. महेश अशोक जगताप,**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय,
बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

### IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**आर्थिक मालमत्तांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** सध्या **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या कर्जांना त्यांच्या संबंधित मालमत्तांच्या गहाणाद्वारे सुरक्षितता प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन केले नाही आणि ते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** सध्या **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तकत्यामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि या रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 134826589 | मालमत्तेवर कर्ज | 1. जयवंत नारायण मदने<br>2. नारायण हरिबा मदने | 06/12/2025 | INR 5,28,011.08/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 1499 चा संपूर्ण भूखंड, एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 1089 चौरस फूट, आणि दगड, विटा व काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = 1089.00 चौरस फूट, एकूण बांधकाम क्षेत्र = 1089.00 चौरस फूट, गाव: महुद बुद्रुक, ग्रामपंचायत : महुद बुद्रुक, तालुका : सांगोला, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-413306, आणि ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :- पूर्व - विट भट्टी, पश्चिम - सखूबाई मदने, उत्तर - रस्ता, दक्षिण - जिजाबाई गरांडे. | | | | | |
| 2 | 125695582 | मालमत्तेवर कर्ज | 1. अमर लक्ष्मण कांबळे<br>2. लक्ष्मण भीका कांबळे | 06/12/2025 | INR 9,28,585.48/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३३१ असलेले संपूर्ण निवासी घर, ज्याचे एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ९०० चौरस फूट आहे, आणि दगड, विटा व काँक्रीट वापरून बांधलेल्या या घराच्या तळमजल्याचे क्षेत्रफळ ७५०.०० चौरस फूट आहे, जे मागरवाडी गाव, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे, आणि त्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत : पूर्व - रस्ता, पश्चिम - कृष्णा मगर, उत्तर - अभिमान कांबळे, दक्षिण - गोवर्धन कांबळे. | | | | | |
| 3 | 126017358 | मालमत्तेवर कर्ज | 1. नितीन किसन जाधव<br>2. वर्षाराणी नितीन जाधव | 06/12/2025 | INR 10,11,472.14/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १४४ असलेले संपूर्ण निवासी घर, एकूण जमिनीचे क्षेत्र १७५०.०० चौरस फूट आणि आर.सी.सी.ने बांधलेले घर, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = ८५०.०० चौरस फूट, एकूण बांधकाम क्षेत्र ८५० चौरस फूट, गाव : पुलूज, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे, आणि त्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :- पूर्व - बोळ, पश्चिम - हरिदास सुभाष देवकते, उत्तर - रस्ता, दक्षिण - सुनील दिगंबर जाधव. | | | | | |

या आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की, आपण वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, संबंधित तारखांपासून करारानुसार लागू होणाऱ्या व्याजासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** सध्या **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम अदा करावी. तसे करण्यात अयशस्वी झाल्यास, अधोस्वाक्षरी करणाऱ्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** सध्या **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, सरफेसी कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास भाग पडेल. तसेच, आपणास सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत, या सुरक्षित मालमत्तांची विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 25/12/2025**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

# वैभव सूर्यवंशीची १९० धावांची विक्रमी खेळी

**विजय हजारे चषक क्रिकेट**

**रांची, २४ डिसेंबर**

युवा सनसनाटी खेळाडू वैभव सूर्यवंशीने बुधवारी येथे अरुणाचल प्रदेशविरुद्धच्या विजय हजारे प्लेट गटाच्या साखळी सामन्यात बिहारकडून खेळताना ८४ चेंडूत १५ षट्कारांसह १९० धावांची धडाकेबाज खेळी केली, यात त्याने केवळ ३६ चेंडूत शतक पूर्ण केले.



गुणवत्तेच्या दृष्टीने सामान्य असलेल्या गोलंदाजीवर केलेल्या आपल्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक हल्ल्याने या १४ वर्षीय सलामीच्या फलंदाजाने ५० षटकांच्या देशांतर्गत स्पर्धेच्या पहिल्या दिवसाला एक वेगळीच झळाळी दिली.

सूर्यवंशीचे शतक हे लिस्ट ए क्रिकेटमध्ये कोणत्याही भारतीयाने केलेले दुसरे सर्वात वेगवान शतक आहे. भारतीय विक्रम पंजाबच्या अनमोलप्रीत सिंगच्या नावावर असून त्याने २०२४ मध्ये याच संघाविरुद्ध ३५ चेंडूत शतक ठोकले होते.

१५ षट्कारांशिवाय सूर्यवंशीने आपल्या खेळीदरम्यान १६ चौकारही मारले, हे विशेष म्हणजे यूएईमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या १९ वर्षांखालील आशिया चषकाच्या अंतिम सामन्यातील अपयशानंतर अवघ्या तीन दिवसांनी घडले.

या प्रकारच्या खेळातील सर्वात वेगवान शतकांच्या यादीत जेक फ्रेझर-मॅकगर्क (२९ चेंडू) (दक्षिण ऑस्ट्रेलियाकडून टास्मानियाविरुद्ध, २०२३-२४ हंगामात) आणि महान एबी डिव्हिलियर्स (३१ चेंडू) (दक्षिण आफ्रिकेकडून वेस्ट इंडिजविरुद्ध, जोहान्सबर्गमध्ये) यांचा समावेश आहे.

तथापि, सर्वात कमी वयात लिस्ट ए शतक झळकावण्याचा विक्रम आता सूर्यवंशीच्या नावावर आहे.

नाणेफेक जिंकल्यानंतर बिहारने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)

## बिहारचा अरुणाचल प्रदेशवर विजय गनीचे ३२ चेंडूंत विक्रमी शतक



साकीबुल गनी

बुधवारपासून प्रारंभ झालेल्या विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत रांची येथे खेळल्या गेलेल्या प्लेट गटाच्या साखळी सामन्यात वैभव सूर्यवंशी (१९०), आयुश लोहारुका (११६) व कर्णधार साकीबुल गनीच्या (नाबाद १२८) दमदार शतकांच्या बळावर बिहारने अरुणाचल प्रदेशवर ३९७ धावांनी शानदार विजय नोंदविला. बिहारच्या ५७४ धावांना प्रत्युत्तर देताना अरुणाचल प्रदेशचा संपूर्ण संघ ४२.१ षटकांत १७७ धावांतच गारद झाला. सकीबुल गनीने अवघ्या ३२ चेंडूंत शतक पूर्ण केले. भारतीयाकडून हे त्याचे चौथे जलद शतक ठरले. अरुणाचल प्रदेशच्या संपूर्ण संघाला झटपट गुंडाळताना बिहारच्या आताश राज व सुरज कश्यपने प्रत्येकी ३ बळी, हिमांशू तिवारीने २ बळी, तर शब्बीर खानने एक बळी टिपला.

## रोहित शर्माच्या शतकामुळे मुंबई विजयी



**जयपूर, २४ डिसेंबर**

रोहित शर्माच्या दमदार शतकाच्या बळावर मुंबईने येथे खेळल्या गेलेल्या विजय हजारे चषक सामन्यात सिक्कीमवर ११७ चेंजडू शिल्लक ठेवित ८ गड्यांनी शानदार विजय नोंदविला.

प्रथम फलंदाजी करताना सिक्कीमने ५० षटकांत ७ बाद २३६ धावा काढल्या. मुंबईने विजयासाठी आवश्यक २३७ धावा ३०.३ षटकांत २ गडी गमावित काढल्या. (वृत्तसंस्था)

## ईशानच्या शतकी खेळीला देवदत्तचे चोख प्रत्युत्तर

**अहमदाबाद, २४ डिसेंबर**

विजय हजारे चषक क्रिकेट सामन्यात येथे कर्नाटकविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात ३९ चेंडूंत १४ षट्कार व ७ चौकारांसह ईशान किशनने १२५ धावांची शतकी खेळी केली, परंतु चोख प्रत्युत्तर देत देवदत्त पडिक्कलने ११८ चेंडूंत १० चौकार व ७ षट्कार व १० चौकारांसह १४७ धावांची शतकी खेळी केली व आपल्या कर्नाटक संघाला १५ चेंडू शिल्लक ठेवित ५ गड्यांनी विजय मिळवून दिला.



ईशान किशन



देवदत्त पडिक्कल

विजय हजारे ट्रॉफीमध्ये इशान किशनने कर्नाटकविरुद्ध ३३ चेंडूत १०० धावा केल्या. हा जगातील तिसरा सर्वात वेगवान आणि भारतातील सर्वात वेगवान लिस्ट ए शतक आहे.

झारखंडने ९ बाद ४१२ धावा काढल्यानंतर कर्नाटकने ४७.३ षटकांत ५ गडी गमावित विजयासाठी आवश्यक ४१३ धावा केल्या. देवदत्त सामनावीर ठरला. (वृत्तसंस्था)

# लेखक संजय दुधाणेंच्या पुस्तकांचा रौप्यमहोत्सवी विक्रम

**मेजर ध्यानचंद पुस्तकाने गाठला विक्रमी २५ हजार विक्रीचा पल्ला; खाशाबा जाधव पुस्तकास २५ वर्ष पूर्ण, मराठीसह हिंदीतून आवृत्ती प्रकाशित**

**पुणे, दि. २४ डिसेंबर-**

लेखक संजय दुधाणे यांनी यंदा पुस्तक विश्वात रौप्यम होत्सवी विक्रमाची नोंद केली आहे. पुणे पुस्तक महोत्सवात दुधाणे यांच्या मेजर ध्यानचंदसह खाशाबा जाधव व नीरज चोप्रा पुस्तकास मोठा प्रतिसाद लाभला. संजय दुधाणेंच्या नॅशनल बुक ट्रस्टने प्रकाशित केलेल्या मेजर ध्यानचंद इंग्रजी चरित्र पुस्तकाने सर्वाधिक खपाचा नवा विक्रम केला आहे. दोन वर्षात पुस्तकाच्या ८ आवृत्या प्रकाशित झाल्या असून तब्बल २५ हजार पुस्ताकांची विक्री झाली आहे.

खाशाबा जाधव पुस्तकास यंदा २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. हे पुस्तकही नॅशनल बुक ट्रस्टने मराठीसह हिंदी भाषेत प्रकाशित केले आहे. पुणे पुस्तक महोत्सवात दुधाणे यांची मराठी, इंग्रजीसह हिंदी भाषेतील पुस्तकांना



वाचकांनी प्रतिसाद मिळाला आहे. पुणे पुस्तक महोत्सवातील लेखक आपल्या भेटीला या उपक्रम ात संजय दुधाणे यांना निमंत्रित करण्यात आले होते. पुस्तक महोत्सवात दुधाणे यांच्याशी वाचकांशी भेट घेऊन संवाद साधता आला. पुस्तकावर लेखकाची सही घेण्यासाठी वाचकांनी पसंती दिली. यावेळी पुस्तकाच्या निर्मितीची यशोगाथाही दुधाणे यांनी सांगितली. मूळात महाराष्ट्रात क्रीडाविषयक लेखक करणारे लेखक दुर्मिळ आहे, त्यात क्रीडा पुस्तक प्रकाशित करणारे प्रकाशकही फारसे उपलब्ध नसताना संजय दुधाणे यांच्या पुस्तकाचे देशात कौतुक होत आहे.

नॅशनल बुक ट्रस्टने २०२३ मध्ये मेजर ध्यानचंद यांचे चरित्र सर्वप्रथम प्रकाशित केले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नॅशनल बुक ट्रस्टने इंडिया ७५ या शिर्षकाअंतर्गत देशासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ७५ महान व्यक्तिमत्वाची निवड केली होती. यात दुधाणे यांच्या मेजर ध्यानचंद चरित्र पुस्तकाचा समावेश करण्यात आला. २०२३ मध्ये नॅशनल बुक ट्रस्टकडून ओरीसा, मध्यप्रदेश, जम्मू-काश्मिर, राजस्थान, बिहार येथील राज्य शासनाने अभ्यासक्रमासाठी मेजर ध्यानचंद चरित्र पुस्तकांची खरेदी केली.

तसेच नॅशनल बुक ट्रस्टच्या दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय बुक महोत्सवातही या पुस्तकाची म ोठ्या प्रमाणात विक्री झाली. नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत २५ हजार पेक्षा अधिक प्रति मेजर ध्यानचंद पुस्तकाच्या खरेदी केल्या गेल्या आहेत. पॅरीस ऑलिम्पिक निमित्ताने सकाळ प्रकाशनाकडूनही संजय दुधाणे लिखित ऑलिम्पिक चॅम्पीयन नीरज चोप्रा पुस्तक प्रकाशित करण्यात आले. म राठीसह इंग्रजीतूनही हे पुस्तक सकाळने प्रकाशित केले आहे. या पुस्तकालाही ॲमेझॉनकडून बेस्ट सेलरचा टॅग मिळाला आहे. सर्वाधिक पुस्तक विक्रीसह तीन भाषेतील चरित्र पुस्तकाचे दुधाणे हे देशातील पहिलेच क्रीडा लेखक ठरले आहेत.

## महत्त्वाचे



**दोहा** : येथे होणाऱ्या फिडे जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरू हम्पी आपले विजेतेपद कायम राखण्यासाठी सज्ज असून डी. गुकेशला हंगामाचा शानदार शेवट करण्याची संधी मिळेल. हंगामाच्या शेवटी होणारा हा भव्य सोहळा बुद्धिबळातील सर्वोत्तम खेळाडूंना आकर्षित करतो आणि आगामी स्पर्धेत पाच वेळा विश्वविजेता ठरलेला मॅग्नस कार्लसन, अमेरिकेचे फॅबियानो कारुआना आणि वेस्ली सो, रशियन ग्रॅण्डमास्टर इयान नेपोम्नियाची आणि भारताचे आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगासी आणि निहाल सरीन यांच्यासह अनेक खेळाडू ओपन गटात सर्वोच्च बक्षिसासाठी प्रयत्न करताना दिसतील. २०२४ मध्ये डिंग लिरेनला हरवून जागतिक विजेतेपद जिंकलेल्या डी. गुकेशवर या वर्षी इतर खेळाडूंनी मात केली आहे. या विजेत्याने २०२५ ची सुरुवात टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत सहकारी खेळाडू आर. प्रज्ञानंदकडून पराभवाने केली.



## विपुल पट्टनच्या शानदार खेळीमुळे मास्टर्स विजयी

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत विपूल पट्टनच्या( नाबाद ३१ व १ बळी) शानदार खेळीमुळे मास्टर्स अकादमीने पंढरपूरच्या कर्मयोगी विद्यानिकेतनचा ३ गडी राखून पराभव केला. तो सामन्याचा मानकरी ठरला. डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर झालेल्या साम न्यात कर्मयोगी विद्यानिकेतनने प्रथम फलंदाजी करताना ३५.३ षटकांत सर्वबाद १२४ धावा केल्या. त्यांच्याकडून प्राची कोंडाळकर २२ व अवनीश गरडने २१ धावा केल्या. मास्टर्स अकादमीकडून कुशाग्र वाघजने ३२ धावांत ३ व हर्षवर्धन सेन १६ धावांात ३ बळी टिपले. विजयी १२४ धावांचे लक्ष्य मास्टर्स अकॅडमीने ४२ षटकात ७ बाद १२६ धावा करीत गाठले. यात विपुल पट्टन नाबाद ३१ धावा केल्या. कर्मयोगी संघाकडून अवनीश गरडने ८ धावांत ३ गडी बाद केले.

# मुंबईतील वडाळ्यात आजपासून किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**मुंबई, दि. २४ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो असोसिएशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वी किशोर व किशोरी (सब ज्युनिअर - १४ वर्षाखालील) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २५ ते २८ डिसेंबर या कालावधीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. या बहुप्रतीक्षित राज्यस्तरीय स्पर्धेसाठीची गटवारी जाहीर करण्यात आली असून संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण २४ किशोर व किशोरी संघ सहभाग नोंदवणार आहेत.

**जेतेपदासाठी रंगणारी चुरस**

किशोर गटात गतविजेते धाराशिव तर किशोरी गटात गतविजेते सोलापूर जेतेपद राखण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. मात्र सर्वच गटांत प्रचंड तगडे प्रतिस्पर्धी असल्याने यंदाची स्पर्धा अत्यंत चुरशीची व उत्कंठावर्धक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रत्येक सामन्यात वेग, चपळता आणि डावपेचांचा सुरेख मिलाफ पाहायला मिळणार आहे.

**उद्घाटन सोहळ्याची तयारी**

या राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन गुरुवार २५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वा. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ (भारतीय क्रीडा मंदिर), सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. उद्घाटनप्रसंगी शिवकुमार लाड (विश्वस्त, श्री समर्थ व्या. मंदिर), पेडणेकर ज्वेलर्सचे आनंद पेडणेकर, प्रा. डॉ. जी. के. ढोकरट (प्राचार्य बीपीसीए, शारीरिक शिक्षण महाविद्यालय), महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, श्री समर्थ व्या. मंदिर व मुंबई मुंबई खो-खो संघटनेचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख, प्रमुख कार्यवाह सुरेंद्र विश्वकर्मा यांच्यासह महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे व मुंबई मुंबई खो-खो संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**राष्ट्रीय पातळीचे स्वप्न**

या किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतून आगामी किशोर व किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडूसाठी ही स्पर्धा स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची सुवर्णसंधी ठरणार आहे.

**स्पर्धेची गटवार विभागणी**

**किशोर गट :**

अ गट धाराशिव, बीड, जालना; ब गट ठाणे, पालघर, जळगाव; क गट पुणे, रायगड, लातूर; ड गट सातारा, मुंबई उपनगर, हिंगोली; इ गट सांगली, नंदुरबार, सिंधुदुर्ग; फ गट नाशिक, रत्नागिरी, धुळे; ग गट सोलापूर, मुंबई, परभणी; ह गट छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड.

**किशोरी गट :**

अ गट सोलापूर, रायगड, नंदुरबार; ब गट धाराशिव, अहिल्यानगर, सिंधुदुर्ग; क गट सांगली, छत्रपती संभाजीनगर, लातूर; ड गट पुणे, पालघर, जळगाव; इ गट ठाणे, धुळे, परभणी; फ गट सातारा, मुंबई, हिंगोली; ग गट नाशिक, मुंबई उपनगर, बीड; ह गट रत्नागिरी, जालना, नांदेड.





# यश कदम, ऋतुजा सुरवसे सोलापूर जिल्हा किशोर व किशोरी खो खो संघांचे कर्णधार

**वडाळा मुंबईतील राज्य स्पर्धेत भाग घेण्यासाठी जिल्हा संघ रवाना**

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा किशोर व किशोरी खो- खो संघाच्या कर्णधार व उपकर्णधारपदी अनुक्रमे यश कदम व यश खेडेकर आणि ऋतुजा सुरवसे व रिया चव्हाण यांची निवड सोलापूर म्युचर खो खो आसोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केली.

वडाळा मुंबई येथे २५ ते २८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या ३९वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत भाग घेण्यासाठी जिल्ह्याचे दोन्ही संघ रवाना झाले. या संघाचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर किशोर गटाचे लोकविकास विद्यालय वेळापूर (ता. माळशिरस) येथे झाले.

या संघास आमदार उत्तमराव जानकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी उपसरपंच जावेद मुलाणी, उद्योजक राजू शिंदे आदी उपस्थित होते.

किशोरी गटाचे शिबिर ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झाले. या संघास सोलापूर ऑम्युचर खो खो आसोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, पंच मंडळ सदस्य अजित शिंदे, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड आदी उपस्थित होते.

**संघ : किशोर** : संस्कार उपासे, यश खेडेकर, वेदांत भोसले, पवन जाधव (आदर्श, शेवते, ता. पंढरपूर), तुषार कोरे, चन्नवीर मंठूर, विनायक स्वामी (ए.एम.डोणज, मंगळवेढा), स्वप्नील गुंड (खंडोबाची वाडी, मोहोळ), प्रीतम पवार (दिनबंधू मंद्रूप), सार्थक साळुंके (उत्कर्ष), आदित्य ढेरे, सार्थक काळे (न्यू सोलापूर), यश बनसोडे, यश कदम (लोकविकास वेळापूर), श्रेयश जाधव (मरवेड, मंगळवेढा). प्रशिक्षक : अजित बनकर, व्यवस्थापक : आनंद जगताप.

**किशोरी** : ऋतूजा सुरवसे, कार्तिकी यलमार, समृद्धी यलमार, श्रेया यलमार, भक्ती चौधरी (कल्याणराव काळे स्पोर्टस क्लब वाडीकुरोली, पंढरपूर), अमृता ढेरे, आसावरी जाधव, आर्या काळे, प्रतीक्षा कांबळे (न्यू सोलापूर क्लब), राधिका कोळवले, अनुराधा देशमुख (अजनाळे), पवित्रा नागलगाव, अक्षता गंगोडा (समृद्धी स्पोर्टस, सोलापूर), रिया चव्हाण (उत्कर्ष,सोलापूर), गौरी शिंगण(शाहू स्पोर्टस्), **प्रशिक्षक** : सुनील चव्हाण, व्यवस्थापिका : सोनाली शिंदे



# भारताची वैष्णवी आडकर, माया राजेश्वर यांचा मानांकितांना पराभवाचा धक्का

**जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांची आयटीएफ टेनिस स्पर्धा**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २४ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत रशियाच्या मारिया गोलोविना, भारताच्यामाया राजेश्वरन रेवती, फ्रान्सच्यासेनिया इफारमोव्हा यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत आजचा दिवस गाजवला.

जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथील एमएसएलटीए टेनिस सेंटरवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये पहिल्या फेरीत रशियाच्या बिगर मानांकित मारिया गोलोविना हिने अव्वल मानांकित कोरियाच्या सोह्यून पार्कचा ६-१, ७-५ असा पराभव करून खळबळजनक निकालाची नोंद केली.

भारताच्या माया राजेश्वरन रेवती हिने पाचव्या मानांकितझील देसाईचा७-५, ७-६(५) असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. फ्रान्सच्यासेनिया इफारमोव्हा हिने भारताच्या चौथ्या मानांकित अंकिता रैनाचा६-३, ६-३ असा पराभव करून आगेकूच केली.

भारताच्या आठव्या मानांकित वैष्णवी आडकर हिने डेन्मार्कच्याएलेना जमशिदीचेआव्हान ७-५, ६-२ असे संपुष्टात आणले. सहाव्या मानांकित वैदेही चौधरीने क्वालिफायरसोहा सादिकवर६-१, ६-१ असा सहज विजय मिळवला. दुसऱ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती हिनेआकांक्षा नित्तूरेला ६-४, ६-० असे नमविले.

**अन्य निकाल: एकेरी:** सेनिया इफारमोव्हा(फ्रांस) वि.वि.अंकिता रैना(भारत)४ ६-३, ६-३; एम्मा व्हॅन पॉपेल (नेदरलँड)वि.वि.मारिया टकाचेवा(रशिया)३ २-२सामना सोडून दिला.

**दुहेरी:** लुंडा कुम्होम/ तनुचापोर्न योंगम ाेड(थायलंड)वि.वि.आकांक्षा नित्तूरे(भारत)/ सोहा सादिक(भारत) २-६, ७-६(८), १०-५;वैष्णवी आडकर २ /अंकिता रैना(भारत)वि.वि.पूजा इंगळे/ मधुरिमा सावंत(भारत)६-२, ७-६(४);श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती ४ /वैदेही चौधरी(भारत)वि.वि.पोलिना बखमुतकिना(बेलारूस)/मारिया गोलोविनाव्स६-२,६-२



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात राजेश्वर विद्यालयाचे यश

**जेऊर दि. २४ डिसेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर शिक्षण विभाग, पंचायत समिती करमाळा व नेताजी सुभाष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केत्तूर-२ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनात करमाळा तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील १६० तसेच माध्यमिक स्तरावरील ४८ विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेत श्री राजेश्वर विद्यालय, राजुरी येथील विद्यार्थी पृथ्वीराज दत्तात्रय दुरंदे व यशराज समीर कामटे यांनी इयत्ता नववी व बारावी या गटात नावीन्यपूर्ण व उपयुक्त प्रकल्प सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे विज्ञान विषयतज्ज्ञ व मार्गदर्शक प्रा. अमोल सोपान कोल्हे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल दोन्ही विद्यार्थ्यांचा स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संचालक कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कामगिरीमुळे विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापिका वैशाली कोल्हे, वैजनाथ स्वामी सेवा मंडळाचे संस्थापक सचिव लालासाहेब जगताप यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### ॲट्रॉसिटी आणि तलवारीने गंभीर मारहाणीचा आरोप असलेल्या आरोपीचा जामीन अर्ज मंजूर

**बार्शी, दि. २४ डिसेंबर-**

वैराग पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सचिन गोविंद मोहिते हे दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी भाजी आणणेकरीता मोटारसायकवरुन जात असताना आरोपीने हाक मारुन त्याच्या दुकानात बोलावून घेतले व जातीवाचक शिवीगाळी करुन ,टायरची रिम का बदललीस म्हणून तलावारीने व शॉकअपसर पाईपने डोक्यात व डाव्या हातावर मारहाण केल्याप्रकरणी भा.न्या.सं कलम-११८(१) ३५२, ३५१(२), ३५१(३) व आर्म्स ॲक्ट १९५४ कलम-४,२५ तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा ॲट्रॉसिटी ॲक्टप्रमाणे आरोपी योगेश बाळकृष्ण हजारे याच्यावर गुन्हा दाखल केला होता. यावेळी आरोपीच्यावतीने ॲड.राहुल पाटील यांनी आरोपीचे काम काज पाहणेकामी जामीन अर्ज दाखल केला होता. सदरच्या जामीन अर्जावर झालेल्या युक्तीवादावेळी आरोपीच्यावतीने ॲड. राहुल पाटील यांनी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीत व मेडीकल रिपोर्टमध्ये तफावत असल्याचे न्यायालयाच्या समोर मांडून जोरदार युक्तिवाद केला. ॲड. राहुल पाटील यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.व्ही.के. मांडे यांनी आरोपी योगेश बाळकृष्ण हजारे याचा जामीन अर्ज मंजूर केला. याकामी आरोपीतर्फे ॲड. राहुल पाटील, ॲड. विवेक गजशिव, ॲड. श्रीराम काशीद, ॲड. राजकुमार गुंड यांनी कामकाज पाहिले.



### जिल्हा लंगडी स्पर्धेसाठी पात्र खेळाडूंना साहिल आतार यांच्या वतीने क्रीडा किटचे वाटप

**वेळापूर, दि. २४ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वेळापूर येथील विद्यार्थिनींनी माळशिरस तालुका लंगडी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या कामगिरीवर विजयी संघाची जिल्हा लंगडी स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना पुढील स्पर्धेसाठी आवश्यक प्रोत्साहन मिळावे, यासाठी युवानेते साहिल आतार यांच्या वतीने क्रीडा किटचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी वेळापूर ग्रामपंचायतचे सरपंच रजनीश बनसोडे होते. यावेळी रणजीत सरवदे, दिलीप जगदाळे, उपाध्यक्ष सुनील साठे, शाळेचे मुख्याध्यापक तांबोळी, इंग्लिश स्कूलचे उपाध्यक्ष अमोल मंडलिक, युवानेते प्रदीप सरवदे, समाधान काळे, आहिल पठाण, अभिजीत गवळी, दयानंद वाघमारे आदी उपस्थित होते.



### लॉयन मेट्रोतर्फे दोन साहित्यिकांचा सन्मान

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

लॉयन क्लब सोलापूर मेट्रो तथा ब्रेन समुपदेशन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल सेंटर पॉईंट येथे उर्दू मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब अहमद नल्लामंदू व मनिष सुरवसे यांना साहित्यिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्या बद्दल साहित्य जीवन गौरव पुरस्काराने डॉ. चिखलीकर, प्रा किरण कुलकर्णी यांच्या हसते सन्मानित करण्यात आले. यावेळी ॲड. श्री निवास कटकूर, महिबुब शेख, विश्वनाथ आवटे, सोमशेखर भोगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## निधन वृत्त...

### प्रभावती सुरवसे



**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील श्रीमती प्रभावती दादा सुरवसे (वय ८९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोलापुरातील इंदिरा ज्ञानवर्धिनी या शैक्षणिक संस्थेचे सेक्रेटरी भिकाजी सुखदेव गाजरे यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत्या.

# प्रत्येक नागरिकांनी सजग ग्राहक बनावे: अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी

## प्रदर्शन व जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २४ डिसेंबर-**

राष्ट्रीय ग्राहक दिन हा ग्राहक हक्कांचे संरक्षण व जागरूकतेचा दिवस आहे. तो केवळ कायद्याची आठवण करून देत नाही, तर प्रत्येक नागरिकाला सजग ग्राहक बनण्याचे आवाहन करतो, असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमानिमित्त अध्यक्ष स्थानावरून निऱ्हाळी मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा ग्राहक तक्रार समिती सदस्य भारती सोनवणे, जिल्हा ग्राहक पंचायत अध्यक्ष शशिकांत हरिदास, श्रीमती शोभना सागर, तानाजी गुंडे यांच्यासह अन्य मान्यवर



उपस्थित होते.

ग्राहक दिन हा एका दिवसापुरता साजरा न करता कायमस्वरूपी प्रत्येक खरेदी विक्री व्यवहारात प्रत्येक नागरिकांनी अत्यंत जागृत राहिले पाहिजे. तसेच इतर सर्वसामान्य नागरिकांचेही त्या दृष्टीने प्रबोधन केले पाहिजे, जेणेकरून फसवणूक होऊ नये असे त्यांनी सांगितले. तसेच राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमानिमित्त आयोजित केलेले स्टॉल सर्वांनी पहावे व त्याबद्दल माहितीही घ्यावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा ग्राहक तक्रार समिती सदस्य भारती सोनवणे यांनी प्रथम सर्वांना ग्राहक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व ग्राहक संरक्षण कायदे अंतर्गत ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा जलद व्हावा या दृष्टीने सर्व नागरिकांचे समाज प्रबोधन व्हावे यासाठी सरकारने २०१९ साली सुधारित ग्राहक हक्क कायद्यात सुधारणा केली असं सांगितले. यावेळी शोभना सागर, शशिकांत हरिदास यांनीही मार्गदर्शन केले. राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा सर्व नागरिक ग्राहकांचे हक्क सुरक्षा व तक्रार निवारण या अनुषंगाने माहिती करून देणे हा असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाहीर रमेश खाडे यांनी संगणकीय न्यायबुद्धी धोरण या विषयावर पोवाडा गायला. राजन घाडगे यांनी सूत्रसंचालन केले.

**ग्राहकांसाठी हेल्पलाइन नंबर**

१८००११४००० किंवा Consumerhelpline.gov.in या संकेतस्थळावर देखील तुम्ही तक्रार नोंदवू शकता असे सांगितले. ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना नेहमी त्यावरील आयएसआय मार्क चेक करावा व त्या वस्तूची एक्सपायरी डेट नेहमी आवर्जून तपासावी. या सर्व गोष्टींचा हक्क प्रत्येक ग्राहकाला आहे.

## बार्शीत व्यापाऱ्यावर हल्ला, पत्नीला शिवीगाळ; चार जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ डिसेंबर-**

बार्शी शहरात टोळक्याने व्यापाऱ्यावर अमानुष हल्ला केल्याची धक्कादायक घटना तुळजापुर रोड परिसरात घडली आहे. या हल्ल्यात व्यापारी गंभीर जखमी झाला असून, आरोपींनी त्याला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

मांगडे चाळ, तुळजापुर रोड येथे राहणारे व मार्केट यार्डमधील गाळा क्रमांक ५६ येथे 'तारा इलेक्ट्रिकल्स' हे दुकान चालवणारे सचिन बाबुराव गायकवाड (वय ४१) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार २१ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास दुकानासमोर उभे असताना स्वप्निल उर्फ शिवा तांबे (रा. यशवंतनगर) याने महत्वाचे बोलायचे आहे असे सांगून बाजूला नेले. त्या ठिकाणी आधीच सुरज धोत्रे, ओंकार कात्रे (दोघे रा. मांगडे चाळ) व वैभव रणदिवे (रा. तुळजापुर रोड) उपस्थित होते. यावेळी तू फार शहाणा झाला आहेस का? असे म्हणत स्वप्निल तांबे याने सचिन गायकवाड यांची गच्ची पकडून जमिनीवर पाडले व हाताने मारहाण केली. त्यानंतर ओंकार कात्रे याने लाकडी काठीने नाकावर वार केल्याने गायकवाड गंभीर जखमी झाले. सुरज धोत्रेने मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. मारहाणी दरम्यान गायकवाडच्या गळ्यातील सोन्याची साखळी गहाळ झाल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. भांडणाचा आवाज ऐकून पत्नी रोहिणी गायकवाड घटनास्थळी आल्या असता, आरोपींनी शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. याची माहिती मिळताच दुकानातील कामगार रोहित पाटील तसेच नागरिक सागर माने, विशाल पवार व निखिल बगाडे यांनी मध्यस्थी करुन वाद सोडवला. नाकातून रक्तस्राव होत असल्याने जखमी सचिन गायकवाडला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी स्वप्निल उर्फ शिवा तांबे, सुरज धोत्रे, ओंकार कात्रे व वैभव रणदिवे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



## जिल्हा योगासन स्पर्धेत मेहता शाळेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

परिषद, राणी कित्तूर चन्नम्मा प्रतिष्ठान व रोटरी क्लब ऑफ सोलापूर आयोजित जिल्हा खुल्या योगासन स्पर्धेत जुळे सोलापूर येथील कै. वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेच्या खेळाडूंनी कामगिरी केल्यामुळे प्रशालेस सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

नु. म. वि प्राथमिक शाळा डफरीन चौक येथे या स्पर्धा पार पडल्या. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना योगशिक्षिका प्रतिमा स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व योगापटूंचे शाला समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी कौतुक केले. पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, क्रीडा प्रमुख अमित कोर्टीकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले खेळाडू असे**

सातवी आठवी गट : दूर्वा जाधव (उत्तेजनार्थ), असद शेख (द्वितीय), कपिल बिराजदार (तृतीय).

नववी दहावी गट : अनुष्का झाकणे (प्रथम), अंजली मनूरे (द्वितीय), प्रतीक राठोड (तृतीय).



## उर्दू केंद्र शाळा एकमध्ये फूड फेस्टिवल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

मुलांच्या व्यवहारिक ज्ञानात वाढ होण्यासाठी ''गणित दिना'' चे औचित्य साधून महानगरपालिका मुलांची उर्दू केंद्र शाळा क्रमांक एक येथे फूड फेस्टिवल साजरा करण्यात आला. सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी या फूड फेस्टिवल मध्ये भाग घेतला. फूड फेस्टिवलमध्ये मुलांनी वेगवेगळे खाद्य पदार्थ बनवून आणले. शाळेतील सर्व विद्यार्थी पालक शिक्षकानी याचा आनंद घेतला. या उपक्रमांच्या माध्यमातून वस्तूंची खरेदी व विक्रीचे गणितही त्यांना जमवता आले. या फेस्टिवलमध्ये महेजबीन खत्री, तय्यबा रब्बानी शेख, नशरा इमरान बागवान, समरीन इकबाल शेख, आसिफ अब्दुल गफार दर्जी, तस्मिया तहेरीन शेख, मेराज शेख आदी विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बीबी बानो शेख यांच्या हस्ते व मुख्याध्यापिका नसरीन माशाळकर यांच्या उपस्थितीत याचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांना आसमा परविन नल्लामंदू, बेनझीर शेख, निलोफर पठाण व हनीफ शेख यांनी मार्गदर्शन केले .

## साद काझी, फिरदोस शेख जिल्हा शुटींगबॉलचे कर्णधार

### सोलापूर जिल्हा सब-ज्युनिअर मुले व मुली शूटिंगबॉल संघ जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

जिल्हा सब-ज्युनिअर मुले व मुली शूटिंगबॉल संघाच्या कर्णधारपदी माळशिरसचा साद काझी व येथील फिरदोस शेख यांची निवड करण्यात आली.

जिल्हा सब-ज्युनिअर मुले व मुली शूटिंगबॉल अजिंक्यपद स्पर्धेतूनलातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सब-ज्युनिअर संघ असोसिएशनचे सचिव फैज अहमद बेगमपुरे यांनी जाहीर केला.

सोलापूर शहर व जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशन व समृद्धी स्पोर्टस क्लबच्यावतीने सुभाष उद्यान, शनिवार पेठ येथे झालेल्या या स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य म्हणून रफी दिवाण, श्रीनिवास कामूर्ती व अमीर काझी यांनी काम पाहिले. सर्व खेळाडूंचे समृद्धी स्पोर्टस क्लब चे अध्यक्ष प्रा. राजू प्याटी, असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, उपाध्यक्ष मा.अलीम शेख, मा.हारून मंगलगिरी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**सब ज्युनिअर संघ असा : मुले :** साद काझी (कर्णधार), झाहीद काझी, अझीम अत्तार, जुनेद मनेरी ( माळशिरस), बुसुफियान बदि), बासीद, अफान शेख, अम्मार बागवान, माज यैयद, अबुसुफियान शेख, जैन बक्षी, आशीष कांबळे (सोलापूर), **प्रशिक्षक:** अमन शेख, संघ व्यवस्थापक: सलीम करणकोट.

**मुली :** फिरदोस शेख (कर्णधार), निखत बागवान, अलमीनाज शेख, जिकरा नाईक, उजमा पठान , मुनीजा जेटफुल, नाजमीन जमादार, तुबा बागवान, आयेशा शेख, अरशी खान, सादीया इनामदार, आलिया बागवान (सोलापूर), **प्रशिक्षक :** इकबाल दलाल. संघ व्यवस्थापक: विष्णू तरभंडारे.



# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

विजापूर रोड, सैफुल येथील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मध्ये वार्षिक क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अंतर्गत महाविद्यालयामध्ये आंतरविभागीय क्रिकेट, रस्सीखेच, १०० मीटर रनिंग, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ यासारख्या इनडोअर व आउटडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम ए चौगुले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटीलतंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ एम. ए. चौगुले, उपप्राचार्य श्री एस. के. मोहिते व क्रीडा समन्वयक एस. एल. मुडगी यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी एन बी पवार, सी एस ढेपे, एस के कांबळे, एस एन गवंडी, जे पी पिंजार, एस आर मिठठा, एल एस मरगूर, बी के कोरे, आर एस मोटगी, एल एस बिराजदार, व्हि. आर. आवटे व जे. सी. सचदेव यांनी परिश्रम घेतले.

**क्रीडा स्पर्धेतील अंतिम निकाल ( विजेता, उपविजेता) : क्रिकेट-** मुले : विजेता : तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग, तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग. मुली : तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग.

**रस्सीखेच -** मुले: प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग. मुली: द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग

**टेबल टेनिस-** मुले : अरमान शेख (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), आदित्य हुंडेकर (तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग). मुली : श्रुती नडगेरी (द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग), मनू धुमाळ (प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग).

**बॅडमिंटन-** मुले : प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग. मुली : प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग.

**बुद्धिबळ-**मुले : अरमान शेख (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), साईप्रसाद कोणकट्टी (द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग). मुली : शुभश्री गरड (प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग). सोनाली राठोड (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग).

**१०० मीटर धावणे -** मुले : उत्कर्ष कस्तुरे (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), गणेश राऊत (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), मुली : पूजा लोणी (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), खुशबू कुमारी (तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग).

## आशेचा किरण



बायबल मधील जून्या करारामध्ये परमेश्वराने मानवाला दिलेले अभिवचन प्रभू येशुला या जगात पाठवून पूर्ण केले. देव म्हणतो, 'अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे, मृत्युच्छायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे. तू राष्ट्रांची वृध्दी केली आहे, त्याला महानंद प्राप्ती करून दिली आहे, हंगामाच्या उत्सव समयी करावयाच्या आनंदाप्रमाणे, लुट वाटुन घेणाऱ्या लोकांच्या आनंदाप्रमाणे ते तुजसमोर आनंद करितात. (यशया ९:२,३) ह्याच आनंदाची सुर्वाता देवदुतांनी रात्रीच्या वेळी रानात कळप राखीत असणाऱ्या मेंढपाळानां सांगितलि प्रभूचा देवदुत त्यांना म्हणाला, भिऊ नका, कारण पाहा जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे, त्याची सुर्वाता मी तुम्हांस सांगतो ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभु आहे आणि तुम्हास खूण ही कि बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत ठेवलेले एक बालक तुम्हांस आढळेल. इतक्यात स्वर्गातील सैन्यांचा समुदाय त्या देवदुताजवळ अकस्मात प्रगट झाला आणि देवदुत देवाची स्तुती करीत म्हणाले, उर्ध्वलोकी देवाला गौरव आणि पृथ्वीवर ज्यांच्यावर त्याचा प्रसाद झाला आहे त्या मनुष्यांत शांति (लुक २:१०-१४)

कारण यशया ९:६,७ मध्ये म्हटले आहे, कारण आम्हांसाठी बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे, त्याच्या खांदयावर सत्ता राहील, त्याला अदभुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणतील त्याच्या सत्तावृध्दीला व शांतीला अंत नसणार तो दाविदाच्या सिंहासनावर बसुन त्याचे साम्राज्य चालविल आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व धर्माने ढ व स्थिर करील. सेनाधीश परमेश्राचा आवेश हे सिध्दिस नेईल. आज अस्वस्थ अस्थिर, भरकटलेल्या वैफल्यग्रस्त, निराश व उदास झालेल्या मानवाला परमेश्वराने प्रभु येशु ख्रिस्ताला या जगामध्ये पाठवून आनंदाचा, शांतीचा स्थिरतेचे संदेश दिला आहे. हेच परमेश्वराचे वचन आजच्या मानवाला शांति, सुख समाधान स्थिरता देऊ शकते. हेच परमेश्वराचे अभिवचन मिळवून घेवून सर्व जगीक गोष्टीवर विजय प्राप्त करून घेवू. सर्वांना नाताळच्या हार्दिक शुभेच्छा.

**सुनिल मोरे**, मो. ९८८१७२१५७८

## महत्वाचे...



### पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने वै. विठोबा वड्डेपल्ली यांची पुण्यतिथी साजरी

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

पद्मशाली समाजाचे पितामह वैकुंठवासी, विठोबा शिवव्या वड्डेपल्ली यांची पुण्यतिथी पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी शांती चौक अक्कलकोट रोडवरील वैकुंठवासी विठोबा शिवय्या वड्डेपल्ली यांच्या अर्धपुतळयास पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड श्रीनिवास अं. क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, विश्वस्त, दिनेश यन्नम श्रीधर चिटयाल, व्यंकटेश आकेन, विजयकुमार गुल्लापल्ली, गणेश गुज्जा यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी वडेपल्ली कुटुंबियांच्या वतीने उपस्थित असलेले विठ्ठल वड्डेपल्ली व निशिकांत वड्डेपल्ली हर्षद व विहान वड्डेपल्ली, शिवकुमार महांकाळ, श्याम देवरकोंडा, गोविंद जटला याचे संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी पद्यशाली शिक्षण संस्थेचे कुचन प्रशालेचे उपप्राचार्य अनिल निंबाळकर व वड्डेपल्ली कुटूंबिय उपस्थित होते, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा श्रीनिवास कोंडी यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.



### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा कलागुणांचा उत्तम आविष्कार

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात पार पडला. आयुर्वेद वैद्य अमर बंडी यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे व मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. मुख्याध्यापिका सौ कल्याणी यांनी स्वागत प्रस्तावना व अहवालातून शाळेच्या विविध उपक्रम व शैक्षणिक उज्वल परंपरा याची माहिती दिली. मेहजबीन शेख यांनी प्रमुख पाहुण्यांचा अल्पपरिचय करुन दिला. स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक विकासाबरोबरच मुक्त पणे केली जाणारी सुप्त गुणांची उधळणच असतं. याच औचित्याने विद्यार्थ्यांनी श्रेया लाकडे व तेजस्विनी दुर्गम यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील आदर्श विद्यार्थीनीं म्हणून घोषित करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुणे आदर्श वर्ग निवडून विद्यार्थ्यांचे पालकांसोबत प्रमाणात व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आले. या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा बाबानगरे, भाग्यश्री गिडवीर, तेजश्री पगडीमल, निता लोहार, मधुस्मिता अच्छुगटला यांनी केले

### मनोहर सपाटे यांच्यावरील निलंबन मागे

**सोलापूर दि. २४ सप्टेंबर -**



माजी महापौर मनोहर सपाटे यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे पक्षाची बदनामी होऊ नये म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षांकडून श्री. सपाटे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. परंतु पोलिस यंत्रणेकडून संपूर्ण चौकशी होऊन यासंदर्भात चार्जशीट दाखल करण्यात आल्यामुळे आता कोणतीही चौकशी राहिलेली नाही. त्यामुळे श्री. सपाटे यांनी केलेल्या विनंतीनुसार प्रदेश अध्यक्षांच्या मान्यतेने निलंबन मागे घेण्यात आल्याचे सरचिटणीस रविंद्र पवार यांनी कळविले आहे.

# अक्कलकोट अन् दुधनीत युवा शक्ती ‘धुरंधर’

## भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी व शिवसेनेचे प्रथमेश म्हेत्रेंच्या विजयाने युवकांत उत्साह

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ डिसेंबर-**

अक्कलकोट नगरीच्या नगराध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीचे युवा नेते लोकाच्या मनातील फिक्स नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी तसेच दुधनीच्या नगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते प्रथमेश म्हेत्रे यांच्या विजयाने शहर तालुक्यातील युवकांत उत्साहाचे वातावरण पसरले आहे. अक्कलकोट आणि दुधनी नगराध्यक्षपदी युवा नेतृत्व निवडून आल्याने या शहरात शहरांच्या विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

अक्कलकोट नगरीच्या नगराध्यक्षपदी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे बंधू युवकांची मोठी फळी निर्माण करणारे भाजपाचे युवा नेते मिलन कल्याणशेट्टी यांना मतदारांनी मोठे मताधिक्य देत तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीच्या विकासाची संधी दिली आहे. मिलन कल्याणशेट्टी यांना एकूण मते १४ हजार ८६१ इतकी पडली आहेत. नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांना ८ हजार ५५३ मताचे मताधिक्य मिळाले आहे. इतके मताधिक्य आजपर्यंत कोणत्याच थेट नगराध्यक्षला मिळाले नाही.

मिलन कल्याणशेट्टी यांचा नम्र स्वभाव, मृदूभाषा, सर्वांशी हसत खेळत राहण्याची खिलाडू वृत्ती, हजारो तरुण कार्यकर्त्यांचे जाळे, थेट जनसंपर्क यामुळे नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांना मतदारानी भरभरून मतदान केले. नगराध्यक्षपद निवडणुकीच्या काळात हजारो कार्यकर्त्यांची सोबत मिलन कल्याणशेट्टी यांना मिळाली. तसेच विकासप्रिया आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे मोठे राजकीय पाठबळ मिलन कल्याणशेट्टी यांना मिळाल्याने त्यांचा विजयाचा मार्ग सोपा झाला. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीच्या नगराध्यक्षपदी हे तरुण तडफदार नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांची निवड झाल्याने युवा वर्गासह नागरिकात समाधानाचे वातावरण पसरले आहे. नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्याकडून अक्कलकोट शहर विकासाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. दुधनी शहराच्या नगराध्यक्षपदी म्हेत्रे घराण्यातील तिसऱ्या पिढीने बाजी मारली आहे. दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, शिवसेना शिंदे गटाचे शिवसेना युवा आघाडी जिल्हाप्रमुख, युवानेते प्रथमेश म्हेत्रे यांनी दुधनीच्या नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने विजय मिळविला आहे. नूतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांना एकूण ५ हजार १५७ मते मिळाली.

यामध्ये २ हजार ८६८ मताधिक्य प्रथमेश म्हेत्रे यांना मिळाले. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे तसेच शिवसेना नेते शंकर म्हेत्रे यांच्या प्रचंड अशा पाठबळामुळे प्रथमेश म्हेत्रे यांचा विजयाचा मार्ग सुकार झाला. ज्येष्ठ नेते स्वर्गीय सातलिंगप्पा म्हेत्रे यांचे पुण्याईमुळे नूतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांचा विजय होण्यास मदत झाली आहे. युवानेते प्रथमेश म्हेत्रे यांची तालुक्यात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. युवा नेते प्रथमेश म्हेत्रे यांचे पिताश्री ज्येष्ठ नेते शंकर म्हेत्रे यांचा असणारा मोठा जनसंपर्क , थेट जनतेची संवाद , युवा वर्गाची फळी , मतदारांना आपलेसे करणारा स्वभाव यामुळे प्रथमेश म्हेत्रे यांचा प्रचंड असा विजय झाला. वास्तविक पाहता दुधनीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी भाजपा उमेदवारांसाठी मोठी ताकद लावली होती. पण मतदाराने म्हेत्रे घराण्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. दुधनीत शिवसेना शिंदे गटाची संपूर्ण सत्ता आली आहे. थेट नगराध्यक्ष सह वीस नगरसेवक विजय झाले आहेत. या पुढील काळात दुधनीचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांच्याकडून विकासाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे हे नक्कीच विकास कामांसाठी झटतील अपेक्षा नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

**●सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक●**

# दुसऱ्या दिवशी १०३५ नामनिर्देशन अर्जांची विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज बुधवारी नॉर्थकोट प्रशाला येथील विविध सात निवडणूक कार्यालयातून एकूण १०३५ नाम निर्देशन अर्जांची विक्री झालेली आहे. मंगळवारी आणि बुधवारी अशा दोन दिवसात एकूण २ हजार १०९ नामनिर्देशन पत्र अर्जांची विक्री झाली आहे. आज माझी नगरसेवकांसह इच्छुक उमेदवारांनी अर्ज नेले आहेत. कोणत्याही उमेदवारांकडून आज एकही अर्ज दाखल करण्यात आला नाही.

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी दि. २३ ते ३० डिसेंबर २०२५ पर्यंत उमेदवारी अर्ज घेणे आणि स्वीकृतीची मुदत आहे. आज बुधवारी दुसऱ्या दिवशी विविध निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयासमोर अर्ज नेण्यासाठी मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. भाजपचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे रुपेश भोसले यांच्यासह अनेक इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र घेतले केले. काल मंगळवार दि.२३ डिसेंबर रोजी १०७४ अर्ज तर आज बुधवारी १०३५ अर्ज विक्री झाले. दोन दिवसात एकूण २१०९ अर्जांची विक्री झाली आहे. तर दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी एक खिडकी येथे ना - हरकत प्रमाणपत्रासाठी एकूण २१० अर्ज दाखल झाले आहेत.

**आज सुट्टी असल्याने अर्ज विक्री व स्वीकृती होणार नाही**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया दि. २३ ते ३० डिसेंबर २०२५ पर्यंत आहे. दरम्यान आज गुरुवार दिनांक २५ डिसेंबर रोजी शासकीय सुट्टी असल्याने नाम निर्देशन पत्र विक्री आणि स्वीकृती करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. अर्ज छाननी दि. ३१ डिसेंबर २०२५ असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत राहणार आहे. दिनांक ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल. याच दिवशी अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. दुसऱ्या दिवशीच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी व निकाल घोषित करण्यात येणार आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.



**कोणत्याही उमेदवाराकडून एकही अर्ज दाखल नाही**

### एक खिडकी कक्षात मोठी गर्दी; महिलांसाठी वेगळी खिडकी करण्याची गरज

महापालिकेने अर्ज दाखल करताना ज्या एनओसी घेणे गरजेचं आहे. त्यासाठी एक खिडकी योजना महापालिका प्रशासकीय इमारतीमध्ये सुरू केली आहे. या ठिकाणी चार खिडक्यांची सोय करण्यात आली आहे. पालिकेत एक खिडकीवर झुंबड उडाली होती. दरम्यान या ठिकाणी महिलांची ही गर्दी दिसून आली. यामुळे महिलांसाठी वेगळी खिडकी आणि रांग करण्याची गरज वर्तवली जात आहे.

**बुधवारी नामनिर्देशन अर्ज विक्रीचा तपशील याप्रमाणे**

| | |
|---|---|
| निवडणूक निर्णय अधिकारी - १ | १७३ |
| निवडणूक निर्णय अधिकारी - २ | १४८ |
| निवडणूक निर्णय अधिकारी - ३ | १३१ |
| निवडणूक निर्णय अधिकारी - ४ | १४२ |
| निवडणूक निर्णय अधिकारी - ५ | १८४ |
| निवडणूक निर्णय अधिकारी - ६ | ९० |
| निवडणूक निर्णय अधिकारी - ७ | १६७ |

**आज एकूण १०३५ नामनिर्देशन अर्जांची विक्री झालेली आहे.**

**१३.९१ लाख किमतीचे ३५ हजार ९६७ लिटर मद्य पदार्थ जप्त**

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने दि. १५ ते २४ डिसेंबर २०२५ दरम्यान एक ते २६ प्रभाग क्षेत्र अंतर्गत आचारसंहितापथकाकडून देशी - विदेशीसह विविध प्रकारचे १३ लाख ९१ हजार १७५ रुपये किमतीचे ३५ हजार ९६७ लिटर मद्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. सोलापूर महापालिका आचारसंहिता अहवालानुसार ही माहिती सोलापूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिली.



**उक्कडगावच्या महाविद्यालयात रॅगिंग**

## विद्यार्थ्याला खोलीत कोंडून बेदम मारहाण

**बार्शी, दि.२४ डिसेंबर-**

तालुक्यातील उक्कडगाव येथील एका महाविद्यालयात रॅगिंगच्या नावाखाली घडलेल्या अमानुष व संतापजनक घटनेने संपूर्ण तालुका हादरुन गेला आहे. अकरावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याला चार वरिष्ठ विद्यार्थ्यांनी खोलीत कोंडून क्रिकेटच्या स्टम्पने बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या हल्लूयात विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून सध्या त्याची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे कळते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित विद्यार्थी उक्कडगाव येथील संबंधित महाविद्यालयात अकरावीमध्ये शिक्षण घेत आहे. आरोपी विद्यार्थ्यांनी त्याला काही कामे करण्यास सांगितली होती. मात्र, त्याने ते काम करण्यास नकार दिल्याचा राग मनात धरुन चारही वरिष्ठ विद्यार्थ्यांनी त्याला जबरदस्तीने खोलीत नेले. त्यानंतर दरवाजा बंद करुन सलग चार तास त्याच्यावर क्रिकेटच्या स्टम्पने मारहाण करण्यात आली. मारहाण करणारे चारही आरोपी विद्यार्थी दारुच्या नशेत होते. नशेच्या अवस्थेत त्यांनी विद्यार्थ्याला शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेनंतर महाविद्यालयीन परिसरात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्याला त्याला तातडीने धाराशिव येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या माहितीनुसार, विद्यार्थ्याची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. महाविद्यालय प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून रॅगिंगसारख्या गंभीर गुन्ह्याकडे दुर्लक्ष कसे झाले, असा सवाल पालक व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, आरोपी विद्यार्थ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पालक व विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# राज्यात यंदा द्राक्ष बागांचे सरासरी ५० टक्केपर्यंत नुकसान

- द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक गवळी यांची खंत
- उर्वरित उत्पादकांना चांगले मार्केट मिळण्याची आशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

यंदा अतिवृष्टीने निर्माण झालेल्या नैसर्गिक संकटांमुळे द्राक्ष पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्षाच्या बागांवर कुऱ्हाडीचे घाव घालून ती वैतागाने उद्ध्वस्त केल्याचे ज्वलंत उदाहरण आहे. नाशिक विभागात ७० टक्के द्राक्ष बागांचे यंदा नुकसान झाले असून, पुणे विभागातही यंदा अतिवृष्टीमुळे ४० टक्केपर्यंत नुकसान झाल्याने द्राक्ष बागायतदार जाम वैतागले असून, एकंदरीत यंदा राज्यात सरासरी ५० टक्के नुकसान झाल्याची माहिती द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक (पुणे विभाग) हनुमंत गवळी यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना दिली.

दरम्यान, उर्वरित बागांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळेल, असा आशावादही गवळी यांनी व्यक्त केला. नाशिकप्रमाणेच पुणे विभागात विशेषत: सोलापूर जिल्ह्यातही या नैसर्गिक संकटांने झालेल्या नुकसानीमुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. ऑक्टोबरच्या द्राक्ष छाटणीनंतर नेमक्या प्लॉवरिंग स्टेज आणि घड निर्मितीची प्रक्रिया सुरु असताना परतीचा पाऊस सारखाच कोसळल्याने शेतकरी बांधवांनी पोटच्या लेकराप्रमाणे जपलेल्या द्राक्षाची मुळे सडून गेली, घड गळून गेले होते. सूर्यप्रकाश नसल्यामुळे फलधारणा झाली नाही. त्यामुळेच द्राक्ष बागेवरती काही जणांनी कुऱ्हाडीचे घाव घालून आपला संताप व्यक्त केला. या बागांवर लाखो रुपये खर्च करूनही हाती काहीच न लागल्याने अनेकांनी बागा मोडण्याचे टोकाचे निर्णय घेतले. यामुळे महाराष्ट्रातील कृषी संकटाचा आणि शेतकऱ्यांच्या हतबलतेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

सोलापूर जिल्ह्यात बदललेल्या हवामानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात अवकाळी पाऊस आणि सकाळी पडणाऱ्या दाट धुक्यामुळे द्राक्ष बागांवर दुहेरी संकट ओढवले होते. यंदा बुरशीजन्य रोगांपासून द्राक्षांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त औषधांची फवारणी करावी लागल्यामुळे त्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. एकीकडे अवकाळी पावसाचा थेट फटका आणि दुसरीकडे रोगांचा वाढता प्रादुर्भाव, या दुहेरी संकटामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी हवालदिल झाला असून, मोठ्या आर्थिक नुकसानीच्या भीतीने ग्रासला आहे. यामुळे द्राक्ष बागायदार शेतकऱ्यांचा शासन स्तरावर विचार करून त्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आहे.

**मोठ्या बागायदारांचे मोठे नुकसान!**

माझ्यासह अनेक मोठ्या शेतकऱ्यांच्या २० ते ४० एकराच्या आसपास द्राक्ष बागा आहेत. छोट्या-छोट्या कंपन्या चालविल्याप्रमाणे या बागात आमच्याकडे कामगार काम करतात. या कामगारांचा पगार, बागांवरील फवारण्या, आंतरमशागती, खते आदींवर सारखाच लाखांवर खर्च होतो. ऑक्टोंबरमध्ये बागांच्या छाटण्या केल्या. किमान नोव्हेंबरमध्ये तरी पाऊस थांबेल...अशी आशा होती मात्र सारख्या पडणाऱ्या पावसाने प्लॉवरिंग स्टेज आणि घडांचे मोठे नुकसान केले आहे. तरीही यंदा ५० टक्के बागांचे नुकसान झाले आहे. आता अवघ्या ५० टक्के बागांवर आमचा भविष्यकाळ अवलंबून आहे.

**- हनुमंत गवळी,**
संचालक, द्राक्ष बागायतदार संघ

# अटलजींचे व्यक्तिमत्त्व सर्वांना प्रेरणादायी

- भाजपा राष्ट्रीय उपाध्यक्ष शाम जाजू
- ड्रीम तर्फे अटल सन्मान सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**



राष्ट्रतेज भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी जयंती निम्मित ड्रीम फाउंडेशन,श्री सिध्देश्वर रिसॉर्ट व चाणक्य गुरुकुल बुधवारी अटल सन्मान २०२५ शाम जाजु, राष्ट्रीय उपाध्यक्ष भाजपा यांच्या शुभहस्ते वितरण करण्यात आला. अटलजी यांचे व्यक्तिमत्व सर्वांना प्रेरणादायी असून राष्ट्र उभारणी साठी त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत भाजपा राष्ट्रीय उपाध्यक्ष शाम जाजू यांनी सांगितले.

यावेळी गजानन धरणे अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र प्रांत विश्व हिंदू परिषद यांचा विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रदिपसिंह राजपूत जिल्हा सरकारी वकील, ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाण, दैनिक पुण्यनगरी चे संपादक व्यंकटेश पटवारी, गुरुषांत भतगुणकी यांची प्रमुख उपस्थित होते.

संयोजक काशीनाथ भतगुणकी संस्थापक ड्रीम फाउंडेशन यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचे उद्देश स्पष्ट केले. अटलजी यांच्या कवितेतून त्यांनी राष्ट्र उभारणी संदेश दिले मान्यवरांच्या शुभहस्ते ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज प्रतिमा पूजन करून उद्घाटन करण्यात आले. श्री सिध्देश्वर रिसॉर्ट सोरेगाव ते कुमठे विजापुर रोड सोलापूर येथे अटल राष्ट्र उभारणी प्रेरणा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्रदेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना गौरव करण्यात आला. यामध्ये हणमंत रामचंद्र कुलकर्णी ज्येष्ठ समाजसेवक अटल विचार मंच, विश्वनाथ आमणे निवृत्त बँक अधिकारी, राजश्री थळांगे ज्येष्ठ समाजसेविका, रंजीता चाकोते युवा नेत्या व महिला सक्षमीकरण कार्य अशोक भांजे, प्रा. डी एम जाधव एस पी एम पॉलिटेक्निक, दत्तात्रय पाठक द्वारकाधीश मंदिर व्यवस्थापक ज्येष्ठ नागरिक संघ. श्रीकांत कोकित्कर, युवा उद्योजक द्वारकाप्रसाद उपलप उद्योजक व समाजसेवक, गुरुलिंग कल्लुरकर ज्येष्ठ समाजसेवक कार्यवाहक गजानन महाराज मंदिर, लक्ष्मीकांत बिराजदार युवा उद्योजक, युसुफ पिरजादे ज्येष्ठ गायक, सिध्देश्वर फाउंडेशन भारत साठे, ज्येष्ठ समाजसेवक, अंबिका गुरव महिला बचत गट, पंडितराव लोहकरे तात्या, परमेश्वर भतगुणकी आदींचा सन्मान झाला.

श्री गजानन धरणे व श्री प्रदीप सिंह राजपूत यांचे ही मनोगत यावेळी झाले. सत्कारमूर्ती रंजिता चाकोते यांनी महिला सक्षमीकरण व राष्ट्र उभारणी अटल प्रेरणा यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रचालन सदाशिव व्हनमाने यांनी केले तर आभार सुरेश वाघमोडे यांनी मानले. कार्यक्रमास अटल प्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अस्सल सोलापुरी हुरडा व गावरान जेवणाने झाले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तामलवाडीत २९ वर्षीय महिलेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

एका गावातील २९ वर्षीय महिलेवर (नाव गोपनीय) लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तामलवाडी पोलिस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या प्रथम माहिती अहवालानुसार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ८.१५ वाजता संबंधित तरुणाने तिला दुचाकीवरून एका निर्जनस्थळी नेले. तेथे जीवास धोका असल्याची धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.



या प्रकरणी पीडितेने दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी तामलवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ३५१(२) व ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास तामलवाडी पोलीस करत आहेत.



# धाराशिव शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारणार

### राज्य मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय : पालकमंत्री प्रताप सरनाईक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

साहित्यसम्राट व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची ज्योत पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी या उदात्त हेतूने धाराशिव शहरात भव्य स्मारक उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निर्णयानुसार धाराशिव नगरपालिकेला सर्व्हे क्रमांक ४२६ येथील आवश्यक एक एकर जमीन भोगाधिकार स्वरूपात विनामूल्य, मूल्यरहित व महसूलमुक्त दराने उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या स्वप्नाला अधिकृत व ठोस स्वरूप प्राप्त झाले आहे.

जमीन नगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत पुतळा उभारणीसाठी आवश्यक सर्व परवानग्या देण्यात येणार असून, प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाणार आहे.

या स्मारकाच्या उभारणीसाठी नगरविकास विभागाने २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, या निधीतून स्मारक भव्य, दर्जेदार व प्रेरणादायी स्वरूपात साकारले जाणार आहे. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाचा बुलंद आवाज होते. त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी उभारले जाणारे हे स्मारक सामाजिक न्याय, समता व लोकशाही मूल्यांचे प्रतीक ठरेल.



धाराशिवच्या भूमीत उभे राहणारे हे स्मारक भावी पिढ्यांना प्रेरणा देणारे, परिवर्तनाची जाणीव करून देणारे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे तेज सदैव उजळवत ठेवणारे ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...



### गृहराज्यमंत्री डॉ. भोयर यांनी घेतले सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन

**तुळजापूर, दि.२४ डिसेंबर -**

राज्याचे गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा, कवड्याची माळ व महावस्त्र भेट देऊन मंत्री पंकज भोयर यांचा सहकुटुंब यथोचित सन्मान केला. तत्पूर्वी विश्वस्त तथा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे स्वागत केले. याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर, नागेश शितोळे, सहायक जनसंपर्क अधिकारी उमाकांत क्षीरसागर, सुजय मेश्राम, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, श्रीकांत पवार तसेच श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### मंगरुळ येथे मल्हारी माने व चीलवांते यांचा पदोन्नतीनिमित्त सत्कार

**मंगरूळ, दि.२४ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून सेवा बजावलेले मल्हारी माने यांची सोलापूर महानगरपालिका प्रशासन अधिकारी म्हणून, तर चीलवांते यांची वर्धा येथे उपशिक्षण अधिकारी म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल मंगरुळ बिटच्या वतीने मंगळवार, दि. २३ डिसेंबर रोजी संत गाडगे बाबा आश्रम शाळा, मंगरुळ येथे यथोचित सत्कार करण्यात आला. हा सत्कार माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व भेटवस्तू देऊन करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून हाके, काळे, वाले, डोलारे तसेच मंगरुळ परिसरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संत गाडगे बाबा आश्रम शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर क्षीरसागर व त्यांच्या सर्व सहकारी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.



### तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘जागतिक ग्राहक दिन’ साजरा

**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीत ‘जागतिक ग्राहक दिन’ अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहावे व कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीविरोधात ठामपणे आवाज उठवावा, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. पूनम तापडिया, जिल्हा संघटक, धाराशिव उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, आजचा युवक हा उद्याचा जागरूक ग्राहक आहे. वस्तू किंवा सेवा घेताना पक्के बिल घेणे व गुणवत्तेची खात्री करणे ही प्रत्येक ग्राहकाची जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.व्ही.डी. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.डी.डी. मुंढे यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, नेपते, वाघमोडे व दिगंबर जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी...

# कांदा भाव घसरल्याने तुळजापूर तालुक्यात शेतकरी अडचणीत



### शासनाने प्रतिक्विंटल ३०० रुपये अनुदान देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२४ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड करण्यात आली असून, तालुक्यातील शेतकरी परंपरेने कांदा उत्पादनावर अवलंबून आहेत. मात्र, मध्यंतरी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या मंगरूळ, अपसिंगा, सिंदफळ परिसरात खरीप हंगामातील कांद्याची काढणी सुरू असून अपेक्षित उत्पादन मिळालेले नाही.

पावसामुळे झालेले नुकसान आणि त्यातच बाजारात कांद्याच्या भावात सातत्याने होणारी घसरण यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून बी-बियाणे, खत व इतर साहित्य खरेदी केलेले असते. मात्र सध्या कांद्याला मिळणारा दर हा लागवडीचा खर्चही न निघणारा असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

कांदा लागवडीसाठी शेतकरी व त्यांचे संपूर्ण कुटुंब शेतात राबत असते. दोन ते तीन महिन्यांच्या मेहनतीनंतरही योग्य भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांची कष्टाची कमाई वाया जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर, शासनाने गेल्या वर्षीप्रमाणे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी मंगरूळ येथील कांदा उत्पादक महिला शेतकरी वनिता बाळासाहेब लबडे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना व्यक्त केली आहे.

# बसवेश्वर पुतळा अपमान प्रकरणी गुंजोटी गाव बंद



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२४ डिसेंबर -**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेल्या शिरढोण येथील समतानायक महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे अज्ञातांकडून विटंबन केल्याच्या निषेधार्थ गुंजोटी येथील सकल लिंगायत समाजाने २४ डिसेंबर रोजी शहर बंद ठेवून निषेध व्यक्त केला.

गावातील लोक श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र आले, महापुरुषांच्या जयजयकाराच्या घोषा केल्या, व १२व्या शतकातील समाज सुधारक व लिंगायत धर्म संस्थापक महात्मा बसवेश्वर यांचे विचार अभिवादन केले.

अज्ञात आरोपींवर तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी उमरगा तहसील कार्यालयास निवेदनाद्वारे करण्यात आली. गुंजोटीतील व्यापाऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे बंद पाडून शहर दिवसभर शुकशुकाट ठेवले.

यावेळी श्री बसवण्णा समितीचे अध्यक्ष महेश देशमुख, उपाध्यक्ष सोमनाथ पाटील, सचिव सुनील हारगुळे, सदस्य पिंटू पाटील, रवी देशमुख, धिरज देशमुख, पिंटू साखरे, स्वपनील देशमुख, योगेश साखरे, संगमेश्वर पाटील, प्रसाद हारगुळे, ओम कारभारी, नितीन पाटील, सोनू म्हेत्रे, सागर कारभारी, बबलु पाटील, अतुल साखरे, उमेश देशमुख यांच्यासह लिंगायत समाज बांधव व शिव-बसव प्रतिष्ठानचे दिनेश बिराजदार, अभय अष्टगे आदी उपस्थित होते.

# तुळजापूर जुन्या बसस्थानकात सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

जुन्या बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेऊन एका प्रवाशाच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी फिर्यादी सुकुमार अंतलेश्वर सुरवसे (वय ४०, रा. बालाजी नगर, धाराशिव ता. जि. धाराशिव) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, दि. १८ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४.१५ वाजता ते तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकात बसमधून उतरत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या पर्समधील ३९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या दागिन्यांची किंमत सुमारे १ लाख ५६ हजार रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि.२३ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम माहिती अहवालावरून तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# रुपामाता उद्योग समूहाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

रुपामाता उद्योग समूह, धाराशिव यांच्या नूतन वर्ष २०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन समूहाचे संस्थापक तसेच भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

यावेळी बोलताना औद्योगिक विकासासोबतच महिला सक्षमीकरण, कृषी व सहकार क्षेत्रात भरीव योगदान देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा समूहाचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. रुपामाता उद्योग समूहाच्या माध्यमातून सुशिक्षित युवक-युवतींसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जात असून, बँकिंग क्षेत्राद्वारे महिला सक्षमीकरण तसेच सहकार चळवळीला नवसंजीवनी देण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच शिक्षण संस्थांसह शेतकऱ्यांसाठी अल्प दरात वेअरहाऊस सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, रुपामाता डेअरीच्या माध्यमातून दुग्धव्यवसायास चालना देत जोडधंद्यांना प्रोत्साहन दिले जात आहे.

या दिनदर्शिका प्रकाशन समारंभास रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड-पाटील, रुपामाता मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, रुपामाता अर्बनचे मुख्य प्रशासकीय अधिकारी विशाल गुंड, अजय नाईक, चिफ अकाउंटंट विकास मंडाळे, नितीन मुदगल यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शाकंभरी नवरात्र आणि ख्रिसमस नाताळात दोनशेचा दर्शन पेड पास बंद

### भाविकांना धर्मदर्शन व मुख दर्शनासाठी बिडकर तलाव पायऱ्या मार्गे मंदिरात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ डिसेंबर -**

शाकंभरी नवरात्र महोत्सव आणि ख्रिसमस नाताळ सणा निमित्त भाविकांची होणारी गर्दी खूप मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे भाविकांचे दर्शन सुलभरित्या व्हावे म्हणून दि. २५ डिसेंबर रोजी मध्यरात्री १ वाजल्या पासुन ते दि.३१ डिसेंबर पर्यंत धर्मदर्शन व मुख दर्शन घेणाऱ्या भाविकांना बिडकर तलाव पायऱ्या मार्गे दर्शनमंडपात सोडण्यात येणार असल्याचे परिपत्रक मंदिर संस्थांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहे



तसेच दि.२५ डिसेंबर ते दि.४ जानेवारी या कालावधीत रुपये २०० रूपये सामान्य देणगी दर्शन पेड पास व रुपये २०० रूपयांचे रेफरल दर्शन पास बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच रुपये ५०० रूपये स्पेशल देणगी दर्शन पास घेणाऱ्या भाविकांना प्रशासकीय कार्यालयाच्या तळमजल्यातून पास वितरीत करण्यात येणार आहेत. सदर कालावधीत रू ५०० रूपये पासचे दर आहेत.

धारकांना व सिंहासन, अभिषेक पुजा पास धारकांना राजे शहाजी महाद्वार मार्गे मंदिरात दर्शनासाठी सोडण्यात येईल असे आदेश श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी प्रसिद्धी केलेल्या पत्रद्वारे भाविकांना कळविण्यात आले आहे.

# संवाद चर्चांच्या पडद्यावर धाराशिवचे लक्षवेधी युवा चेहरे; स्थानिकच नव्हे तर राज्याच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका !

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**

राज्याच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करणाऱ्या टेलिव्हिजन संवाद चर्चांमध्ये धाराशिव जिल्ह्याचे काही युवा चेहरे सातत्याने आपली ठसठशीत उपस्थिती नोंदवत आहेत. विविध राजकीय विचारसरणींचे प्रतिनिधित्व करत असले तरी अभ्यासपूर्ण मांडणी, मुद्देसूद युक्तिवाद आणि प्रभावी संवादशैलीमुळे हे चेहरे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

काँग्रेस पक्षाचे युवा नेते हणमंत पवार हे टेलिव्हिजन चर्चांमध्ये तथ्याधारित आणि अभ्यासपूर्ण मांडणीसाठी ओळखले जातात. सामाजिक व राजकीय विषयांवर बोलताना ते आकडेवारी, धोरणात्मक मुद्दे आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर भर देतात. त्यामुळे त्यांची मांडणी केवळ राजकीय भूमिकेपुरती मर्यादित न राहता व्यापक सामाजिक संदर्भ अधोरेखित करणारी ठरते.

हणमंत पवार हे धाराशिव तालुक्यातील सुंभा सारख्या ग्रामीण भागातील आहेत. पवार यांची महापालिका निवडणुकीसाठी स्टार प्रचारक पदी निवड झाली असून दररोज राज्यभरातील टिव्ही चॅनल्स वरून काँग्रेस पक्षाची बाजू भक्कमपणे मांडणारा काँग्रेसचे प्रवक्ते असून शेतकऱ्यांचे प्रश्न,अन्याय अत्याचारा विरोधात सातत्याने संघर्ष करणारे गांधीवादी नेतृत्व युवकांमध्ये लोकप्रिय आहेत.







राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा नेत्या सक्षणा सलगर या संवाद चर्चांमधील ठाम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्पष्ट भूमिकेमुळे वेगळी ओळख निर्माण करत आहेत.

महिला, युवक, शिक्षण आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर त्या प्रभावीपणे आपली बाजू मांडतात. तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करताना त्या आक्रमकता आणि मुद्देसूदपणा यांचा समतोल साधताना दिसतात, ज्यामुळे चर्चांमध्ये त्यांचे मत ठळकपणे समोर येते.

सक्षणा सलगर या धाराशिव तालुक्यातील तेर येथील असून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या युवती जिल्हाध्यक्ष पदापासून सुरु झालेला प्रवास राज्य युवती अध्यक्ष आणि आज राष्ट्रीय युवती अध्यक्ष पदावर काम पाहत आहेत. एक अभ्यासु आणि सेवाभावी माजी जिल्हा परिषद सदस्य म्हणून ही जबाबदारी पार पाडली आहे.

राज्यातील विविध निवडणूकींत स्टार प्रचारकाची जबाबदारी पक्षाने त्यांना दिली होती. शिवसेनेचे ॲड. योगेश केदार हे कायद्याची जाण आणि धारदार युक्तिवाद यामुळे संवाद चर्चांमध्ये प्रभावी भूमिका बजावत आहेत.

संवैधानिक बाबी, न्यायालयीन निर्णय आणि कायदेशीर चौकट यांचा संदर्भ देत ते आपली भूमिका स्पष्ट करतात. त्यामुळे चर्चांमध्ये त्यांच्या मांडणीला वजन प्राप्त होते आणि विरोधी बाजूला प्रत्युत्तर देताना त्यांची तयारी दिसून येते.

योगेश केदार हे तुळजापूर तालुक्यातील सलगरा (दि.) येथील असून युवराज संभाजीराजे छत्रपती यांचे खाजगी स्वीय सहायक म्हणून उत्तम काम करत राजकीय प्रवास सुरु केला. शिवसेना पक्षाचे प्रवक्ते म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. मराठा आरक्षण चळवळीत महत्वपूर्ण योगदान देत वेळोवेळी वैचारिक परखड मते मांडत आहेत. योगेश यांचा सर्व पक्षीय नेत्यांशी असणारा सुसंवाद जमेची बाजू आहे.

हे तिन्ही युवा चेहरे वेगवेगळ्या पक्षांचे प्रतिनिधित्व करत असले, तरी टेलिव्हिजन माध्यमांवर धाराशिव जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर पोहोचवण्याचे काम करत आहेत. संवाद चर्चांच्या माध्यमातून उभारी घेत असलेले हे नेतृत्व भविष्यात स्थानिकच नव्हे तर राज्याच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गावात बस येईना; गावकऱ्यांसह विद्यार्थ्यांची पायपीट काही थांबेना

**त.भा. वृत्तसेवा/शंकर मिटकर**

**शिरूर अनंतपाळ, २४ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सावरगाव या गावाने अद्याप राज्य परीवहन महामंडळाची बस पाहिलीच नाही. ग्रामस्थांने मागणी करुनही बस चालू झाली नाही. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा निवेदन करूनही अद्याप गावात बस आली नाही. गावात बस येईना, गावकऱ्यांसह विद्यार्थ्यांची पायपीट थांबेना अशी परीस्थिती झाली आहे.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सावरगाव हे शिरूर अनंतपाळ पासून पंधरा ते सोळा किलोमीटरवर असलेले तालुक्यातील शेवटचे गाव आहे या गावात स्वतंत्र ग्रामपंचायत नाही.दहा किलोमीटरवर असलेल्या रापका या गावाशी ग्रुप ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायत काही काम असेल तर सकाळी लवकर उठून चार किलोमीटर हिप्पळगाव येथे पायी चालत जावे लागते. सकाळी नऊ वाजताची गाडी गेली तर मिळेल त्या वाहनाने नाहीतर वापस जावं लागते.आणि महत्त्वाचे काम असेल तर पुढे सहा किलोमीटर अंतर पायी चालत जावे लागते. म्हणुन या कडे लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष केंद्रित करून सावरगाव येथील नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी येथील नागरिकांमधून होते आहे.



सावरगाव या गावात पन्नास ते पंचावन्न च्या आसपास उंबरठा असून चारशे ते पाचशे एवढी लोकसंख्या आहे. गावात जिल्हा परिषदेची पाचवीपर्यंत शाळा आहे. मात्र, एवढे असूनही गावात राज्य परिवहन महामंडळाची बस येतच नाही. गावात बस येत नसल्याचा सर्वांत मोठा फटका विद्यार्थ्यांना, तसेच गावातील प्रवाशांना व रुग्णांना बसतो. पाचवीनंतरच्या शिक्षणासाठी गावातील जवळपास तिस ते चाळीस विद्यार्थी बोरी आणि लातूर येथे शिक्षणासाठी जातात. विद्यार्थ्यांना चालत किंवा सायकलवर शाळेला यावे लागते. पदवी, पदव्युत्तर, आयटीआय आदी शिक्षणासाठी लातूर किंवा शिरूर अनंतपाळ याठिकाणी जावे लागते.

पावसाळ्यात आणि हिवाळ्यात या विद्यार्थ्यांना अधिकचा त्रास होतो. सावरगाव या गावासाठी डांबरीकरणाचा रस्ता आहे. बस चालू केल्यानंतर विद्यार्थ्यांना शिरूर अनंतपाळ, बोरी व लातूरला ये-जा करण्यासाठी सोय होणार आहे. दहावी, बारावीपर्यंत एकाच शाळेत शिक्षण कसे मिळेल हे पाहिले जाते. सुरक्षितता व सुखकर प्रवासासाठी अहिल्याबाई होळकर योजनेतून एसटीचा पास काढून शिक्षणासाठी शहरात विद्यार्थिनींना पाठविण्याचे प्रमाण मोठे असल्याचे चित्र आहे.या योजनेचा फायदा आमच्या विद्यार्थ्यांना कधी मिळणार या योजनेपासून सावरगाव येथील विद्यार्थी वंचित राहणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विद्यार्थिनींची अनेक किलोमीटरची पायपीट बंद होईल, या उद्देशाने शासनाने अहिल्याबाई होळकर योजनेतून पहिली ते बारावीपर्यंत मुलींना शिक्षण दर्जेदार मिळावे, यासाठी एसटीचा मोफत प्रवास देण्याचा निर्णय घेतला.

यामुळे ग्रामीण भागातून शहरात शिक्षण घेण्यासाठी मुलींची संख्या वाढली आहे. यासाठी गाव ते शाळा या दरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करणे हा शासनाचा मुख्य हेतू आहे. मात्र, सावरगाव येथून बसची सुविधा नसल्याने मुलींना या योजनेचा फायदा होत नाही.

सावरगाव गावात अद्याप बस आली नाहीतर विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कसा मिळेल . काही महिन्यांपूर्वी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना गावातील नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले होते.निवेदन करुनही अद्याप बस चालू झाली नाही. यामुळे पावसाळा,हिवाळा, उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बस चालू करून विद्यार्थ्यांची पायपीट थांबवावी यासाठी उपसरपंच प्रितम माने,वामणराव पाटील, भागवत बोळेगावे, परमेश्वर करवंदे, हणमंत शिंदे, ललिता बोळेगावे, सुरेश जामगे, रमजान सय्यद, मारोती सोनवणे, संग्राम बोळेगावे, सुभाष मोमले, कांतराव गाथाडे, वसंत ठोंबरे, सुनिता जामगे, सुजाता बोळेगावे, रुक्मिणी मोमले अनिता जामगे, जनाबाई माने, बिस्मिल्ला सय्यद, विमला बोळेगावे यांच्यासह गावातील अनेक नागरिकांनी तरुण भारत प्रतिनिधीशी बोलताना गावाची व्यथा मांडली.

# बस्वकल्याण-नांदेड बस अचानक केली बंद

**त.भा. वृत्तसेवा/ रियाज मोमीन**

**वलांडी, २४ डिसेंबर :** :सिमाभागातील प्रवाशांची सोय व्हावी म्हणून गेल्यां चार वर्षांपासून सुरू असलेली बस्वकल्याण नांदेड बस ही अचानक बंद केल्याने या भागातील शिक्षकांसह विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत आहेत. कहर म्हणजे याबाबत कर्नाटक एस टी परिवहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना कर्नाटक लोकप्रतिनिधीनी भ्रमणध्वनीवर सुचेना दिल्यानंतरही बस चालु झाली नाही. यावरुन एसटी प्रशासन जुमानेना एवढेच म्हणावे लागेल. महामंडळाने लोक प्रतिनिधींच्या मागण्यांनाही जुमानले नसल्याचे चित्र सध्या बसवकल्याण-नांदेड मार्गावर दिसून येत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता या मार्गावरील बससेवा अचानक बंद करण्यात आल्यामुळे सर्वसामान्य प्रवासी, शिक्षक व विद्यार्थ्यांचे हाल सुरू झाले आहेत.

बसवकल्याण-नांदेड हा मार्ग शिक्षण, आरोग्य व नोकरीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी नांदेड येथे जातात, तर अनेक शिक्षक व कर्मचारी नियमितपणे या बससेवेवर

## कर्नाटक एसटी प्रशासन लोकप्रतिनिधांना जुमानेना; शिक्षकासह, विद्यार्थी प्रवाशांचे हाल

अवलंबून असतात. मात्र बससेवा बंद झाल्याने विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा व महाविद्यालय गाठणे कठीण झाले असून शिक्षकांनाही उपस्थितीबाबत अडचणी येत आहेत. परिणामी शैक्षणिक कामकाजावरही विपरीत परिणाम होत आहे.

ग्रामीण भागातील प्रवाशांना खासगी वाहनांचा अवाजवी भाडे देऊन प्रवास करावा लागत असून आर्थिक भार सहन करावा लागत आहे. विशेषतः गरीब व मध्यमवर्गीय प्रवाशांसाठी ही परिस्थिती अत्यंत त्रासदायक ठरत आहे. बससेवा बंद करण्यामागील ठोस कारणे अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नाहीत, तसेच कोणतीही पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शरणु सलगर व खासदार सागर आंग्रे यांनी बंद केलेली बससेवा सुरू करण्याची मागणी केली होती, मात्र कर्नाटक एसटी महामंडळाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सार्वजनिक वाहतूक ही जनतेची मूलभूत गरज असताना महामंडळाचा हा मनमानी कारभार निषेधार्ह असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

बसवकल्याण-नांदेड बससेवा तात्काळ पूर्ववत सुरू करावी, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशाराही प्रवासी व नागरिकांकडून दिला जात आहे.

संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन विद्यार्थी, शिक्षक व सर्वसामान्य प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# उद्योगाला चांगले दिवस यावेत

**■ ग्राहक जनजागृती सेवा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे यांचे मत**

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २४ डिसेंबर :** येत्या २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन हा आपण शासना तर्फे राभवतोत पण तो राबवत अस्थानी आज आपण पाहतोत की येखादी गोष्टी चा तुतवडा झाला की त्या वस्तूची किंमती पेक्षा जास्त किमतीला तो विकतो



या बद्दल ग्राहकाचे नुकसान होतो अत्ता आपण उधारण घेऊयात की १ लिटर पानी बोटल ची किंमत असते १५ रुपये पन दुकानदार २० रुपायाला विकतो मग हि लुट नाही का आपण कायदे बनवतो त्याची खरच ज्या दिवशी अमलबजावणी झाली तर तो खरा ग्राहक दिन साजरा होईल.

आज महाराष्ट्र पाहिल तर काहिं जिल्ह्यात १०० रुपय चा स्टेंप पेपर हा १२० ला विकला जातो ही २० रुपायाची लुट झाली तरी सर्वसामान्य वैक्ती आवाज उठवत नाहीत पन आशा घटना झाल्यावर अधिकारी यांनी तात्काळ कारवाई केल्यास व त्याचे योग्य उपाय योजना केल्यास तो खरा ग्राहक दिन साजरा होईल व त्या दिवशी आपण खरा ग्राहक दिन साजरा केला असे म्हणता येईल.

आम्ही आमच्या ग्राहक जनजागृती सेवा संस्था तर्फे महाराष्ट्र भर जनजागृती अभियान राबवून ग्राहकास खरच ग्राहक दिन साजरा होण्यासाठी कायमच प्रयत्न करनार आहोत. पन ग्राहक स्वता जागरुक झाला पाहिजे असे मत ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे यांचे राष्ट्रीय ग्राहक हक्क दिना निमित्त मत मांडले.

# साने गुरुजींचे श्यामची आई हे संस्कारक्षम पुस्तक

**त.भा. वृत्तसेवा**

**अहमदपूर, २४ डिसेंबर :** प.पू. साने गुरुजी यांनी लिहिलेल्या श यामची आई या पुस्तकात त्यांच्या आईने त्यांच्या लहानपणी त्यांच्यावर केलेल्या संस्काराच्या गोष्टी अनमोल आहेत. त्यामुळे या बदललेल्या संस्कृतीमध्ये घराघरात श यामची आई या पुस्तकाचे वाचन करून जतन करावे असे आग्रही प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधिकारी अरविंद रायभोळे यांनी केले.

ते संत ज्ञाने श वर विद्यालयात आयोजित पूज्य साने गुरुजी जयंतीनिमित्त अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला हेलस आणि मानस फाऊंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गणेश शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव तथा प्राचार्य श्रीमती रेखाताई हाके- पाटील, स्पर्धेचे

## : उपविभागीय पोलीस अधिकारी रायभोळे

निरीक्षक प्रा. गुरुनाथ चवळे, निरीक्षक प्रा. डी. एन. माने, साहित्यिक मेनका धुमाळ, राज्य आदर्श शिक्षक सुर्यकांत बोईनवाड, कथामालेचे लातूर जिल्हा संयोजक राम तत्तापुरे, सह संयोजक संगीता आबंदे, मुख्याध्यापक आशा रोडगे-तत्तापुरे, मुख्याध्यापक मीना तोवर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

बालगटामध्ये इयत्ता पाचवी ते सातवी यात ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्ह्यात सर्वप्रथम जिजामाता कन्या विद्यालय लातूरची कु. श वेता सचिन वीर, यशवंत विद्यालय अहमदपूर ची कु. ईकरा इस्माईल शेख द्वितीय, संत ज्ञाने श वर विद्यालय अहमदपूर ची कु. स्वरा शिवदास बोळेगाव तृतीय राहिली असून किशोर गटामध्ये इयत्ता आठवी ते दहावी यात सर्वप्रथम जिजामाता कन्या विद्यालय लातूरची कु. स्नेहा संजय सूर्यवंशी, द्वितीय संत ज्ञानेश्वर विद्यालय अहमदपूर ची कु. संध्या राहुल हुडगे, तृतीय संत ज्ञानेश्वर विद्यालय अहमदपूरची कु. श्रुती गजानन हाके यांनी पारितोषिक पटकावले.

विजयी स्पर्धकांना ट्रॉफी, सन्मानपत्र, श्यामची आई हा ग्रंथ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी निरीक्षक प्रा.डी एन माने यांचे मनोगत पर भाषण झाले. अध्यक्षीय समारोप प्राचार्या रेखाताई हाके- पाटील यांच्या भाषणाने झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संयोजक राम तत्तापुरे यांनी सुत्रसंचालन संगिता आबंदे- पाटील यांनी तर आभार आशा रोडगे- तत्तापुरे यांनी मानले.

कार्यक्रमाचा शुभारंभ प पू.साने गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या प्रार्थनेने करण्यात आला. समारोप पसायदानाने करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. कदम यांच्या पुस्तकांची विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २४ डिसेंबर :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील साहित्यिक तथा मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबईचे सदस्य प्रा.डॉ.नरसिंग कदम यांच्या महात्मा फुलेचे कार्य : शोध आणि बोध, महात्मा फुले : साहित्य आणि विचार या दोन संपादित पुस्तकांची उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद विद्यापीठ अंतर्गत येथील मराठी विभागाच्या अभ्यास मंडळाच्या बैठकीत एम.ए.प्रथम वर्ष सत्र १ पेपर पाच मराठी चरित्र या अभ्यासक्रमासाठी संदर्भग्रंथ म्हणून अधिकृतपणे निवड करण्यात आलेली आहे.



तशा निवडीचे पत्र त्यांना उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.अरुण कुलकर्णी यांचे प्राप्त झाले. त्यांचे २२ पुस्तके प्रकाशित आहेत. अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये ७० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. विविध वर्तमानपत्रातून त्यांचे ८० पेक्षा जास्त समीक्षात्मक लेख प्रकाशित झालेले आहेत.ते पीएचडीचे संशोधन मार्गदर्शक आहेत. महाराष्ट्रातील अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना आणि ब्लर्ब लेखन दिलेले आहे. संभाजीनगर येथील तिफण या त्रैमासिकाचे संपादक मंडळाचे ते सदस्य आहेत.तसेच विविध समित्यावर ते कार्यरत आहेत.

या निवडीबद्दल त्यांचे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, सचिव पी.टी. शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सहसचिव हिरागीर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, सदस्य ज्ञानदेव झोडगे, रामराव एकंबे, काकासाहेब पाटील,भिमराव पाटील, पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील,उस्मानिया विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ.बागडी नम्रता,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे, पत्रकार बांधव, प्राध्यापक,कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रपरिवारांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# 'किलबिल'च्या विद्यार्थ्यांनी घेतला ख्रिसमस डे चा आनंद



**त.भा. वृत्तसेवा**

**अहमदपूर, २४ डिसेंबर :** येथील किलबिल नॅशनल स्कूलमध्ये ख्रिसमस डे आनंदी व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी ख्रिसमस गीतं, नृत्य याच्या माध्यमातून येशू ख्रिस्तांचा प्रेम, शांती व बंधुभावाचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचवला.

कार्यक्रमात सांताक्लॉजच्या वेशात आलेल्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट्स व भेटवस्तू वाटप करून आनंद द्विगुणित केला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

यावेळी संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य, संतोष पाटील, समन्वयक के ओ जॉर्ज, दिना मॅडम, रमा गुडसुरकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना ख्रिसमस सणाचे महत्त्व सांगितले. प्रेम, करुणा, आपुलकी व मानवतेचा संदेश अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील प्रि प्रायमरी चे सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण आनंद, उत्साह आणि सकारात्मकतेने भारावून गेले.

# 'वनस्पति ताण व्यवस्थापन'वर राष्ट्रीय स्तरावर व्याख्यान

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २४ डिसेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे गोवा विद्यापीठ, गोवा येथील जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. डॉ. श्रावणी कोरगावकर यांचे 'वनस्पति ताण व्यवस्थापन' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील व्याख्यान यशस्वीपणे संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवशंकर हल्लाळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राहुल अल्लापूरे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. अश्विनी भाताडे यांनी करून दिला.

यावेळी साधन व्यक्ती म्हणून बोलताना डॉ. श्रावणी कोरगावकर यांनी भात संशोधन व हवामान बदल या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

बदलत्या हवामान परिस्थितीत वनस्पती कशा प्रकारे तग धरून राहतात, त्या परिस्थितीनुसार कशी प्रतिक्रिया देतात तसेच कोणती जीवरसायने वनस्पतींना ताण सहन करण्याची क्षमता प्रदान करतात याचे शास्त्रीय विवेचन त्यांनी केले. ताण सहन करण्यासाठी सॅलिसिलिक आम्ल हे महत्त्वाचे रसायन असून ते वनस्पतींमध्ये संरक्षणात्मक भूमिका बजावते, असेही त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी कृषी नवोपक्रमांकडे वळावे, जेणेकरून नवनवीन पिकांच्या जाती विकसित करता येतील, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. शिवशंकर हल्लाळे यांनी भाताच्या विविध प्रजाती तसेच ताण व्यवस्थापन यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. राहुल अल्लापूरे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. शैलेश ममदापुरे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्यामार्य कन्या विद्यालयात श्रीनिवास रामानुजन जयंती निमित्त गणित दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २४ डिसेंबर :** श्यामार्य कन्या विद्यालयात गणिताचे जादूगार श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे गणित विषयाचे प्राध्यापक डॉक्टर भालचंद्र दासराव करंडे उपस्थित होते. मंचावर पर्यवेक्षक विजय बैले, मीनाक्षी आणले, वनमाला मुक्कावार, संगीता सुतार, माधव कांबळे, माणिक कांबळे, प्रमोद कावरे उपस्थित होते.

गणित विषयातून तुम्ही डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फायनान्स, अॅक्चुरियल सायन्स, इंजिनिअरिंग स्टॅटिस्टिक्स, टीचिंग, अॅनालिस्ट, अॅक्चुरिअर, इंजिनिअर, शिक्षक, आर्थिक सल्लागार अशा विविध आगामी नवीन ट्रेंडिंग करिअरमध्ये त्यांचे भविष्य घडवू इच्छितात, त्यांच्याकडे



रिसर्च आणि खढ यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये करिअर करू शकता; ज्यात डेटा विश्लेषक, क्वांटिटेटिव्ह भूमिका मिळतात, ज्यांना सध्या प्रचंड मागणी आहे. जे विद्यार्थी बारावीमध्ये गणिताचा अभ्यास करत आहेत आणि इंजिनीअरिंगसहित इतर अनेक करिअर पर्याय आहेत. असे विद्यार्थी कोणत्या विषयांसह गणिताचा अभ्यास करू शकतात आणि नोकरीचे पर्याय काय असतील याविषयी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर भालचंद्र दासराव करंडे यांनी माहिती दिली.

२२ डिसेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय गणित दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस प्रख्यात गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त समर्पित आहे. रामानुजन यांनी गणिताच्या क्षेत्रात अपार योगदान दिले असून त्यांचे संशोधन आजही अनेक शोधांना प्रेरणा देते. गणित हे केवळ आकड्यांचा खेळ नसून विज्ञान, तंत्रज्ञान आणि दैनंदिन जीवनाचा पाया आहे.

विद्यार्थ्यांनी गणिताची गोडी जोपासावी, यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे. रामानुजन यांचा प्रेरणादायक प्रवास आपल्याला कठोर परिश्रम, जिज्ञासा आणि चिकाटीचे महत्त्व शिकवतो. चला, त्यांच्या कार्याचा आदर करून गणित क्षेत्रात पुढाकार घेऊया, असे अध्यक्ष स्मारकातून मुख्याध्यापक प्रवीण भोळे यांनी माहिती दिली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी गणित विषयासंदर्भात रांगोळी, मितीपत्रक व गणित मॉडल्स प्रदर्शनात सहभाग नोंदवलेला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणित विषय विभाग प्रमुख सचिन तिवारी व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल मुंडकर, अस्मिता बिरादार तर आभार राहुल गुरमे यांनी व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

**निलंगा येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयात**

नि.दि.दावा क्र.२२७/२०१९

**(नवनाथ वि.सुरेश व इतर)**

निशाणी क्र.६१

प्रतिवादीचे नाव - **प्र.वा.क्र.५ - बालाजी पुंडलिक शिंदे,** वय - ६३ वर्षे, धंदा - शेती, रा.बेवनाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.

सदर जाहीर समाज सुधार/नोटीसी द्वारे आपणास कळविण्यात येते की, वादी - नवनाथ कुशाबा पिटले रा. बेवनाळ ता.शि. अनंतपाळ जि. लातूर यांनी तुमच्याविरुद्ध दावा दाखल केलेला आहे. तुम्हाला बरेच वेळा कोर्टामार्फत नोटीस काढली असता आपण बजावून घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणून वादीने वकीलामार्फत तुमच्याविरुद्ध जाहीर नोटीस काढण्यासबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे. . कोर्टाने आपल्याविरुद्ध जाहीर नोटीस काढण्यास संबंधित हुकूम केला आहे. म्हणून तुम्हास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी तसेच तुमच्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेऊन इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज हजर करण्यासाठी दि.२२/१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), निलंगा यांच्या न्यायालयात आपण स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर रहावे. अन्यथा तुमच्याविरुद्ध एकतर्फी आदेश करून या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दि.२३/१२/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आले.

**(आदेशावरून)**

**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व.स्तर), निलंगा, ता.निलंगा, जि, लातूर**

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विविध उपक्रमांनी गणित दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**
श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये गणित प्रकल्प प्रदर्शन, सेमिनार, गणित प्रश्नमंजुषा आदी विविध उपक्रमांच्या माध्यमातून गणित दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना म ान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे व उपप्राचार्य संतोष घारगे यांच्या हस्ते गणित प्रकल्प प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक मोहन शिंदे, गणित विभागप्रमुख जीवन पाटील, गणित शिक्षिका ज्योती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात ज्योती शिंदे यांनी गणित दिनाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर मानसी सोनटक्के, ज्ञानेश्वरी पाटील, अनुष्का मोरे, प्रेम ओहाळ, सानवी भोसले, शुभम सुरवसे आदी विद्यार्थ्यांनी महान गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनकार्याची माहिती सादर केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ गायकवाड, आर्यन पवार, वाणी चंदणे, प्राची सारोळकर, सौरभ राठोड, संध्या डोईफोडे आदी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सेरेंटिका कंपनीकडून ४० दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप

### शेतकऱ्यांसाठी मोफत हेल्पलाईनचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**
धाराशिव जिल्हा आर्थिकदृष्ट्या म ागास म्हणून ओळखला जातो. ही ओळख बदलण्यासाठी जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी सेरेंटिका कंपनी कार्यरत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

सेरेंटिका कंपनीच्या वतीने जिल्ह्यातील ४० दिव्यांग नागरिकांना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सेरेंटिका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजीत नारायण, कर्नल विक्रम अय्यंगार, अमित चक्रवर्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, सेरेंटिका कंपनीकडून दिव्यांग बांधवांना मदतीचा हात दिला जात असून ही सामाजिकदृष्ट्या कौतुकास्पद बाब आहे.

युवक-युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य कंपनी करत आहे. भविष्यात दिव्यांग व्यक्तींनाही रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यात यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सेरेंटिका कंपनीच्या पवनऊर्जा प्रकल्पाशी संबंधित शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी १८०० २०२ ८७३५ हा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे.

या हेल्पलाईनचे उद्घाटनही जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. या हेल्पलाईनद्वारे पवनचक्की प्रकल्पाशी संबंधित जमीन, वाटेचा वापर, नुकसान भरपाई, मोबदला तसेच अन्य अडचणींबाबत शेतकऱ्यांना कंपनीशी थेट संवाद साधता येणार आहे.

सेरेंटिका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजीत नारायण म्हणाले, प्रकल्प उभारताना स्थानिक नागरिकांच्या गरजांचा विचार करून मदत करण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असतो. चालण्यास अडचण असलेल्या गरजू व्यक्तींना व्हीलचेअर देण्याचा आमचा संकल्प आज पूर्ण झाला आहे. शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली ही हेल्पलाईन पारदर्शकता, संवाद आणि विश्वास वाढविण्यास मदत करेल. धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या अडचणींसाठी टोल-फ्री क्रमांक १८०० २०२ ८७३५ वर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सेरेंटिकाच्या अधिकाऱ्यांकडून तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करून योग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ही सुविधा केवळ सेरेंटिकाच्या पवनऊर्जा प्रकल्प लाभार्थी शेतकऱ्यांसाठी असणार आहे.

# लोकशाही बळकटीसाठी एसआयआर विधेयक व निवडणूक सुधारणांवर सविस्तर बैठक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**
लोकशाही अधिक मजबूत व पारदर्शक करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून नवीन डखठ (Special Intensive Revision) विधेयक व निवडणूक सुधारणा (Election Reforms) यासंदर्भात भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, धाराशिव येथे सविस्तर बैठक पार पडली.

या बैठकीत मतदारयादीत पात्र नागरिकांचे नाव समाविष्ट करणे, मृत्यू पावलेल्या व्यक्तींची नावे वगळणे तसेच घुसखोर/अपात्र नागरिकांचे मतदान अधिकार रद्द करून त्यांची नावे मतदारयादीतून काढून टाकणे या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

मतदार यादी अधिक पारदर्शक, अचूक व विश्वासार्ह कशी करता येईल,

यावर मार्गदर्शन करताना म तदार यादीतील त्रुटी दूर करणे, पात्र मतदारांची योग्य नोंदणी करणे आणि अपात्र मतदारांना यादीतून वगळणे हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

निवडणूक आयोगाच्या निर्दे शानुसार मतदारांची पडताळणी करण्यात येते. यासाठी नागरिकांना ऑनलाईन (ECINET pp) तसेच ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध असून, कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क नाकारला जाऊ नये आणि म तदार यादीत कोणतीही अपात्र व्यक्ती राहू नये, याबाबत उपस्थित कार्यकर्त्यांना सविस्तर व योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीस मल्हार पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नूतन नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे, शहराध्यक्ष अमित भैया शिंदे, नेताजी आबा पाटील, सुनील काकडे, राहुल काकडे, राजसिंह राजेनिंबाळकर, दत्ता बंडगर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आळणी आरोग्य उपकेंद्रास आरोग्य सेवा संचालकांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ डिसेंबर -**
राज्याचे आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी सोम वारी, दि.२२ डिसेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, येडशी अंतर्गत येणाऱ्या आळणी (ता. धाराशिव) येथील आरोग्य उपकेंद्रास सदिच्छा भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. या भेटीदरम्यान उपकेंद्रातील कार्यपद्धतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत काही महत्त्वाच्या सूचना दिल्या.




डॉ. अंबाडेकर यांनी उपकेंद्राच्या इमारतीची पाहणी करत प्रसूती कक्ष, लसीकरण विभाग तसेच औषध साठवणूक कक्षाची सविस्तर तपासणी केली. केंद्रात येणाऱ्या रुग्णांना वेळेवर व दर्जेदार उपचार मिळत आहेत का, आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचाराची व्यवस्था कशी आहे, तसेच संदर्भ सेवा कोणत्या पद्धतीने दिली जाते, याबाबत त्यांनी उपस्थित आरोग्य कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली.

यावेळी आळणी येथील आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व आशा स्वयंसेविकांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात आरोग्य उपकेंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. माता व बाल आरोग्य सर्वेक्षणात कोणतीही कसर राहू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

**डॉ. अंबाडेकर यांच्याकडून आरोग्य केंद्राचे कौतुक...**

तसेच 'आरोग्यवर्धिनी केंद्रा'च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या असंसर्गजन्य रोगांवरील (उच्च रक्तदाब, मधुमेह) तपासणी मोहिमेचाही त्यांनी आढावा घेतला. लसीकरण मोहिम ेअंतर्गत कार्यक्षेत्रातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, याची दक्षता घ्यावी. गरोदर महिलांची नियमित तपासणी व उपचार करावेत. उपकेंद्र परिसर स्वच्छ व निर्जंतुक ठेवावा, तसेच रुग्णांचे अभिलेख (रेकॉर्ड) व औषध साठा अद्ययावत ठेवावा, अशा महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना त्यांनी दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी आरोग्य उपसंचालक (लातूर परिमंडळ) डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी तसेच तालुका आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आळणी येथील ग्रामस्थांनीही आरोग्य संचालकांशी संवाद साधून परिसरातील आरोग्य सुविधांबाबत चर्चा केली.

# प्रा. डॉ. श्रीराम मुळीक यांना राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५ प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ डिसेंबर -**
कै. बसवंत नागू शिंगाडे सामाजिक सेवाभावी संस्था ट्रस्ट, बेळगाव (महाराष्ट्र-कर्नाटक-गोवा) यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५ हा भव्य व प्रेरणादायी पुरस्कार सोहळा कोल्हापूर येथे मोठ्या उत्साहात नुकताच पार पडला. समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, शिक्षण व वैचारिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अमर कांबळे (अध्यक्ष, नालंदा विद्यापीठ, कोल्हापूर) हे होते, तर दीपप्रज्वलन मिस इंडिया शुभांगी शित्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात कळंबचे सुपुत्र प्रा. डॉ. श्रीराम मुळीक यांना त्यांच्या समाजोपयोगी, प्रेरणादायी व सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन आदर्श समाजभूषण, शिक्षण गौरव पुरस्कार (राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार २०२५) प्रदान करून गौरविण्यात आले.

त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असून अनेक युवकांना प्रेरणा मिळत असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

### महाविस्तार ए.आय. ॲपद्वारे शेतकऱ्यांचे डिजिटल सक्षमीकरण...

# सास्तूर गाव राज्यातील पहिल्या दहा गावांत; लोहारा तालुका जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२४ डिसेंबर -**
महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या महाविस्तार ए.आय. ॲप 'पोखरा' या प्लॅटफॉर्मवर राज्यभर शेतकऱ्यांची नोंदणी सुरू असून, हे ॲप शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र म्हणून कार्य करत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यास शास्त्रशुद्ध व रिअल-टाइम कृषिविषयक सल्ला देऊन सक्षम करणे हीच महाविस्तार पमागील मुख्य संकल्पना आहे.

या प्लॅटफॉर्मवर हवामान अंदाज, मातीची माहिती, बाजारभाव (मंडई), शासकीय योजना आदी सर्व माहिती एकत्रितपणे उपलब्ध करून देण्यात आली आहे. मराठी व इंग्रजी भाषेतील चॅटबॉटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक परिस्थितीनुसार व गरजेनुसार सल्ला सहजपणे मिळतो.

**सास्तूर गावाची राज्यात भरारी...**
महाराष्ट्र शासन कृषी विभागांतर्गत लोहारा तालुक्यातील सास्तूर गावचे सहाय्यक कृषी अधिकारी दीपक माधवराव जाधव यांनी गेल्या सहा दिवसांत महाविस्तार ॲप नोंदणीसाठी अतिशय उत्कृष्ट कार्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे लोहारा तालुका जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आला असून, सास्तूर गावाचा राज्यातील पहिल्या दहा गावांमध्ये समावेश झाला आहे.

क्लिष्ट कृषी माहिती आणि प्रत्यक्ष शेतीतील निर्णय यातील दरी भरून काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाविस्तार ॲप करत आहे.

या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांसाठी थेट अर्ज, हवामान सल्ला, कृषी शास्त्रज्ञांचा सल्ला तसेच शेतीपूरक योजनांची सविस्तर माहिती मिळत असून, हे ॲप शाश्वत शेती, डिजिटल सक्षमीकरण आणि समृद्ध गावे या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

या उल्लेखनीय यशामुळे सास्तूर येथील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनही दीपक जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. महाविस्तार ॲपमुळे शेती अधिक आधुनिक, माहितीसमृद्ध व फायदेशीर होत असल्याची प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत.

# दुधाळवाडी येथे एनएसएस विशेष शिबिर : व्यसनमुक्ती दिंडी, शेतकरी दिन व योगासन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२४ डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील दुधाळवाडी येथे ज्ञानोद्योग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येरमाळा यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या अनुषंगाने मंगळवार, दि.२३ डिसेंबर रोजी व्यसनमुक्ती दिंडी, राष्ट्रीय शेतकरी दिन तसेच योगासन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



या कार्यक्रमास येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे, येरमाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, ज्ञानोद्योग विद्यालयाचे प्राचार्य सुनील पाटील, माजी सरपंच रामकिसन कोकाटे, माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष बालाजी लाटे, ग्रामपंचायत सदस्य गोविंद मुंडे, कैलास लुंगारे, मधुकर लाटे, बिबीशन बांगर, अमोल दुधाळ, सूर्यभान लाटे, निवृत्ती लाटे, विश्वास लुंगारे यांच्यासह ग्रामस्थ व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दुधाळवाडी गावातून विविध सामाजिक संदेश देणाऱ्या घोषणांसह भव्य व्यसनमुक्ती दिंडी काढण्यात आली.

या दिंडीच्या माध्यमातून सम ाजात व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. यावेळी म ार्गदर्शन करताना डॉ. संदीप तांबारे यांनी व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम विशद केले. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व पटवून देत वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सकारात्मक जीवनशैली व शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय शेतकरी दिनाचे औचित्य साधून दुधाळवाडी गावातील शेतकऱ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या संघर्षमय जीवनाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुनील पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. सुशील शेळके यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. हनुमंत कोकाटे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी अश्विनी कळसे, प्रा.व्ही.एम. शिंदे, प्रा. कैलास जाधव, प्रा. सयाजी बारकुल, प्रा. विनोद बारकुल, प्रा. अनिल साहू, हरिश्चंद्र लाटे, बाबासाहेब बारकूल, दत्ता जेवे, बापू लोंढे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# नळदुर्ग नगरपालिकेत इतिहास घडला : पहिल्यांदाच भाजपचा झेंडा; २० पैकी १३ नवे चेहरे सभागृहात

**राजकिय विश्लेषण...**
**विलास येडगे, नळदुर्ग**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ डिसेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत यावेळी मतदारांनी प्रस्थापितांना मोठा धक्का देत बदलाला कौल दिला आहे. २० पैकी तब्बल १३ नवे चेहरे नगरसेवक म्हणून निवडून आल्याने नगरपालिकेत नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. पहिल्यांदाच भाजपने नळदुर्ग नगरपालिकेवर सत्ता मिळवली असून, नूतन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासमोर शहर विकासासाठी नव्या नगरसेवकांना सोबत घेऊन काम करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

यावेळी नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक अत्यंत अटीतटीची ठरली. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिवसेना महायुतीने प्रभावी कामगिरी करत नगराध्यक्षपदासह एकूण ११ नगरसेवक निवडून आणले. यामध्ये भाजपचे १० तर शिवसेना (शिंदे गट) चा १ नगरसेवक आहे. काँग्रेसचे ९ नगरसेवक निवडून आले आहेत.

नगराध्यक्षपदाच्या चुरशीच्या लढतीत भाजपचे बसवराज धरणे यांनी एमआयएमचे शहेबाज काझी यांचा पराभव करत विजय मिळवला. बसवराज धरणे यांना ४,३३१ मते, शहेबाज काझी यांना ३,९११ म ते, काँग्रेसचे अशोक जगदाळे यांना २,९६८ तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे संजय बताले यांना १,१०६ मते मिळाली.




या निकालात म ोठ्या प्रमाणात क्रॉस मतदान झाल्याचे स्पष्ट झाले असून, त्याचा सर्वाधिक फटका काँग्रेसला बसल्याचे चित्र दिसून आले.

शहरातील म ुस्लिमबहुल भागात एमआयएम ला मोठी आघाडी मिळाली, तर हिंदुबहुल भागात अपेक्षेप्रमाणे भाजपला मतदारांनी पसंती दिली. भाजपचे बसवराज धरणे यांना प्रभाग क्र. १, ३, ४ व १० मधून आघाडी मिळाली, तर एमआयएमचे शहेबाज काझी यांना प्रभाग क्र. २, ५, ६, ७ व ९ मधून मताधिक्य मिळाले. काँग्रेसचे अशोक जगदाळे यांना केवळ प्रभाग क्र. ८ मधून १३२ मतांची आघाडी मिळाली.

या निवडणुकीतील विशेष बाब म्हणजे दीर्घकाळानंतर एक पत्रकार नगरसेवक म्हणून निवडून आला आहे. प्रभाग क्र. ५ (ब) मधून भाजपचे उमेदवार पत्रकार तानाजी जाधव यांनी एमआयएमचे शहेबाज काझी यांचा पराभव केला. यापूर्वी कै. सुधीर जगदाळे हे पत्रकार असताना नगरसेवक झाले होते.

नगरसेवक पदाच्या अनेक जागांवर अतिशय कमी मताधिक्याने निकाल लागले. प्रभाग १ (अ) मध्ये भाजपच्या छमाबाई राठोड या केवळ ८ मतांनी विजयी झाल्या, तर प्रभाग १ (ब) मध्ये भाजपचे निरंजन राठोड हे अवघ्या ४ मतांनी विजयी झाले. प्रभाग २ (ब) मध्ये शिवसेना (शिंदे गट) च्या सुमन ठाकुर या ५ मतांनी, तर प्रभाग ६ (अ) मध्ये काँग्रेसच्या मन्नाबी कुरेशी या अवघ्या १ मताने विजयी झाल्या. सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा मान भाजपचे माजी नगराध्यक्ष नय्यर जहागीरदार यांनी मिळवला. त्यांनी प्रभाग १० (ब) मध्ये ३६७ मतांनी विजय मिळवला. तसेच भाजपच्या मिनाक्षी काळे यांनी प्रभाग ३ (ब) मध्ये काँग्रेसच्या माजी नगरसेविका सुमन जाधव यांचा ३३७ मतांनी पराभव केला. या निवडणुकीत २० पैकी १३ नगरसेवक प्रथमच सभागृहात जाणार आहेत. यामध्ये तानाजी जाधव, मारुती खारवे, आकाश कुलकर्णी, शशिकांत पुदाले, रिजवान काझी, अब्दुल गफुर कुरेशी, मिनाक्षी काळे, सुमन ठाकुर, राणी सुरवसे, जुलेखा बेगम इनामदार, कमल गायकवाड, मदिना बागवान व साक्षी नळदुर्गकर यांचा समावेश आहे.

या निवडणुकीत पाच म ाजी नगराध्यक्षांसह अनेक माजी नगरसेवकांचा पराभव झाला आहे.

एकूणच नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी बदलाचा स्पष्ट संदेश दिला असून, नवे नेतृत्व शहर विकासाला कशी दिशा देते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिखरावर पोहोचण्यासाठी मनाची शांतता आवश्यक : उषादीदी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** जीवनाच्या उंच शिखरावर पोहोचण्यासाठी मनाची शांतता अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या राजयोगिनी ब्रह्मकुमारी उषादीदी यांनी केले.

लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानवाच्या आनंदी जीवनासाठी शांतमन व आत्मविश्वास' या विषयावरील प्रेरणादायी मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, बोलताना ब्रह्मकुमारी उषादीदी म्हणाल्या की, शांत मन आणि आत्मविश्वासातूनच आनंदी जीवन जगणे शक्य होत असते. व्यक्तीकडे शांत मन, स्पष्ट ध्येय, आत्मविश्वास निष्ठा आणि सृजनशीलता असणे गरजेचे आहे.

मन चान्गले की वाईट हे तपासण्यासाठी मनाची स्पष्टता महत्वाची भूमिका वठवत असते. बुद्धी स्पष्ट असेल तर नवविचार लवकर आत्मसात करणे शक्य होते आणि मानवाला त्याची प्रचितीही लवकर येते असेही उषादीदी यांनी सांगितले.



# शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ

## ▶▶ विविध क्षेत्रातील मान्यवरांची भावना : भावूक वातावरणात लातूरकरांनी केली श्रद्धांजली अर्पण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ आहेत. प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहुन लोकांच्या हिताची त्यांनी अनेक कामे केली. सदैव राष्ट्राच्या भल्याचाच विचार केला. धर्म, पक्ष यापलिकडे जाऊन मानवतेला प्राधान्य देत त्यांनी सर्वांना जोडून घेतले. म्हणून खऱ्या अर्थाने ते अजातशत्रु होते. एक कणखर नेते, विद्वत्ता आणि नैतिक मुल्यांचे प्रतिक म्हणून ते कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूरकरांच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी खासदार व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. अशोक कुकडे, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित देशमुख, माजी खासदार सुनील गायकवाड, लातूर अर्बन बँकेचे संस्थापक प्रदीप राठी, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, धनंजय पाटील, ज्येष्ठ पत्रकार बी. व्ही. मोतीपवळे, व्यंकट बेद्रे, माजी कुलगुरू अशोक ढवण यांनी मनोगतातून शिवराज पाटील चाकूरकर यांच्या







व्यक्तिमत्वाला उजाळा दिला.

शिवराज पाटील यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, रुद्राली पाटील चाकूरकर, रुषिका पाटील चाकूरकर, राजेश्र्वर बुके, माजी प्राचार्य नागोराव कुंभार, सुनील कोचेटा, उदय गवारे, अभय साळुंके, रमेश बियाणी, विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक, आर्थिक, विधी, कला-क्रीडा, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. 'वैष्णव जन तो', 'रघुपती राघव राजाराम' या भजनांनी सभेची सुरुवात झाली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या शोकसंदेशांचे बी. व्ही. मोतीपवळे यांनी वाचन केले. प्रा. अश्विनी रोडे, प्रा. गणेश बेळंबे यांनी सूत्रसंचालन केले.

**विचारधारा वेगवेगळ्या तरी दृढ संबंध : डॉ. अशोक कुकडे**

साठ वर्षांपूर्वी वैद्यकीय व्यवसायासाठी मी लातूरात आलो. त्यावेळी पहिल्याच वर्षी शिवराज पाटील यांचा परिचय झाला. आमच्यातील संबंध दृढ झाले. आमच्या राजकीय विचारधारा वेगवेगळ्या होत्या. तरी एकमेकांतील संबंध दृढ होते, याचे अनेकांना आश्र्चर्य वाटत असे. भूकंपानंतर परदेशातून आलेला १ लाख डॉलर्स निधी त्यांच्यामुळेच विवेकानंद रुग्णालयाला मिळाला होता. राजकारणापेक्षा समाजकारण, राष्ट्रकारण मोठे असते, असे त्यांना वाटत असे. प्रकाशाचा मार्ग दाखवणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे त्यांचे व्यक्तित्व होते.

**चाकूरकर पंतप्रधान झाले असते : जनार्दन वाघमारे**

प्रतिभाशाली आणि चिंतनशील व्यक्तीमत्व असलेले शिवराज पाटील यांनी आपल्या कार्यकाळात अनेक विकासकामे केली. मात्र त्याची त्यांनी जाहिरातबाजी केली नाही. लातूरच्या पाण्याचा प्रश्र्न त्यांनीच सोडवला होता. अशी लातूरमधील कितीतरी कामे त्यांच्यामुळेच मार्गी लागलेली आहेत. आपल्या जीवनात त्यांनी गरुडासारखी उत्तुंग झेप घेतली. पण, स्वतःविषयी ते कधीही बोलत नसत. २००४ मध्ये ते निवडून आले असते तर नक्कीच पंतप्रधान झाले असते. लोकांशी एकरूप झालेले, राजकारणातील संत म्हणता येईल, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

**विलासरावांना घडवण्यात शिवराज पाटलांचा वाटा : अमित देशमुख**

मी लहानपणापासूनच शिवराज पाटील चाकूरकर या नावाचा दबदबा पाहत आलो आहे. आजोबांकडून, वडिलांकडून, काकांकडून, आईंकडुन त्यांच्याबद्दल कामय ऐकत आलो आहे. पुढे मलाही त्यांचा स्नेह आणि आशीर्वाद लाभला. विलासराव देशमुख यांना घडवण्यात शिवराज पाटील यांचाच हात आहे. हा प्रसंग आम्ही कायम उराशी बाळगून आहोत. शिवराज पाटील यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना वेगवेगळी पदे मिळत गेली. यांच्या मागे पदे पळत राहिली. त्या प्रत्येक पदांना त्यांनी योग्य न्याय दिला. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे ते अतिशय लाडके सहकारी होते. चाकुरकरांनी लातूरचा लौकिक भारतभर आणि भारताबाहेरही वाढवला. त्यांचे व्यक्तीमत्व 'हिरो'सारखे होते.

**मुल्य जगून दाखवणारे उत्तुंग नेतृत्व : आदिनाथ सांगवे**

शिवराज पाटील यांचे व्यक्तिमत्त्व खरोखर दीपस्तंभासारखे होते. त्यांनी सच्चेपणा, नैतिकता, विद्वत्ता, तत्वनिष्ठता ही मूल्य इतरांना सांगितली असे नाही. तर ती स्वतः जगून दाखवली. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी असे होते. त्यांच्या सानिध्यात आलेल्या प्रत्येकाला त्यांची मुल्य शिकता आली. त्यांची वैचारिक उंची आभाळाऐवढी होती. त्यांची संपूर्ण कारकीर्द निस्पर्ह व निष्कलंक राहिली आहे. त्यांच्या जाण्याने एक बहुआयामी व उत्तुंग व्यक्तिमत्व हरपले आहे.

**सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घातला : प्रदीप राठी**

शिवराज पाटील यांच्या जाण्याने एक मोठे नेतृत्व लूप्त झाले. विलासराव देशमुख यांच्या मागे त्यांनीच मोठी ताकद उभी केली होती. त्यांना आमदार केले. मंत्री बनवले. शिवराज पाटील यांनी कधीही कोणाबद्दलही नकारात्मक दृष्टीकोन बाळगला नाही. ते अतिशय सुसंस्कृत नेते. त्यांनी सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घालून दिला. त्यांचे अनेक अनुयायी होतील. पण त्यांच्यासारखे कोणी होणार नाही.

**लक्ष्मीरमण लाहोटी :** राजकारणात त्यांच्या इतकी उंची लातूरात अन्य कोणाला गाठता येईल, असे वाटत नाही. त्यांचे आचरण अनुकरणीय असेच होते.

**डॉ. शिवाजी काळगे :** शिवराज पाटील हे अतिशय उत्तुंग नेते होते. दिल्लीत असताना त्यांची वारंवार आठवण होते.

## स्कॉश स्पर्धेत लातूरला कांस्यपदक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** राज्यातील शालेय शिक्षण आणि




क्रीडा विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय स्कॉश क्रीडा स्पर्धेत लातूर संघाने कांस्यपदक पटकावले आहे.

या स्पर्धेत राज्यातील विविध विभागातील खेळाडूंनी वेग, समतोल आणि तांत्रिक कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत धमाकेदार कामगिरी नोंदविली. या स्पर्धेत लातूर संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दयानंद कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. प्रीती अरविंद हिंडे हिने पुणे विभागाच्या संघाबरोबर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पुण्याचा पराभव करून कांस्यपदक मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली. या सपाद्रह उंड्री , पुणे येथे पार पडल्या. या स्पर्धेतील विजेता संघ आणि खेळाडूंना महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे सरचिटणीस संजय शेटे, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे , क्रीडा अधिकारी शिवाजी कोळी, महाराष्ट्र स्कॉश संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप खांड्रे आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आलीय. कु. प्रिती शिंदे हिला संपत साळुंके यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कु. प्रितीचे महाविद्यालयाच्या प्रशिक्षक टप्पेकर मॅडम, गणेश गिराम यांनीही कौतुक केले आहे.

## अंगणवाडी म्हणजे भावी पिढी घडविण्याचे केंद्र : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** जिल्ह्यातील अंगणवाड्या आता केवळ खाऊ देणारे केंद्रे न राहता उज्ज्वल, सक्षम व सुसंस्कारित भावी पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. शासनाने वेळोवेळी केलेल्या आवाहनांना अंगणवाडी सेविकांनी नेहमीच सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांसाठी आयोजित 'पोषण भी, पढाई भी' या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मिना यांची प्रमुख उपस्थिती होती.

नववर्षात 'फिट अंगणवाडी ताई, फिट लातूर' असा संकल्प प्रत्येक अंगणवाडी सेविकेने करावा. अंगणवाडी सेविकांचे कार्य हे केवळ सेवा नसून समाजाच्या भविष्याची घडण करण्यामध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदान असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी नमूद केले.

'पोषण भी, पढाई भी' या उपक्रमांतर्गत बालकांचा समग्र विकास साधण्यासाठी

**'पोषण भी, पढाई भी' उपक्रमांतर्गत अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण**

पोषण व शिक्षण यांचा अभ्यासक्रमाशी प्रभावीपणे समन्वय साधण्याचे तंत्र अंगणवाडी सेविकांना शिकविण्यात आले आहे. नव्या अभ्यासक्रमानुसार विविध वयोगटातील मुलांसाठी शैक्षणिक व बौद्धिक उपक्रम निश्र्चित करण्यात आले असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी केले. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी



बळीराम निपाणीकर, प्रिया तारु तसेच रॉकेट लर्निंग संस्थेचे गोपीचंद व्हनमारे व अभिजीत वीर यांची उपस्थिती होती. या प्रसंगी लातूर जिल्ह्यात उत्कृष्ट पद्धतीने कृतीआधारित उपक्रम राबविणाऱ्या अंगणवाडी सेविकांना प्रतिनिधिक स्वरूपात गोल्ड मेडल व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच प्रशिक्षण पूर्ण करण्याकरिता सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी, सर्व अंगणवाडी पर्यवेक्षिका व जिल्हा कक्षाचे विस्तार अधिकारी नारायण राठोड व प्रदीप बोंबले यांनी परिश्रम घेतले.

## आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** लातूर पासून जवळच असलेल्या बाभळगाव येथील दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणावर मंगळवारी आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेचे उदघाटन थाटात करण्यात आले. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.

उदघाटनप्रसंगी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शाम देशमुख, प्राचार्य दुष्यंत कटारे, मुख्याध्यापक फेरे, डॉ. भूपेंद्रसिंह मुनीम, प्रा. चंद्रकांत मोरे आदींची उपस्थिती होती.

या मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन हॉकी हा खेळ शिस्त आणि संघभावनेचे प्रतिक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन वेळोवेळी केले जाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्राचार्य कटारे यांनी केले. अशा क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांतील नेतृत्वगुण, आत्मविश्र्वास वृद्धिंगत होतो,असेही त्यांनी बोलून दाखविले.

हे सामने साखळी व बाद फेरीच्या स्वरूपात खेळविले जाणार आहेत. उदघाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. दशरथ भिसे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. वैशाली माढेकर , प्रा. डॉ. राजेश कारंजकर , प्रा. डॉ. संतोष कोकीळ, प्रा. ऋषिकेश मस्के, पंच इमाम शेख, कार्तिक मस्के, साहिल समुदरले, डॉ. जयदेवी पवार, डॉ. शाहूराज मुळे आदींनी परिश्रम घेतले.

## चंद्रकला आळंदकर यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** लातूर शहरातील पोचम्मा गल्ली परिसरातील ज्येष्ठ नागरिक श्रीमती चंद्रकला प्रभाकर आळंदकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. स्व. चंद्रकला आळंदकर ह्या नाशिकच्या कॉसमॉस बँकेचे शाखाधिकारी दीपक आळंदकर, लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाचे सेवानिवृत्त कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रय आळंदकर यांच्या मातोश्री होत. नाशिक येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## आई-वडिलांची सेवा केली जाते ते घर स्वर्ग : प्रा. शिंदे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** लातूर ज्येष्ठ नागरिक संघातर्फे ज्येष्ठांचा अमृत महोत्सव सहस्त्रचंद्रदर्शन व जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा नुकताच लातुरात पार पडला. यावेळी बोलताना डॉ. सदाशिवशिंदे यांनी ज्या घरामध्ये आई - वडिलांची सेवा केली जाते ते घर अक्षरशः स्वर्ग असते, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभाग लातूरचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉक्टर सदाशिव शिंदे, ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष अभियंता आर. बी. जोशी , सचिव प्रकाश घादगिने उपस्थिती होती. यावेळी जीवन गौरव पुरस्कार प्राप्त रामकिशन खंडेलवाल, गोपीकिशन बजाज, दुर्गाप्रसाद शर्मा, रामपाल सोमानी, रघुनाथ बाहेती यांचा सत्कार संजीव खंडेलवाल यांनी केला.



यावेळी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे अशोक टांकसाळे, डॉ. विलास वारद, डॉ. श्याम कुलकर्णी, कलाप्पा मानकर, प्रा. पुरुषोत्तम कुलकर्णी, चंद्रकांत साळुंखे, सहस्त्रचंद्र दर्शनार्थी अंबादास नारायणराव सोमवंशी, नागोराव जाधव , विश्र्वनाथ तोडकरी, भगवान भाले, दौनाजी नागमोडे या सर्वांचा अमृत महोत्सवानिमित्त फेटा, शाल श्रीफळ, पुष्पहार मानपत्र व छत्रीसह झोक्यावर बसून सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्तींच्या वतीने कलाप्पा मानकर, अंबादासराव सोमवंशी, रामकिशन जी खंडेलवाल, डॉ. माधवी सोमवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. शिंदे यांनी यावेळी बोलताना ज्यांच्या घरी आई-वडील, लहान मुले आहेत ते घर संस्कारमय आहे. आदर, प्रेम, जिव्हाळ्याने भरुन आहे, ते घर स्वर्गासारखे असते असे सांगितले.

अध्यक्षीय समारोप यादव गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक ज्येष्ठ नागरीक संघाचे सचिव प्रकाश घादगिने यांनी केले. संघाचे अध्यक्ष आर.बी. जोशी यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. काशिनाथराव सलगर, प्रकाश घादगिने, रमेश भोयरेकर, प्रकाश नीला, शहाजी घाडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वसंत भेंडे यांनी केले.

## आरोग्याबाबत जनजागृती करणारा 'मिशन पिंक हेल्थ'चा उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ डिसेंबर :** महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सक्षम व्हावे, तसेच सुजाण पालकत्वाविषयी समाजात व्यापक जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने मिशन पिंक हेल्थ अंतर्गत राबविण्यात येणारा सहावा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. जेएसपीएम लातूर संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथे आयोजित या कार्यक्रमास महिलांचा, पालकांचा व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य मारुती सूर्यवंशी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य गोविंद शिंदे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य सूर्यवंशी यांनी महिलांचे आरोग्य व पालकांचे मार्गदर्शन हे समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमात मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. वैशाली दाताळ यांनी महिलांच्या आरोग्याशी निगडित विविध समस्या, मासिक पाळीतील स्वच्छतेचे महत्त्व व योग्य आरोग्यविषयक काळजी पाटील यांनी सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.



याबाबत झझढ च्या माध्यमातून सविस्तर व प्रभावी मार्गदर्शन केले.

डॉ. राखी सारडा यांनी महिलांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या उर्शीीळलरश्र उरपलशी तरललळपश बाबत माहिती देताना लसीकरणाचे योग्य वय, त्याचे फायदे तसेच गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून बचावासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय स्पष्ट केले.

डॉ. संगीता देशमुख यांनी आहारातून व उपचारांद्वारे त्यावर कसे नियंत्रण मिळवता येईल, हे सोप्या शब्दांत समजावून सांगितले.

डॉ. अपूर्वा चेपुरे यांनी मोबाईल व सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे होणारे मानसिक दुष्परिणाम सांगत मानसिक आरोग्य कसे सुधारता येईल, यावर मार्गदर्शन केले. तर डॉ. ज्योती

या कार्यक्रमाचे आयोजन सखी सावित्री समिती व महिला तक्रार निवारण समिती यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी श्रीमती अलका अंकुशे, संगीता जगताप, सुचिता घाडगे, सर्व शिक्षिका, विद्यार्थिनी तसेच महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी महिलांचे आरोग्य, मानसिक सशक्तीकरण व सुजाण पालकत्व यासंदर्भातील मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. वैशाली दाताळ व सचिव डॉ. राखी सारडा यांचे अभिनंदन केले.